| 53 | Vijay Medical Stores,Shirdi. | 127 | 17/07/2007 | 57.00 |
| 54 | Vijay Medical Stores,Shirdi. | 131 | 18/07/2007 | 65.00 |
| 55 | Vijay Medical Stores,Shirdi. | 132 | 18/07/2007 | 39.00 |
| | | | **Total Amt.** | **5318.00** |
| | | **Total Amt..in Rs.** | | **193115.00** |

**Partywise Bill Summery –**

| Sr.No. | Name of Party | Total Amt. |
|---|---|---|
| 1 | Aid India, Mumbai | 780.00 |
| 2 | Arihant Agency, Sangamner | 6000.00 |
| 3 | Chintamani Medical & Gen. Stores Shirdi | 21877.00 |
| 4 | Darshan Medical Stores, Shirdi | 220.00 |
| 5 | Doctors Pharma, Nashik. | 50663.00 |
| 6 | Dolase Agencies, Ahmednagar | 14010.00 |
| 7 | J.S.P.Surgical, Nashik | 16649.00 |
| 8 | Kanchan Drugs, Pune. | 5370.00 |
| 9 | Kapil Medicals, Jalgaon. | 3145.00 |
| 10 | Life Line Surgical, Kopargaon | 22133.00 |
| 11 | Mauli Pharma, Kopargaon | 422.00 |
| 12 | Meena Agencies, Nashik | 14992.00 |
| 13 | Om Sai Medical & General Stores, Shrirampur | 122.00 |
| 14 | Pharmacea Link, Pune | 1476.00 |
| 15 | Prince Medical & General Stores, Nashik | 9000.00 |
| 16 | Saikrupa Medicals, Kopargaon. | 15058.00 |
| 17 | Universal Chemicals, Nashik | 5880.00 |
| 18 | Vijay Medical Stores,Shirdi. | 5318.00 |
| | **Total Amt. in Rs.** | **193115.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे पुर्णांकित रक्कम रु.१,९३,११५/- (रु. एक लाख त्र्यान्नव हजार एकशे पंधरा मात्र) चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रमाणे "अ" मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे रक्कम रुपये रु.४,०४,८०८/-(रु.चार लाख चार हजार आठशे आठ मात्र) चे खरेदीस तसेच "ब" मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे रक्कम रुपये १,९३,११५/- (रु. एक लाख त्र्यान्नव हजार एकशे पंधरा मात्र) चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

तसेच तातडीचे औषधांसाठी उत्पादक कंपन्या/अधिकृत विक्रते यांचेकडून वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात येऊन त्यांचे दर निश्‍चित करुन खरेदी करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. २५** **(अ)श्रीसाईबाबा हॉस्पिटमध्ये असलेल्या विविध मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**
**(ब) श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये असलेल्या विविध मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**निर्णय क्र.७२६** **(अ)** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये अंदाजे एकुण रू.२८,३१,७२,६५१.७४ इतक्या रकमेचे मेडिकल इन्स्ट्रुमेंट व मशिनरी खरेदी करण्यात आले आहेत.सदरचे सर्व इन्स्ट्रुमेंट व मशिनरी नियमीतपणे वापरात असून सध्या व्यवस्थित काम देत आहेत.त्यापैकी ५२ मशिनचे मा.उपसमितीच्या दि.३१/०३/२००७ सभेतील निर्णयानुसार विविध पुरवठा धारक कंपन्याकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC/CMC) करण्यात आले आहे. सध्या उर्वरीत मशिनपैकी काही मशिनचा वॉरंटी कालावधी संपत आलेला आहे तसेच सदरच्या मशिनचे दुरूस्तीसाठी आवश्यक असणारे स्पेअर पार्ट फक्त त्या त्या पुरवठाधारक कंपन्याच देउ शकतात.त्यामुळे सदरच्या इन्स्ट्रुमेंट व मशिन्सनी यापुढील कालावधीत व्यवस्थित काम देण्यासाठी त्यांचे कंपनीकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC/CMC) करणे गरजेचे आहे.त्यासाठी पुरवठाधारक कंपन्यांशी संपर्क साधून वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर मागविण्यात आले होते, त्याचा तक्ता तयार करण्यात येऊन तो आजचे सभेत सर्व सदस्यांना पुरविण्यात आला होता, तो सोबत **परिशिष्ट "अ" म्हणून** ठेवण्यात आला आहे.

सदरचे परिशिष्ट "अ" प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये असलेल्या एकुण ०५ नग मशिन्स व इन्स्ट्रुमेंटचे AMC (without spare part) वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे आवश्यक आहे. त्यासाठी एकुण रू १,३२,८१० (अक्षरी रू.एक लाख बत्तीस हजार आठशे दहा मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच ज्या मशिन्स तातडीच्या वेळी कार्डियाक ॲम्बुलन्स, डायलेसीस व ऑप्थॅल्मीक ओ.टी विभागात वापरल्या जातात.अशा एकुण ०३ नग मशिन्स व इन्स्ट्रुमेंट असून त्यांचे C.M.C. (With all Spare Parts) वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे आवश्यक आहे.त्यासाठी सर्व करांसहीत एकुण रू.१,३३,३२१ (अक्षरी रू. एक लाख तेहतीस हजार तिनशे एकविस मात्र) इतका खर्च

अपेक्षित आहे. त्यासाठी संबंधीत कंपन्यांनी AMC/CMC रकमेची आगाउ मागणी केलेली आहे व त्यासाठी त्यांना आगाउ रक्कम दयावी लागणार आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये असलेल्या एकुण ०८ नग मशिन्स व इन्स्ट्रुमेंटचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यासाठी सर्व करांसहीत एकुण रू.२,६६,१३१ (अक्षरी रू. दोन लाख सहासष्ट हजार एकशे एकतीस मात्र) इतक्या रकमेच्या खर्चास व सदरची रक्कम आगाउ पाठविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**(ब)तसेच-**श्रीसाईनाथ रूग्णालयात नियमीतपणे वापरात असलेले अंदाजे एकुण रू.१,२५,००,०००.०० (अक्षरी रू. एक कोटी पंचवीस लाख मात्र) इतक्या रकमेचे विविध मेडिकल इन्स्ट्रुमेंट व मशिनरी आहेत.त्यापैकी ४३ मशिनचे मा.उपसमितीच्या दि.३१/०३/२००७ सभेतील निर्णयानुसार विविध पुरवठा धारक कंपन्याकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC/CMC)करण्यात आले आहे.सध्या उर्वरीत मशिनपैकी काही मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधी संपला असुन पुढील कालावधीत सर्व मशिन्सने व्यवस्थित काम देणेसाठी त्या त्या कंपन्यांशी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे गरजेचे आहे. सदरच्या मशिनचे स्पेअर पार्टस फक्त संबंधित पुरवठाधारक कंपन्याच देउ शकतात.ज्या कंपन्यांशी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात आले त्या कंपन्यांनी कॉन्ट्रॅक्ट कालावधीत त्यांच्या नियमीत भेटी तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल केली आहे.तसेच सदरचे सर्व मशिन व्यवस्थित काम देत असून त्यापैकी २३ नग मेडिकल इन्स्ट्रुमेंट व मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे साठी संबंधित पुरवठाधारक कंपन्यांकडून कोटेशन मागविण्यात आले आहेत .कंपन्यांनी दिलेल्या वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दरांचा तक्ता तयार करण्यात येऊन, तो सर्व सदस्यांना पुरविण्यात आला होता, तो सोबत **परिशिष्ट "क" म्हणून** ठेवण्यात आला आहे.

सदरचे परिशिष्ट "क" प्रमाणे क्र. १ ते १० करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करावयाचे आहे.त्यासाठी विविध कंपन्यांनी एकुण रू. १,९९,४४०/-इतका खर्च कळविला असून सदरची रक्कम आगाउ पाठवायची आहे.संस्थानचे पूर्व लेखापरीक्षक यांनी अशा प्रकारचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टसाठी मा.व्य.समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे असे सुचविलेले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे अ.क्र.१ ते १० चे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यासाठी एकुण रू. १,९९,४४०/-चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. २६ झेनॉन लाईट सोर्सचे दुरुस्तीबाबत**

**निर्णय क्र.७२७** श्रीसाईनाथ रूग्णालयाकरीता सन १९९९ मे.कार्ल स्टोअर्ज,जर्मनी या कंपनीचे भारतातील तेव्हांचे अधिकृत विक्रेते मे.चिमको इंटरनॅशनल,मुंबई यांचेकडून विविध प्रकारच्या स्कोपीज खरेदी करण्यात आलेल्या होत्या.त्यामध्ये उपरोक्त झेनॉन लाईट सोर्स व हॅलोजन बल्ब देखील खरेदी करण्यात आले होते.

सदरचे झेनॉन लाईट सोर्स नादुरूस्त झाल्याने इकडील दि.२०/०१/०७ च्या मंजुरी व पत्र क्र. ३७६/२००७ दि.२४/०१/०७ अन्वये मे.चिमको बायोमेडीकल इंजि.कं,मुंबई यांचेकडे दुरूस्तीकरिता पाठविले होते.कंपनीने सदरचे मशिन करिता मे. कार्ल स्टोअर्ज, जर्मनी यांचेकडून काही स्पेअर पार्ट मागवून दुरूस्ती केली होती.परंतु मशिनचा मदर बोर्ड खराब झाल्याने मशिन दुरूस्त होउ शकले नाही.त्यामुळे कंपनीने त्यांचे पत्र क्र.३९३८ दि.२२/०८/०७ अन्वये सदर मशिनचा मदर बोर्ड बदलणे आवश्यक आहे असे कळविले आहे.मे.चिमको बायोमेडीकल इंजि.कं,मुंबई यांनी सदरचा बोर्ड बदलणेसाठी सर्व करांसहीत एकुण रू.६५,०००/-(अक्षरी रू.पासष्ट हजार मात्र) इतका खर्च कळविला आहे व सदरच्या एकुण रकमेची कंपनीने आगाउ मागणी केलेली आहे.

झेनॉन लाईट सोर्स ऑपरेशन थिएटरमध्ये सर्जरी करतांना वापरला जातो.त्यामुळे तो दुरूस्त करून घेणे आवश्यक आहे व सदरच्या लाईट सोर्सचे स्पेअर पार्ट हे फक्त मे.कार्ल स्टोअर्ज,जर्मनी यांचे अधिकृत सर्व्हिस डीलर मे.चिमको बायोमेडीकल इंजि.कं,मुंबई यांचेकडेच मिळतात.

तरी झेनॉन लाईट सोर्स मे.चिमको बायोमेडीकल इंजि.कं,मुंबई यांचेकडून दुरूस्त करून घेण्यास व सदरच्या दुरूस्तीस येणा-या एकुण रू.६५,०००/-च्या खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेकरीता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. २७ मुदतबाह्य औषधे नष्ट करणे बाबत.**

**निर्णय क्र.७२८** श्रीसाईनाथ रुग्णालयाचे औषध भांडार व विविध वॉर्डमध्ये दिनांक १.४.२००६ ते दिनांक ३१.३.२००७ या कालावधीमध्ये एकूण रुपये २२,०१८.६२४ ची औषधे मुदतबाह्य झालेली आहे. त्याचा तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

| अनं. | तपशिल | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | औषधे भांडारामध्ये एकूण | १२,८७३.०७५ |
| ०२. | विविध वॉर्डमधून जमा झालेले एकूण | ९,१४५.५४९१ |
| | एकूण रुपये | २२,०१८.६२४ |

उपरोक्तपैकी अ.नं.२ वॉर्डमधील औषधांमध्ये सन ०१/०४/२००६ ते दिनांक ३१.३.२००७ या कालावधीत मुदत बाह्य झालेली आहे. त्या औषधांची रक्कम एकूण रुपये २२,०१८.६२४ आहे. सन २००६-२००७ या आर्थिक वर्षामध्ये मार्च २००७ अखेर एकूण रुपये ६,७०,००,०००.०० ची औषधे खरेदी करण्यात आली आहे. त्यांचे अ.नं. १ व २ करीता मुदतबाह्य औषधांचे प्रमाणे ०.०३२८ टक्के इतके आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे औषधे जमीनीत खोलवर खड्डा घेऊन नष्ट करण्यास व औषधे भांडारातील मुदतबाह्य औषधे, औषधसाठी रजिस्टरमधून कमी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रमाणे औषधे जमिनीत खोलवर खड्डा घेऊन प्रशासकीय अधिकारी,रुग्णालय, वैद्यकीय संचालक,वैद्यकीय अधिक्षीका व भांडारपाल यांचे उपस्थितीत नष्ट करण्यात यावेत,असें ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**विषय नं. २८ जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन व हताळणीबाबत**

**निर्णय क्र.७२९** श्रीसाईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैदयकीय घनकचरा विल्हेवाट लावणेकामी देण्यास मा.व्य.समितीच्या दि.१९/०८/०६ च्या सभेतील विषय क्र.२४ निर्णय क्र.५५३ अन्वये मे.बायोक्लीन सिस्टीम्स,अहमदनगर यांना प्रति महिना रू.३२,०००/- प्रमाणे कार्यादेश देण्यात आला होता.इकडील कार्यादेशानुसार कंपनीस सदरचे काम एका वर्षाचे कालावधीकरीता देण्यात आले होते.

वरील कार्यादेशानुसार मे.बायोक्लीन सिस्टीम्स,अहमदनगर हे दि.०१/०९/०६ पासून दररोज श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये येउन जैव वैदयकीय घनकचरा त्यांचे स्वतःचे वाहनाने पुढील विल्हेवाटीसाठी घेउन जात आहेत.सदरच्या कार्यादेशाचा कालावधी दि.३१/०८/०७ रोजी संपला आहे.परंतु मे.बायोक्लीन सिस्टीम्स,अहमदनगर यांचे कोटेशन क्र. AMD/541 दि.१४/०६/०६ नुसार कंपनीने दोन्ही हॉस्पीटलमधील जैव वैदयकीय घनकचरा पुढील विल्हेवाटीसाठी घेउन जाणेकरिता दिलेले प्रति महिना रू.३२,०००/-इतके दर पुढील दोन वर्षांकरीता म्हणजे दि. ३१/०८/०८ पर्यंत दिलेले आहेत.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलला स्वतंत्रपणे एक वर्षांचे कालावधीकरिता जैव वैदयकीय घनकचरा व्यवस्थापन व हाताळणीकरिता ऑथरायझेशन दिलेले आहे.सदरच्या ऑथरायझेशन पत्रात दिलेल्या नियम व अटीतील अट क्र.०६ नुसार

**"दोन्ही हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैद्यकीय घनकचरा पुढील कार्यवाहीकरीता सार्वजनिकरीत्या जैव वैदयकीय घनकचरा विल्हेवाट लावणा-या व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मान्यता दिलेल्या संस्थेस म्हणजे मे.बायोक्लीन सिस्टीम्स,अहमदनगर यांना देणे व सदरची माहीती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास देणे बंधनकारक आहे."**

तरी श्रीसाईनाथ व श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैदयकीय घनकचरा विल्हेवाट लावणेकामी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियमानुसार मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांना पुढील एका वर्षाचे कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पुर्वीचेच अटी व शर्तीवर श्रीसाईनाथ व श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैदयकीय घनकचरा विल्हेवाट लावणेकामी मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांना पुढील एका वर्षाचे कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात यावी,असें ठरलें.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**विषय नं. २९ मे.अभिषेक ऑफसेट,राहूरी यांनी छपाई न करुन दिल्यामूळे चहा कुपन्स पुस्तके छपाई कार्यवाही बाबत.**

**निर्णय क्र.७३०** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०१.२००७ मधील निर्णय क्र.४१ नुसार सन २००६-०७ या वर्षासाठी कॅन्टीन विभागास लागणारे ५५०० चहा कुपन्स पुस्तके व कन्या विदया मंदिर, इंग्लिश मिडीयम स्कुलसाठी आवश्यक असणाऱ्या उत्तरपत्रिका इत्यादी न्युनतम दराने छपाई करुन पुरवठा करण्याचा मे.अभिषेक ऑफसेट, राहुरी यांना जा.क्र.१७३६ दि.०१.०२.२००७ अन्वये रक्कम रु. १,२५,३८३/- चा आदेश देण्यात आला होता. पुरवठा करण्यासाठी संबंधितांला ६० दिवसाची मुदत देण्यांत आली होती.

पुरवठा आदेशानुसार मे.अभिषेक ऑफसेट, राहुरी यांनी उत्तरपत्रिकांचा पुरवठा वेळेत केला तथापि ५५०० चहा कुपन्सपुस्तका पैकी फक्त ४२३ पुस्तकांचाच पुरवठा केला. चहा कुपन्स पुस्तकांचा पुरवठा तातडीने करणेबाबत त्यांना वेळोवेळी फोनवरुन व लेखी स्वरुपांत कळविले. तथापि त्यांनी पुरवठा करणेबाबत दखल घेतली नाही. कुपन्स पुस्तके छपाईचा प्रति पुस्तकासाठीचा रु.२१.७८ दर परवडत नसल्याबाबत त्यांचेकडून सांगणेत आले व अनामत रक्कम परत मिळणेची मागणी केली. पुरवठा केलेल्या चहा कुपन्समध्येही त्यांनी नंबरींगमध्ये चुका केल्याचे त्यांचे निदर्शनास आणून देण्यात आले.

संस्थानची मुख्य कॅन्टीन, भक्तनिवासस्थानकडील कॅन्टीन या ठिकाणी चहा वाटपासाठी दररोज १५ ते २० पुस्तके लागतात. त्यातच गुरुपोर्णिमा उत्सव आल्याने चहा कुपन्स पुस्तकांची नितांत गरज असल्याने वार्षिक खरेदी निविदाधारकांमधील न्युनतम द्वितीय दरधारक मे.समर्थ ऑफसेट, साकुरी तसेच तृतीय दरधारक मे.प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगांव यांचेशी छपाईबाबत फोनवरुन संपर्क साधला असता,

त्यांनीही छपाई जास्त आहे, दर परवडत नाही म्हणून चहा कुपन्स पुस्तके छपाई करुन पुरवठा करणेस असमर्थता दाखविली.

गुरुपोर्णिमा उत्सवासाठी चहा कुपन्स पुस्तकांची तातडीची गरज असलेने कामाची खोटी होऊ नये म्हणून ५००० चहा कुपन्स पुस्तके छपाईसाठी जा.क्र.११२१२ दि.१७.०७.२००७ नुसार फेरकोटेशन बोलाऊन कालमर्यादा विचारात घेऊन मे.अविराज पॅकवेल, कोपरगांव व मे,प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगांव या दोहोंकडून ५००० चहा कुपन्स पुस्तके प्रति नगास रु.२८/-प्रमाणे छपाई करुन घेतलेले आहे.

मे.अभिषेक ऑफसेट, राहुरी यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशातील कलम नं.६ मधील अटीनुसार मालाचा पुरवठा न झाल्यास व इतरांकडून जादा दराने छपाई करुन पुरवठा करुन घेणे भाग पडल्यास, जादा झालेल्या खर्चाची रक्कम अनामत रक्कमेतून कपात करण्यांची तरतुद पुरवठा आदेशात नमुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रति पुस्तकास (रु.२८/- वजा रु.२१.७८ = रु. ०६.२२) प्रमाणे ५००० चहा कुपन्स पुस्तकांची रु.३१,१००/-एवढा जादा खर्चाची रक्कम मे.अभिषेक ऑफसेट, राहुरी यांचेकडून वसुली पात्र आहे. तथापि पुरवठा आदेशानुसार त्यांची रु.६२६९/-एवढी रक्कम संस्थानकडे जमा आहे.

तरी मे.अविराज पॅकवेल, कोपरगांव व मे.प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगांव यांचेकडून प्रत्येकी २५०० प्रमाणे एकुण ५००० चहा कुपन्स पुस्तके छपाईसाठी झालेल्या रु.१,४०,०००/-चे खर्चास मान्यता देण्यास, तसेच मे.अभिषेक ऑफसेट, राहुरी यांनी पुरवठा आदेशानुसार छपाई काम न करुन दिल्यामुळे संस्थानकडे जमा असलेली त्यांची रु.६२६९/-सुरक्षा अनामत रक्कम दंड म्हणून संस्थानकडे जमा करुन घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त खर्चास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस मा.विश्वस्त श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी मे.अभिषेक ऑफसेट,राहूरी यांना हे काम करण्यास आर्थिक नुकसान सोसणे शक्य नसल्याने मा.व्यवस्थापन समितीने त्यांना दंड आकारु नये अशी सूचना मांडली, त्यास व्यवस्थापन समितीने मान्यता दिली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं. ३०** **वर्ग-४ कर्मचारी निवासस्थानाचे उर्वरित बांधकामातील पॅनल रुमचे बांधकामाबाबत**

**निर्णय क्र.७३१** वर्ग ४ कर्मचारी निवासाचे पॅनल रुमचे बांधकाम तातडीने करावयाचे असल्याने विभागामार्फत काम पुर्ण करुन घेण्यात येत आहे. त्यामूळे सदरहू विषय मागे घेण्यात आला.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ३१** **नवीन प्रसादालय लॅण्डस्केपींग करणेसाठी कारंजा व इरिगेशन सिस्टीमचे आलेले कोटेशन उघडणे बाबत**

**निर्णय क्र.७३२** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये श्रीक्षेत्र शिर्डी येथे भेट देणा-या साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा मिळणेकामी अदयावत प्रसादालय इमारतीचे काम पुर्ण होत आले आहे.

नविन प्रसादालय इमारत व परिसर यास शोभेल असे लॅन्डस्केपींग (गार्डन) करण्याचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत ठरले आहे. यासाठी लॅन्डस्केप आर्किटेक्ट श्रीमती.अमृता पवार,नाशिक यांनी याकामी आराखडा व एस्टीमेट रु.३५,८५,१८०.०० खर्चाचे सादर केले होते. याबाबत दि.२९/०६/२००७ रोजीचे बैठकीत चर्चा होऊन इलेक्ट्रीफीकेशन काम संबंधित विभागामार्फत सध्याचे विद्युत ठेकेदाराकडून मंजूर निविदा दरात करुन घेण्यात यावे. तसेच बगीचा व फौंटनचे काम संबधिंत विभागामार्फत निविदा अथवा कोटेशन्स मागवून करण्यात यावे.सिव्हील वर्क व वॉटर सप्लायचे काम आय.व्ही.आर.सी.एल याचे कडून त्यांचे मंजूर निविदा दरात करुन घ्यावे. त्यासाठी येणारे योग्य त्या खर्चास मंजूरी देण्यात आलेली आहे.

सदर कोटेशनमध्ये सुशोभिकरणासाठी पाण्याचा कारंजा व लॅण्डस्केपिंगच्या झाडांना पाणी देणेसाठी इरिगेशन सिस्टम नमुद केलेली आहे. पाण्याचा कारंजासाठी रुपये १,००,०००/- ची व इरिगेशन सिस्टमसाठी रुपये २२,९००/-ची तरतूद करण्यात केलेली आहे. त्यानुसार कोटेशन मागविण्यात आले असता,खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

| अनं. | कोटेशन सादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१. | रेणूका टेड्रींग कं, नाशिक |
| ०२. | गजानन मशिनरी स्टोअर्स,नाशिक |
| ०३ | जगताप इलेट्रिकल्स,नाशिक |

उपरोप्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत संबंधित कोटेशनसादरकर्ते उपस्थित नसल्याने उपसमितीच्या सभेत कोटेशन्स उघडून कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलावुन अंतिम निर्णय घेण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/बगीचा विभाग प्रमुख)

**विषय नं. ३२ शिर्डी शहरातून जाणारा मालेगांव-कोपरगांव अहमदनगर रस्ता (राज्यमार्ग १० लांबी १६०५) जागतिक बँक प्रकल्पाकडे हस्तांतरीत करणे बाबत**

**निर्णय क्र.७३३** उपरोक्त काम करणेसाठी शासन पत्र क्र.सा.बां.विभाग मंत्रालय जा.बँक प्रकल्प/२००३/प्र.क./११८/ रस्ते-०६ दि.०६/०५/२००४ अन्वये कार्यासन अधिकारी सा.बां.विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडून श्री साईबाबा संस्थानकडे उपरोक्त नगर- मनमाड रस्त्यातील लक्ष्मीनगर वसाहत ते संस्थान शैक्षणिक संकुलाच्या दक्षिण कंपाउंड भिंतीपर्यत एकूण १६०५ मी. लांबीचा रस्ता हस्तांतरीत करण्यात आला होता. सदर पत्रान्वये विषयांकीत काम करणेसाठी व तद्नंतर परिक्षण व दुरुस्तीसाठी या रस्त्याची वरीलप्रमाणे १६०५ मी. लांबी दि. ०६/०५/२००४ नंतर ०५ वर्षासाठी संस्थानकडे हस्तांतरीत झाल्यानंतर सदरचे काम दि. ३१/०५/२००६ अखेर पूर्ण करण्यात आलेले आहे. ठेकेदार यांनी काम केल्यानंतर निविदेनुसार सदर कामाचा दोषदायित्व कालावधी पूर्ण झाल्याने सदर रस्ता जा.बँक प्रकल्प (सा.बां.) विभाग अहमदनगर यांना देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरीत करणेबाबत इकडील पत्र क्र. एसएसएस/ बांधकाम/९१३७ दि. १२.०६.२००७ अन्वये कळविणेत आले होते.

आता जा.बँक प्रकल्प अ.नगर यांनी त्यांचे पत्र क्र. प्रशा/ २६७/२००७ दि. ३०/०७/२००७ अन्वये सदरचा रस्ता शासनाने ०५ वर्षासाठी दि. ३०.०५.२०११ अखेर संस्थानकडे हस्तांतरीत केलेला असल्यामुळे तुर्तास सदर रस्त्याची लांबी जा.बँ.प्रकल्प विभागाकडे हस्तांतरीत करणेचा प्रश्नच उदभवत नसल्याचे कळविले आहे. तसेच सदर लांबीची देखभाल व दुरुस्ती दि.३०/०५/२०११ पर्यंत संस्थान मार्फत करण्यात यावी असे कळविले आहे.

जागतीक बँक प्रकल्प विभागाने त्यांचे पत्रात मंत्रालयाच्या संदर्भिय पत्रातील अट क्र. १४ चा संदर्भ देऊन सदर रस्ता संस्थानकडे दुरुस्ती व देखभालीसाठी ठेवावा असे कळविले आहे. सदरची अट खालीलप्रमाणे आहे.

**" प्रस्तावीत काम करणेसाठी व तद्नंतर परिक्षण व दुरुस्तीसाठी सदरहू लांबी-०५ वर्षासाठी हस्तांतरीत करण्यात येईल. काम पूर्ण होऊन उक्त कालावधीनंतर रस्ता पुनश्च शासनाकडे हस्तांतरीत करण्यात आला तरी याकामासंदर्भात चालू असतांना तसेच काम पूर्ण झाल्यानंतर भविष्यात कोणत्याही स्वरुपाचे वाद उद्भवल्यास त्याचे संपुर्ण निराकरण (आवश्यक असल्यास आर्थिक दायित्वासह) करण्याची जबाबदारी पूर्णपणे संस्थानची राहील."**

उपरोक्त अटीनुसार मंत्रालय, मुंबई यांचे पत्रातील दि. ०६/०५/२००४ नंतर ०५ वर्षे म्हणजे दि. ०५/०५/२००९ अखेर सदरचा रस्ता संस्थानकडे बांधकाम खडीकरण, डांबरीकरण कामासाठी तसेच परिक्षण व देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आला आहे. पंरतू संस्थानकडे उपरोक्त रस्त्याचे दुरुस्ती व देखभालीसाठी स्वतंत्र यंत्रणा व स्वतंत्र तरतूद नसल्याने सदर रस्त्याची उपरोक्त लांबीतील दुरुस्ती व देखभाल न झाल्यास रस्ता लवकर खराब होईल व सदर रस्त्यावरील वर्दळ व रहदारी विचारात घेता रस्ता खराब झाल्यास त्याचा त्रास साईभक्तांना होणार आहे. करीता विशेष बाब म्हणून संदर्भिय पत्रातील अट क्र. १४ मधील कालावधी कमी करुन सदरचा रस्ता लवकरात लवकर शासनाकडे हस्तांतरीत केल्यास साईभक्तांची संभाव्य गैरसोय दूर होईल यादृष्टीने शासन स्तरावर प्रयत्न करता येतील. दरम्यानचे काळात सदर रस्त्याची देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक ती कामे करणे व त्यासाठी योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू रस्ता हा शिर्डी शहरात प्रवेश करण्यासाठी व रहदारीसाठी सर्वात प्रमुख रस्ता आहे. त्यामुळे जोपर्यंत हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पुनःश्च हस्तांतरीत होत नाही तोपर्यंत तो सुस्थितीत ठेवणेसाठी संस्थानतर्फे आवश्यक ती देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रथम सध्या रस्त्यावर काही ठिकाणी पडलेले खड्डे बुजविणे लँडस्केपींगमध्ये भर टाकणे इ. फुटपाथच्या इतर कामांसह दुरुस्ती करण्यात यावी. त्यासाठी येणारे योग्य त्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच रस्त्याचे नुतनीकरणासाठी नव्याने डांबरीकरणचा थर देणेकामी याकामाचे आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोसिएटस,श्रीरामपूर यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन घ्यावे व त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता घेणेत यावी. त्यानंतर सदरहू प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करणेत यावा,असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ३३ नवीन प्रसादालय बागेकरीता विहिरीचे पाणीपुरवठा करणेसाठी ३"पी.व्ही.सी.पाईपलाईन टाकणे बाबत**

**निर्णय क्र.७३४** वरील विषयास अनुसरून नविन प्रसादालयाचे काम अंतिम टप्प्यात आहे. नविन प्रसादालय परीसरात बगीचा विभागमार्फत बगीचा डेव्हलप करणे प्रस्तावित आहे. त्या करीता पाण्याची गरज भासणार आहे. संस्थानचा वाढता परीसर त्यात पाण्याची टंचाई लक्षात घेता पिण्याच्या पाण्यातून बगीचा विभागासाठी ते पिण्याचे पाणी देता येणार नाही. त्याकरीता ओव्हरहेड टाकी जवळ संस्थानची विहिर आहे त्या विहिरीवरुन नविन प्रसादालय येथे पाईप लाईन टाकल्यास ते पाणी बगीचा साठी वापरता येईल. ओव्हर हेड टँक ते नविन प्रसादालय हे अंतर अंदाजे ४५५० फूट आहे (अंदाजे १४०० मीटर ) ही पी.व्ही.सी. पाईप लाईन ओव्हर हेड टँक ते प्रसादालय अशी टाकावयाची असल्याने त्या पाईपलाईनच्या नालीतून ही पाईपलाईन टाकता येईल. तेंव्हा नाली खोदाई खर्च येणार नाही. त्याकरीता खालील प्रमाणे पी. व्ही. सी.

पाईप व मटेरियल कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये १,०५,१४४/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| **अ.नं.** | **तपशिल** | **साईज** | **कंपनी** | **मागणी** | **अंदाजे दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पी.व्ही.सी -पाईप | ३" | फिनोलेक्स | ४५५० फूट | २०/- फूट | ९१,०००/- |
| ०२ | पी.व्ही.सी- बेंन्ड | ३" | फिनोलेक्स | २० नग | ७०/- प्रती नग | १४००/- |
| ०३ | पी.व्ही.सी- टी | ३" | फिनोलेक्स | १० नग | ७५/- प्रती नग | ७५०/- |
| ०४ | टेलपीस (पूर्ण सेटसह) | ३" | फिनोलेक्स | १० नग | १५०/- प्रती नग | १५००/- |
| ०५ | पी.व्ही.सी- गेटव्हॉल | ३" | फिनोलेक्स | ०१ नग | ४५०/- प्रती नग | ४५०/- |
| ०६ | फ्लॅन्ज टाईप गेटव्हॉल | ३" | आयएसआय | ०२ नग | ३०००/-प्रती नग | ६०००/- |
| | | | | | एकूण | १,०१,१००/- |
| | | | | | + ४% व्हॅट | ४,०४४/- |
| | | | | | **एकूण रुपये** | **१,०५,१४४/-** |

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

**विषय नं. ३४ स्वच्छता विभाग,प्रसादालय विभागासाठी फिनेल व लिक्वीड सोप तयार करणेसाठी केमिकल खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.७३५** वरील विषयान्वये संस्थानचे स्वच्छता व प्रसादालय विभाग यांना परिसरातील संडास बाथरूम व इतर साफ सफाई करणेकीता सेंटेड फिनेल व लिक्विड सोपची मोठया प्रमाणावर गरज भासते. स्वच्छता व प्रसादालय विभागाकडून सदरचे मटेरियल खरेदी विभागाकडून वार्षिक मागणीनुसार पुरवठादारांकडून कोटेशन मागवून खरेदी केले जाते. पुरवठादार यांचेकडून पुरवठा करण्यात येणारे मटेरियल आपणास चांगल्या दर्जाचे मिळत नाही.

स्वच्छता व प्रसादालय विभाग यांना आवश्यक वार्षिक मागणी खर्च तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | प्रसादालय विभाग मागणी | स्वच्छता विभाग मागणी | एकुण मागणी | प्रती लिटर खर्च | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सेंटेड फिनेल. | -- | ३००० लिटर्स. | ३००० लिटर्स. | रुपये ७०/- | २,१०,०००.०० |
| ०२ | लिक्विड सोप. | ४००० लिटर्स | २००० लिटर्स. | ६००० लिटर्स. | रुपये २१/- | १,२६,०००.०० |
| | | | | | एकुण खर्च - | ३,३६,०००.०० |

सदरचे सेंटेड फिनेल व लिक्विड सोप तयार करणेकरीता वार्षिक अंदाजे रुपये ३,३६,०००.०० मात्र खर्च येत आहे. सदरचे सेंटेड फिनेल व लिक्विड सोप तयार करणेसाठी लागणारे मटेरियल खरेदी करून कनकुरी साठवण तलाव येथील प्रयोगशाळेत सेंटेड फिनेल व लिक्विड सोप तयार केल्यास ते आपणास चांगल्या दर्जाचे मिळेल. त्याकरीता ३००० लिटर्स फिनेल व ६००० लिटर्स लिक्विड सोप तयार करणेसाठी खालील प्रमाणे मटेरियल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशिल | आवश्यक मटेरियल | मागणी | अंदाजे किंमत | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सेटेड फिनेल. | ०१. TRO (turkid oil) | ७५० किलो. | रु. ५१/- प्रती किलो. | ३८,२५०.०० |
| | | ०२. Pine oil. | १५०० किलो. | रु. ९०/- प्रती किलो. | १,३५,०००.०० |
| | | ०३. Coastic soda (NaoH) | ६० किलो. | रु. ३२/- प्रती किलो. | १,९२०.०० |
| | | ०४. Acid slurry. | ३० किलो. | रु. ७८/- प्रती किलो. | २,३४०.०० |
| | | | | अंदाजे एकुण रक्कम - | रु. १,७७,५१०.०० |
| ०२. | लिक्विड सोप. | ०१. Coastic soda (NaoH) | ७५० किलो. | रु. ३२/- प्रती किलो. | २४,०००.०० |
| | | ०२. Acid slurry. | ८४० किलो. | रु. ७८/- प्रती किलो. | ६५,५२०.०० |
| | | | | अंदाजे एकुण रक्कम - | रु. ८९,५२०.०० |

तरी वरील प्रमाणे मटेरियल खरेदी करून ३००० लिटर्स फिनेल व ६००० लिटर्स लिक्विड सोप तयार करणेकरीता अंदाजे एकुण रुपये २,६७,०३०.०० मात्र खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच रुपये ६८,९७०.०० मात्रचे खर्चात बचत होवून त्यापासून तयार होणारे सेंटेड फिनेल व लिक्विड सोप हे खरेदी करण्यात आलेल्या सेंटेड फिनेल व लिक्विड सोप पेक्षा खुपच उच्च दर्जाचे मिळेल. आपण दि. २०/०७/२००७ चे टिपणीनुसार मान्यता घेवून मटेरियल खरेदी करून त्यापासून २०० लिटर्स सेंटेड फिनेल व लिक्विड सोप तयार करून स्वच्छता विभागास नमुना दिला असता त्यांनी बनविण्यात आलेले सेंटेड फिनेल व लिक्विड सोप हे खूप चांगल्या दर्जाचे असलेबाबत कळविले आहे.

वार्षिक मागणीप्रमाणे सेंटेड फिनेल व लिक्विड सोप तयार करणेसाठी कोटेशन मागवून खरेदी केल्यास आपणास कनकुरी साठवण तलाव येथील प्रयोगशाळेत स्वच्छता व प्रसादालय विभागाचे मागणीप्रमाणे सेंटेड फिनेल व लिक्विड सोप चांगल्या दर्जाचे पुरविता येईल. त्याकरीता लागणारा परवाना आपणास खादी व ग्रामउदयोग विभागाकडून मिळविता येईल.

तरी सदरचे मटेरियल कोंटेशन मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये २,६७,०३०.०० मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्तप्रमाणे सेंटेंड फिनेल व लिक्वीड सोप तयार करणेकामी आवश्यक असणारे मटेरिअल कोटेशन मागवुन खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,६७,०३०.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली. सदर सेंटेंड फिनेल व लिक्वीड सोप तयार करणेसाठी आवश्यक तो परवाना घेण्यात यावा. सध्या कार्यरत असलेल्या मंजूर कर्मचाऱ्यांकडून उपरोक्त काम करुन घेण्यात यावे,असें ठरलें. (कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

**विषय नं. ३५** **सौर उर्जा प्रकल्प (स्टिमवर अन्न शिजविणे) देखभाल व चालविणेचे कंत्राटाबाबत**

**निर्णय क्र.७३६** सन २००१ पासून प्रसादालयामध्ये भात,भाजी,डाळ (सुमारे ३००० व्यक्तींचे अन्न) शिजविणेकामी सौर उर्जा यंत्रणा (सोलर स्टीम) कार्यान्वीत केलेली आहे. सन २००१ पासून सदर यंत्रणेचे दुरुस्ती/ देखभालीचे काम (वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट) गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि. यांचेकडून करुन घेण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक ३१.७.२००४ व दिनांक १.८.२००४ चे सभेतील निर्णय क्र. ३७८ चे निर्णयाप्रमाणे माहे सप्टेबर २००४ पासून तीन वर्षाकरीता गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि.वलसाड यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले आहे. याकामी त्यांना दिनांक ६.९.२००४ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला असून उपरोक्त यंत्रणा दुरुस्ती व देखभाल व चालविणेकामी वार्षिक फी रुपये ७५,०००/- मान्य केलेले आहे. तसेच त्यांचेकडील दोन कामगारांना मोफत भोजन व निवास व्यवस्था पुरविण्यात आलेली आहे.

गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि. यांनी सन २००१ पासून चांगली सेवा दिलेली आहे. त्यांना देण्यात आलेल्या वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टची मुदत माहे ऑगस्ट २००७ अखेर संपत आहे. त्यामूळे पुढील मुदतीसाठी सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे आहे. मात्र नजिकच्या कालावधीमध्ये नवीन प्रसादालयाकरीता वाढीव क्षमतेचे (२० हजार व्यक्तींचे भोजन बनविणे) सौर उर्जा यंत्रणेची उभारणी होणार आहे. सौर उर्जा यंत्रणा उभारणीकामी जाहिर निविदा मागविणेसाठी वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे.

गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि.वलसाड यांनी दिनांक २०.८.२००७ चे पत्रान्वये कळविले आहे की. नवीन प्रसादालयाकरीता उभारणी करण्यात येणारा सौर उर्जा प्रकल्प कार्यान्वीत होईपर्यन्त सध्याचे सौर उर्जा प्रकल्पाची देखभाल चालविण्याचे काम विनामुल्य करण्यास तयार आहेत.

तरी नवीन प्रसादालयाकडील सौर उर्जा यंत्रणा कार्यान्वीत होईपर्यन्त गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि.वलसाड यांचे विनंतीनुसार सध्याचे यंत्रणेची देखभाल व चालविण्याचे (सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट) काम विनामुल्य देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**विषय नं. ३६** **लाडू वाहतूकीसाठी ट्रॉलीज व एस.एस.क्रेट खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.७३७** श्रीसाईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना मोतीचुर लाडू प्रसाद पाकिटांची विक्री करण्यात येते. प्रसादालय विभामधुन विक्री काऊंटरपर्यंत वाहतुक व विक्री काऊंटरवर पाकिटे ठेवण्यासाठी प्लास्टिक क्रेटचा वापर करण्यात येतो. परंतू प्लास्टिक क्रेट जास्तीत जास्त एक वर्षभ्र टिकतात, उत्सवात व गर्दीचे काळात जादा वापराने ताबडतोब खराब होतात,चिरतात,फाटतात व पुन्हा नविन खरेदी करावी लागते.

प्लास्टिक क्रेट ऐवजी मे.साई इंजिनिअर्स,एम.आय.डी.सी.,नाशिक या कंपनीने स्टिल क्रेट तयार केलेले आहेत. सदर क्रेट जादा काळ टिकतील असे मत आहे. प्लास्टिक क्रेट वजन २.८०० किलो आहे व स्टिल क्रेटचे वजन ३.५०० किलो आहे. वजनात थोडा फरक जाणवेल परंतू मजबूत वाटतात. प्लास्टिक क्रेटची किंमत रुपये ४५०/- आहे. स्टिलचे क्रेटची किमंत रुपये १,०५०/- आहे. सदरचे स्टिल क्रेटची साईज निल कमल कंपनीचे क्रेट प्रमाणे आहे व मटेरिअल एसएस ३०४ चे असणार असून त्यास मिरर फिनिसिंगचे असेल असे सदरचे कंपनीने फॅक्सद्वारे कळविले आहे. तरी १०० स्टिल क्रेट प्रती नग रुपये १०५०/- प्रमाणे रुपये १,०५,०००/- इतका खर्च येईल.

तसेच सध्या लाडू वाहतूक लोखंडी हातगाड्यामार्फत केली जाते. परंतू सदरच्या गाड्या जादा वापराने खराब झालेल्या आहेत. मे.साई इंजिनिअर्स,एम.आय.डी.सी.,नाशिक यांचेकडून ४ x ३ फुट एमएम स्टिल मटेरिअलच्या ३ हातगाड्या प्रती नग रुपये १६०००/- प्रमाणे थेट खरेदी करण्यास रुपये ४८,०००/- इतका खर्च येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे १०० स्टिल क्रेट प्रत्येकी रुपये १०५०/- प्रमाणे रुपये १,०५,०००/- तसेच ४ x ३ फुट एमएम स्टिल मटेरिअलच्या ३ हातगाड्या प्रती नग रुपये १६०००/- प्रमाणे रुपये ४८,०००/- असे एकूण रुपये १,५३,०००/- चे खर्चास व सदरहू साहित्य मे.साई इंजिनिअर्स, एम.आय.डी.सी., नाशिक यांचेकडून थेट खरेदी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रमाणे आवश्यक असणारे स्टिल क्रेट व हातगाड्या विहित पद्धतीने कोटेशन मागवुन खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-कॅन्टीन विभाग प्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं. ३७ निकामी झालेले संगणक व प्रिंटर विक्री करणेबाबत.**

**निर्णय क्र.७३८** वैधानिक लेखपरिक्षक यांनी निकामी अनावश्यक साहित्य वेळचेवेळी मंजुरी घेऊन स्कॉक मधुन कमी करावे अशा सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार जा.नं.एसएसएस-वशी-अंलेप-२४७,२००७, दि.३.२.०७ व जा.नं.एसएसएस-वशी-दप्तर-१२०३,२००७, दि.१५.५.०७ नुसार डेडस्टॉकच्या वस्तू स्टॉकमधुन कमी करताना मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी,असे नमुद करण्यात आलेले आहे.

माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे विविध विभागांमध्ये संगणके देण्यात आलेली आहेत. या संगणकांपैकी खालील संगणके दैनंदिन वापरामुळे निकामी/खराब व कालबाह्य झालेली आहेत. तसेच तंत्रज्ञानात वेळोवेळी बदल झालेले असल्याने काही साहित्याचे उत्पादन बंद झाल्याने नादुरुस्त झालेली संगणके दुरुस्त करण्यासाठी आवश्यक असणारे स्पेअरपार्टस बाजारात उपलब्ध होत नसल्याने सदर संगणके स्टोअरमध्ये पडून आहेत.

| अ.नं. | संगणक कोड नं. | डेडस्टॉक पा.नं. | तपशील | नग | एकुण किंमती रुपये | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मुळ किंमत रुपये | घसारा वजा जाता |
| 01. | MCN/059 | 2/31 | ZENITH INTEL P-II | 06 | 2,40,000.00 | 43,385.00 |
| 02 | MCN/060 | 2/34 | EPSON LQ 2170 PRINTER | 01 | 31,000.00 | 5,604.00 |

उपरोक्तप्रमाणे संगणक व प्रिन्टर कोटेशन मागवुन उच्चतम दराने विक्री करण्यात यावी. तसेच विक्री नंतर सदर संगणक व प्रिन्टर ची नोंद माहिती तंत्रज्ञान विभागाचे मालमत्ता नोंदवहीतुन (डेड स्टॉक रजि.) कमी करण्यात यावे. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं. ३८ ज्या त्या वर्षातील २००४ पासूनचा शैक्षणिक फी परतावा, शैक्षणिक शुल्क समितीच्या व मा.हायकोर्ट, सुप्रिमकोर्टाचे आदेशाप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना देणे बाबत**

**निर्णय क्र.७३९** श्री.सुभाष कि. जगताप,प्र.अधिकारी व इतर एकुण २२० कर्मचाऱ्यांपैकी १९७ कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षरी असलेल्या दि.१४/०७/२००७ चे अर्जामध्ये "आम्हा कर्मचाऱ्यांची एक छोटीसी प्रलंबीत मागणी आहे व ती आपणच पुर्ण करु शकता याची आम्हाला जाणीव आहे. साहेब गेल्या तीन वर्षापासून आम्हा कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक फी परताव्याच्याबाबतचा निर्णय आपणाकडुन राहीलेला आहे यामध्ये ३१० कर्मचारी असून पुर्वीच्या नियमाप्रमाणे रुपये ६-७ लाखापर्यंत शैक्षणिक फी वाटप सरकारी कॉलेज व शाळा यांचे शासकीय फी प्रमाणे होते. परंतु आमचा पाल्य ज्या शाळेत कॉलेजात,ज्या वर्गामध्ये शिक्षण घेतो व त्या शाळा कॉलेजची कोर्सची, वर्गाची त्या विद्यार्थ्यास-पाल्यास प्रत्यक्ष भरावी लागणारी त्या त्या वर्षाची शैक्षणिक फी जर परतावा करावयाची असेल तर **रुपये २३-२४ लाख** इतकी प्रत्येक वर्षी होते, म्हणजेच १७-१८ लाख रुपयांचा फक्त फरक राहतो. त्यासाठी शैक्षणिक शुल्क समितीने शासनास तशा शिफरसीही केलेल्या आहेत. त्या मा.हायकोर्ट व मा. सुप्रिमकोर्ट यांनी मान्य करुन तसे आदेशही शासनास त्या त्या शैक्षणिक संस्थेस फी घेण्याचे आदेश दिलेले आहेत.

आपण मध्यंतरी निर्णय घेवुन शासनाच्या मंजुरीसाठी पाठविले आहे. मात्र शासनाने पुर्वीच्या नियमाप्रमाणे फी अदा करण्याचे निर्देश दिलेले आहेत व अंतिम निर्णय नंतर देणार आहेत, असे कळविले आहे. निर्णय सरकारी असल्याने लवकर होणार नाही व आम्ही कर्मचारी त्यापासून वंचीत राहु, करीता आपण गेल्या तीन वर्षात ज्या शैक्षणिक वर्गात जे पाल्य ज्या वर्षात शिक्षण घेत होते. त्या त्या वर्षाची शैक्षणिक फी त्या पाल्यास फरकासह शैक्षणिक शुल्क समिती ,मा.हायकोर्ट, मा.सुप्रिमकोर्टाच्या मार्गदर्शनाप्रमाणे प्रत्यक्ष भरलेल्या शैक्षणिक फीचा परतावा देणेबाबत माहे जुलै २००७ चे व्यवस्थापन मंडळ समितीच्या मिटींगमध्ये निर्णय घेऊन आम्हा ३१० कर्मचाऱ्यांवर झालेला अन्याय दुर करावा व ज्या त्या वर्षाच्या रक्कमा त्वरीत फरकासह थेट आम्हास अदा करण्याचे र्निणय व्हावेत, अशी विनंती केलेली आहे.

फी परतावा गत. मा.व्य.मं.चे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ शासनाने / विद्यापीठांनी केवळ गुणवत्तेच्या निकषावर (ऑन मेरीट बेसीस) भरण्यात येणा-या (सुमारे ५० टक्के पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारीत केलेल्या फी दर रक्कमे पर्यंत व इतर निर्णयानुसार फीचा परतावा अदा करण्यात येतो.

कर्मचा-यांच्या विनंतीनुसार त्यांचे पाल्यांच्या फी परतावा नियमावलीत बदल होणेबाबत मा.व्य.समितीचे **दि.१९/०८/२००६** रोजीचे सभेतील **निर्णय क्र.६२०**"शैक्षणिक फी धोरणाबाबत शासनाचे शिक्षण शुल्क समितीने ठरवून दिलेल्या नियमावलीप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना शैक्षणिक फीचा परतावा देणेकरीता शासनाची मान्यता घ्यावी, असा झालेला आहे. त्यानुसार शासनाचे मान्यतेसाठी इकडील जा.नं.वशी-६/३६६९/०७,दि.८ मार्च २००७ अन्वये पत्र दिलेले आहे. त्या पत्रास अनुसरुन शासनाने सासंवि २००७ /२४२/(६०) का सोळा,विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई, चे पत्रान्वये सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने विविध बाबींचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक

असल्याने व शैक्षणिक वर्ष सुरु होत असल्याने आपणांस विनंती आहे की, या विषयाबाबत शासनाकडुन कोणतेही स्पष्ट आदेश प्राप्त होईपर्यंत प्रचलित असलेली कार्यपध्दती,पूर्वीप्रमाणेच चालु ठेवण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत.

तसेच शासनाचे सासंवि २००७ /२४२/(६०) का सोळा,विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई, दि.२६ जुन २००७ चे पत्रान्वये संस्थानच्या किती कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी विचाराधीन कालावधीत, गुणवत्तेच्या आधारावर विद्यापीठात प्रवेश मिळविला आहे, याबाबत सविस्तर माहीती शासनास पाठविण्यात यावी," असे निर्देश दिलेले आहेत याबाबतची माहीती शासनास पाठविण्याची कार्यवाही चालु आहे.

तरी कर्मचाऱ्यांचा संदर्भिय अर्ज व शासनाचे पत्र यास अनुसरुन निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडून स्पष्ट आदेश प्राप्त होईपर्यन्त, वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांचे मागणीप्रमाणे शिक्षणशुल्क समितीने निश्चित केलेल्या शैक्षणिक शुल्काचा परतावा सन २००४-०५ पासून देण्यात यावा. जेथे शिक्षण शुल्क समितीने शुल्क निश्चित केलेली नाही त्या ठिकाणी शासन/शासनमान्य विद्यापीठ यांनी ठरविलेले शिक्षण शुल्क विचारात घ्यावे. इतरत्र पूर्वीचे नियमाप्रमाणे परतावा देण्यात यावा. तसेच सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासून अनुत्तीर्ण पाल्याचे शैक्षणिक फीचा परतावा फक्त त्या वर्षापुरता देणेत येऊ नये, असे ठरले. (कार्यवाही -प्रशासनशाखा-०३)

**विषय नं. ३९ श्री.सचिन एन शानभाग ॲडव्होकेट हायकोर्ट,मुंबई यांना संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नियुक्ती देणे बाबत**

**निर्णय क्र.७४०** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे कोपरगांव अहमदनगर व औरंगाबाद खंडपीठ येथे वेगवेगळया प्रकारची दिवाणी,फौजदारी,तसेच कामगार विषयक न्यायालयीन प्रकरणे चालू आहेत.

सदर चे कामी मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने खालील प्रमाणे ॲडव्होकेटस् च्या ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

**१) कोपरगांव कोर्ट :-**सर्वश्री.ॲड.,पी.डी.गुजराथी, डी.डी.कुलकर्णी, डी.व्ही. वझे, जे.के.गोंदकर, रमेशचंद्र ठोळे, एस.एम.वाघ,राजेश नाईक,बाळासाहेब कोते, (विनामोबदला) पी.डी.गुजराथी, एस.डी. कुलकर्णी, प्रशांत बावके,मच्छिंद्र खिलारी,

**०२) अहमदनगर कोर्ट :-** सर्वश्री.ॲड.अशोक पाटील, एन.जी.तांबोळी, ए.आर.गाडेकर,प्रसन्ना बिंगी,संजय सलालकर,अविनाश बोठे

**०३) मुंबई हायकोर्ट (बेंच औरंगाबाद ) :-** सर्वश्री. ॲड. आर.एन.धोर्डे, अनिल बजाज, विनायक होन,राजेंद्र रघुवंशी,नितीन भवर, बाबासाहेब वाघ,संदीप गोंदकर,

०१) **मुंबई हायकोर्ट :-** सर्वश्री ॲड.कुलदिप एस.पाटील,ॲड.विनोद शहा (करीया),मुंबई

तसेच यांचेबरोबरच ॲड. अनिल गमे यांची राहाता तसेच ॲड. आर.के.वाघ यांची राहाता,कोपरगांव,श्रीरामपूर,अहमदनगर,औरंगाबाद खंडपीठ व ॲड. मिनाक्षी जयस्वाल ठाणे यांची हायकोर्ट मुंबई या ठिकाणी संस्थानविषयक कायदेशीर कामे पहाणेसाठी कायदेशीर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

आता,ॲड.सचिन शानभाग ॲड.(हायकोर्ट ) मुंबई यांनी दि.०९/०४/२००७ रोजी अर्ज केला असून त्यात-I am very please to inform you that I am forwording herewith my profile for your perusal and record. I am practicing in the Hon'ble Bombay High Court and subordinate court to the Bombay High Court from last nine years, details of the same I have mentioned in my profile atteached herewith. It's great pleasure for me to afford my services for the Shirdi Sai Santhan with whom me and my family members already attached from our heart and devotions and getting blessings from Shree Sai Baba in all our day to day matters.

Looking to all the abovementioned fact and considering my experience as mentioned in my profile, I am requesting you to kindly put my name on your legal panel for the proposal of proposed redevelopment project at Dadar Matunga Estate in the building known as Sai Niketan, so that I can devote my services to Shirdi Sai Samsthan and will be part for getting blessings of Shri Sai Baba and become member of Shirdi Sai Sansthan.

Awaiting for the favorable and positive reply from your end अशी विनंती केली असून सदर अर्जावर मा. अध्यक्ष महोदय यांनी श्री शानभाग यांची नेमणूक करावी असे अभिप्राय दिले आहेत.

ॲड. सचिन शानभाग, मुंबई यांचे अर्जातील विनंती व मा. अध्यक्ष यांचे अभिप्राय विचारात घेऊन वरील प्रमाणेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी संबंधीत मुंबई हायकोर्टातील न्यायालयीन दावे चालविणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस ॲड.सौ.नंदा संजय लहाडे,कोपरगाव यांनी त्यांचे दि.१ सप्टेंबर,२००७ चे पत्रान्वये तसेच ॲड.श्री.नितीन विखे, लोणी यांनी त्यांचे दि.१७ सप्टेंबर,२००७ चे अर्जान्वये संस्थानचे ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेबाबत विनंती केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲड.सौ.नंदा संजय लहाडे,कोपरगाव व ॲड.श्री.नितीन भगवंतराव विखे,लोणी यांनाही संस्थानचे ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक देण्यात यावी,असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

**विषय नं. ४०** **डॉ.राजेश काशिनाथ बावस्कर,स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ यांना मुदतवाढ देणे बाबत.**

**निर्णय क्र.७४१** याबाबत निर्णय क्र.७४५ मध्ये चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला आहे.(कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

**विषय नं. ४१** **आस्थापना विभागाकरीता फाईल्स खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.७४२** संस्थानच्या आस्थापनेवर नियत वेतनावर व श्री साईबाबा हॉस्पीटलकडील नविन नेमणुका करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे नोकरी मिळणेबाबत अर्ज, नेमणुक आदेश, कामावर हजर रिपोर्ट, जातीचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक प्रमाणपत्र, मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट, वार्षिक पगारवाढ आदेश, कर्मचारी गैरवर्तन रिपोर्ट, वैयक्तिक माहिती फार्म, पी.एफ.संबंधी कागदपत्रक, गोपनीय कागदपत्रक इत्यादी आवश्यक कागदपत्रकांची माहिती संस्थान कार्यालयीन कामकाजाकरीता एकत्रित करुन व्यवस्थीत जतन करुन ठेवणेकामी फाईलची आवश्यकता आहे.

सध्या नव्याने नियत वेतनावर नेमणुका करण्यात आलेल्या व श्री साईबाबा हॉस्पीटलकडील नविन नेमणुका करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे महत्वाचे कागदपत्रके एकत्रित ठेवणेकामी जेवढया फाईल्स उपलब्ध होत्या, त्या तयार करण्यात आलेल्या आहेत.परंतू फाईल संपलेल्या असल्याकारणास्तव उर्वरीत कर्मचाऱ्यांचे महत्वाचे कागदपत्र फाईल्स अभावी एकत्रित गठ्ठे करुन बांधून ठेवण्यात आले आहे. त्यामुळे एखादा महत्वाचा कागद गहाळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्याकरीता चांगल्या प्रकारच्या जाड कागदाच्या दीर्घकाळ टिकाऊ व त्यामध्ये जादा महत्वाचे कागद बसतील अशा फाईल्स खरेदी करणे आवश्यक आहे.

तसेच पुर्वीचे कायम असलेले १०५० कर्मचाऱ्यांच्या पर्सनल फाईल हया बऱ्याच दिवसापूर्वी खरेदी करण्यात आलेल्या असून त्या साध्या पातळ पुठ्ठयाच्या असून त्यामध्ये कमी कागदपत्र बसतात. फाईलचा पुठ्ठा पातळ असल्याने नेहमीचे कार्यालयीन वापरामुळे फाईल जिर्ण होऊन फाटलेल्या आहेत. तसेच ज्या कर्मचाऱ्यांचे कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन ज्यादा रिपोर्ट झालेले आहेत, अशा कर्मचाऱ्यांचे गैरवर्तनबाबतचे कागद एकाच फाईलमध्ये बसत नसल्यामुळे त्यांचे करीता दोन ते तीन वेगळया पर्सनल फाईल बनविलेल्या आहेत. सध्याच्या जुन्या असलेल्या पर्सनल फाईल जास्त खराब झाल्यामुळे त्यातील महत्वाचे कागद फाटण्याचे किंवा गहाळ होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने जुन्या कर्मचाऱ्यांच्या सर्वच पर्सनल फाईल बदलणे आवश्यक असल्याने पुर्वीचे कायम असलेले १०५० कर्मचारी व नियत वेतनावर नेमणुका करण्यात आलेले १०५२ कर्मचारी तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलकडील नविन नेमणुका केलेले अंदाजे ३०० कर्मचारी असे एकुण २४०२ कर्मचाऱ्यांकरीता व पुढील नजीकच्या काळात अंदाजे ५०० कर्मचाऱ्यांचे संख्येत वाढ झाल्यास असे एकुण ३००० नग फाईल्स खरेदी करणे आवश्यक आहे.

<u>आवश्यक असणाऱ्या फाईलचे वर्णन</u> :-

०१) संस्थेचे नांव :- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी ),
०२) फाईल बोर्ड :- दोन फाईल बोर्ड पेस्टींग,
०३) चारही बाजुस बाईडींग क्लाथची पट्टी,
०४) रुंदी १०.६ इंच x उंची १४.६ इंच x जाडी १ इंच (स्पाईन ),
०५) इंपोरटेड क्लिप,
०६) रुंदी २० से.मी. x उंची १३ से.मी.(जॅकेट ) झिकझॅक फोल्डींग आतल्या पानावर (पहिल्या पानाचे आतील बाजूस )

संस्थानचे कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टिने महत्वाचे व गोपनीय कागदपत्रक ठेवणेकामी व नित्याचे वापराने फाईल्समधील महत्वाचे कागदपत्रक खराब होणार नाहीत, तसेच त्यामध्ये कागदाची संख्या जास्त बसतील, अशा प्रकारच्या फाईल खरेदीकामी अंदाजे रुपये -२५/- प्रती नग या दराप्रमाणे ३,००० नग फाईल्स खरेदीकामी अंदाजे रुपये-७५,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे आस्थापनेवर असणाऱ्या कर्मचाऱ्याचे महत्वाचे कागदपत्रक ठेवणेकामी ३,००० नग फाईल्स कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी अंदाजे रुपये- ७५,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं. ४२** **श्रीमती अनिता मधुकर दाभाडे व श्रीमती सुनिता राजाराम कर्पे-वर्ग४ कर्मचारी यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणे बाबत**

**निर्णय क्र.७४३** याबाबत आस्थापना उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा,असें ठरलें.(कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

**विषय नं. ४३ श्रीसाईबाबा हॉस्पीटल वैद्यकिय अधिकारी व पॅरामेडीकल स्टाफ मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.७४४** श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी करीता मा. सचिव विधी व न्याय विभाग महाराष्ट्र राज्य शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या श्री साईबाबा हॉस्पीटल वैद्यकिय अधिकारी व पॅरामेडीकल स्टाफ यांचे मंजूरीस अधिन राहून खालील प्रमाणे वैद्यकिय अधिकारी/ पॅरामेडीकल स्टाफ च्या एक वर्ष कालावधीसाठी नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. संबंधीतांचा नेमणूकीचा कालावधी त्यांचे नांवासमोर दशविलेल्या तारखेअखेर सपुष्ठात येत आहे. त्यांना पुढील मुदतवाढ देणेकामी वैद्यकिय संचालक यांचेकडून कामाचा अहवाल मागविण्यात आला होता. वैद्यकिय संचालक यांनी त्यांचे कामाबाबतचा अहवाल त्यांचे दि. ०७/०९/२००७ चे पत्रान्वये खालील प्रमाणे दिला आहे.

| अ.नं. | नांव व पदनाम | नेमणूक दिनांक | ०१ वर्ष कालावधी संम्पुष्ठात येत असलेची तारीख | कामाबाबतचा अहवाल /अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. नंदा राजपाल असो.कन्सलटंट (अनेस्थेशिया ) | २२/०९/२००६ | २१/०९/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ०२. | डॉ. रितेशकुमार शर्मा , क्लिनीकल असिस्टंट (स्त्रीरोग व प्रसूती ) | ०१/०९/२००६ | ३१/०८/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ०३ | डॉ.किरण रा. गोरे, क्लिनीकल असिस्टंट (जनरल सर्जरी ) | १८/०९/२००६ | १७/०९/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ०४. | डॉ. सचिन दि. खोचीकर क्लिनीकल असिस्टंट (अनेस्थेशिया) | ११/१०/२००६ | १०/१०/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ०५. | डॉ.अनघा ग. विखे, वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ. ) | २८/०८/२००६ | २७/०८/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ०६. | डॉ. अनिता अशोक ढोले, वै.अधिकारी (आर.एम.ओ) | ०२/०९/२००६ | ०१/०९/२००७ | जा.नं.एसएसएस/वशी-१/१३९८४/२००७दि.३१/०८/२००७ अन्वये संस्थान आस्थापनेवरुन नांव कमी |
| ०७. | डॉ. गायत्री ह. बोंडे वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ.) | ०१/०८/२००६ | ३१/०७/२००७ | जा.नं.एसएसएस/वशी-१/१३९८५/२००७दि.३१/०८/२००७ अन्वये संस्थान आस्थापनेवरुन नांव कमी |
| ०८. | डॉ. दिपक व. महाजन वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) | ०३/०८/२००६ | ०२/०८/२००७ (२२/०८/२००७पासून राजीनामा मंजूर) | दि. २२/०८/२००७ पासून राजीनामा मंजूर झालेला आहे. |
| ०९ | डॉ. ज्योती भानुदास पंडीत व.अधिकारी (आर.एम.ओ) | १४/०८/२००६ | १३/०८/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| १०. | डॉ.दिपाली द. गोसावी, वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) | ०१/०९/२००६ | ३१/०८/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ११. | डॉ. सुरेखा मु. शिंदे , वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ.) | ०१/०९/२००६ | ३१/०८/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| १२. | डॉ.शितल स. उंडे वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) | ०२/०९/२००६ | ०१/०९/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| १३. | डॉ. राजश्री ता. शिंगारे, वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ. ) | ०४/०९/२००६ | ०३/०९/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| १४. | डॉ. राहुल न. मिरवणकर, वैद्यकिय अधिकारी | ०७/०९/२००६ | ०६/०९/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (आर.एम.ओ.) | | | काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| १५. | डॉ.सुनिता श. कडू(मिरवणकर) वै. अधिकारी (आर.एम.ओ.) | ०७/०९/२००६ | ०६/०९/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| १६. | डॉ.दिपक भा. कांदळकर वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ. ) | ०७/०९/२००६ | ०६/०९/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| १७. | डॉ. अश्विनी भा. राजगुरु वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ.) | २५/०९/२००६ | २४/०९/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| १८. | श्री. कानिफनाथ मा. पवार, मार्केटिंग मॅनेजर | २३/०८/२००६ | २२/०८/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| १९. | डॉ. संतोष बी. सुरवसे क्लिनीकल असिस्टंट(अॅनेस्थेशिया ) | ०१/१०/२००६ | ३०/०९/२००७ | सदर उमेदवाराचे काम उत्तम असून त्यांची वर्तणूकही उत्तम आहे.तसेच ते हूकुमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत.किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |

**वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी यांचे उपरोक्त अभिप्रायानुसार :-**

अ.नं. (०६) डॉ. अनिता ढोले (०७) डॉ. गायत्री बोंडे व अ.नं. (०८) डॉ.दिपक महाजन यांनी संस्थान सेवेचा राजीनामा दिला असल्याने त्यांचे राजीनामा तारखेपर्यंत त्यांची मुदत वाढ देणेस उर्वरित अ.नं. १ ते ५ व अ.नं. ०९ ते १९ वरील वैद्यकिय अधिकारी तसेच पॅरामेडीकल कर्मचारी यांचेबाबत वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे अभिप्रायानुसार त्यांचे नेमणूकीची मुदत एक वर्षाकरीता वाढविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं. ४४ श्रीसाईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटकडील वैद्यकीय अधिकारी नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र.७४५** श्रीसाईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटकडे वैद्यकिय अधिकारी पूर्ण वेळ तसेच आर.एम.ओ/ कन्सलटंट /अॅनेस्थेशियालॉजीस्ट या पदावर नोकरी मिळणेबाबत खालील प्रमाणे उमेदवारांनी अर्जाद्वारे विनंती केली होती.

वैद्यकीय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल व वैद्यकिय अधिक्षिका श्री साईनाथ हॉस्पीटल यांनी वेळोवेळी दिलेल्या अभिप्रायानुसार संबंधीत उमेदवारांच्या मा.सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे श्री साईबाबा हॉस्पीटल वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत पद व वेतनश्रेणी निहाय मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधास मंजूरीचे अधीन राहून,खालीलप्रमाणे नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

| अ. नं. | वैद्यकीय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. प्राची वसंत पवार, नाशिक | एमएस/ (ऑप्थॉल्मालॉजी) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२५७८/०७ दि.११/०८/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | Visiting Consultant in Opththlomogist |
| ०२. | डॉ. प्रशांत सयाजी खर्डे कोल्हार | एम.बी.बी.एस. (आर.एम.ओ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२५७९/०७ दि.११/०८/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | आर.एम.ओ. |
| ०३. | डॉ. क्रांतीकुमार आर. राठोड मुंबई | एम.डी. (रेडीओलॉजी ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२९२५/०७ दि.१६/०८/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | Visiting Consultant in Vascular & Interventional Radiology |
| ०४. | डॉ. प्रशांत पंडीत पवार नाशिक | एम.बी.बी.एस (एम.डी.) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४०१७/०७ दि.३१/०८/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | Jr. Anaesthesiologist |
| ०५. | डॉ. अस्मिता रा. जोंधळे श्रीरामपूर | एम.बी.बी.एस. (स्त्रीरोग व प्रसूती) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४३७९/०७ दि.१०/०९/२००७ श्री. साईनाथ हॉस्पीटल | आर.एम.ओ |
| ०६. | डॉ. सारीका के.काळे मांडवे संगमनेर | एम.बी.बी.एस. (डि.ए) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७७४/०७ दि.१४/०९/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | Jr. Anaesthesiologist |
| ०७. | डॉ. राजेश बावस्कर वर्धा | एम.डी (स्त्री-रोग व प्रसूती) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/२४७६/०७ दि. १४/०९/२००७श्री. साईनाथ हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी (स्त्री रोग व प्रसूती तज्ञ ) एकत्रित वेतन रु.२१०००/- |

तरी उपरोक्त श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटकडे वैद्यकिय अधिकारी/ आर.एम.ओ./असो व्हीजीटींग कन्सलटंट/अॅनेस्थेशियालॉजीस्ट या पदावर केलेल्या नेमणूकास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **माहे सप्टेंबर,२००७ अखेर उपलब्ध रकमेच्या गुंतवणूकीविषय निर्णय घेणे**

**निर्णय क्र.७४६** **( अ )** संस्थानच्या बचत खात्यामध्ये सध्या १० कोटीच्या पुढे रक्कम शिल्लक आहे. शिल्लक असलेल्या रकमेपैकी साधारणतः दैनंदिन खर्च व मोठयाप्रमाणातील ठेकेदारांची देयके यासाठी रक्कम राखुन ठेवुन साधारणतः रु.७ कोटी पर्यंत रक्कम माहे सप्टेबर,२००७ पर्यंत गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकेल. सदरची उपलब्ध असलेली रक्कम ही नियमित सेवा देणा-या बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवा मिळविता येतील असे नम्र मत आहे. विश्वस्तव्यवस्थेचे सन २००५-२००६ चे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले आहे.

संस्थानला प्रामुख्याने खालील बँकांकडून मोठयाप्रमाणात सेवा मिळतात :-

०१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०३) आंध्र बँक, शिर्डी
०४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
०६) बँक ऑफ बरोडा, नासिक

उपरोक्त बँकांकडून व्याजदर मागविण्यात आलेले आहेत.

( ब ) आंध्र बँक, शिर्डी यांचेकडे संस्थानचे नित्य प्रसादालय अन्नदान योजना या नांवाने खाते असुन, या खात्यात रक्कम रु.२० लाख इतकी शिल्लक आहे. या योजनेअंतर्गत त्यातील अटी व तरतूदीनुसार सदरची रक्कम ही आंध्र बँकेकडेच त्यांचेकडील प्रचलीत उच्चतम व्याजदराने गुंतवावी लागणार असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरची बचत खात्यात असणारी रक्कम उपलब्धतेप्रमाणे सप्टेबर,२००७ नंतर उपरोक्तपैकी उच्चतम व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकेकडे गुतविण्यात यावी. तसेच संस्थानचे नित्य प्रसादालय अन्नदान योजनेअंतर्गत रुपये २० लाख रक्कम प्रचलित उच्चतम व्याजदराने आंध्र बँक,शिर्डी यांचेकडे गुंतविण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्रींचे समाधी मंदीर,गुरुस्थान,द्वारकामाई व चावडीत फुलांचे डेकोरेशन करणेस परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७४७** साईभक्त श्री कुमार जी बँगलोर यांनी दिनांक ०६/०९/२००७ रोजी फॅक्स पाठवून गुरुवार दि.०४/१०/२००७ रोजी श्रींचे समाधी मंदिर,गुरुस्थान ,व्दारकामाई व चावडी येथे श्रीचे सेवा म्हणून रंगित फुलांचे डेकोरेशन करण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे.व त्यासाठी परवानगी मागितली आहे.यापुर्वी त्यांनी डेकोरशन केलेले आहे.सदरचे डेकोरशन हे दिनांक ०४/१०/२००७ रोजी गुरुवारी करणार आहेत.

त्यांना मागील वर्षी परवानगी दिलेली होती. मात्र ४ ऑक्टोबर रोजी संस्थानचा कोणताही उत्सव अगर विषेश पर्व नाही. त्यांना कुणाचे तरी स्मृतिप्रित्यर्थ अगर वाढदिवसा निमीत्त फुलांची सजावट करावयाची अगर कसे याचा बोध होत नाही. दरवर्षी ही नविनच प्रथा पडू शकेल. फार तर गोकूळ अष्टमी,दत्त जयंती , किंवा महाशिवरात्री या प्रसंगी परवानगी देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री कुमार जी बँगलोर यांची श्रींचे समाधी मंदीर,गुरुस्थान,द्वारकामाई व चावडीत फुलांचे डेकोरेशन करणेस परवानगी मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-मंदिर विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **नविन श्रीसाई प्रसादालय परिसराचे लॅण्डस्केपिंगसाठी झाडे-रोपे.माती (पोयटा) व हिरवळ (लॉन) खरेदीकामी केलेल्या कार्यवाहीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७४८** **(अ-१)**नवीन प्रसादालय इमारतीचे परिसरातील लॅण्डस्केपिंग संदर्भात मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ जुलै, २००७ रोजीचे सभेत दिनांक ०३ जुलै, २००७ रोजीच्या प्रसादालय उपसमितीच्या शिफारशीस मान्यता देणेबाबतचा निर्णय क्रमांक ५१७ खालीलप्रमाणे झालेला आहे :

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तपैकी रुपये २,४५,६०५.०० मात्र अपेक्षित खर्चाचे इलेक्ट्रिफिकेशन काम संबंधित विभागामार्फत सध्याचे विद्युत ठेकेदारांकडून मंजूर निविदा दरात करुन घेण्यात यावे. तसेच बगीचा व फौंटनचे काम संबंधीत विभागामार्फत निविदा अथवा कोटेशन्स मागवून करण्यात यावे. सिव्हील वर्क व वॉटर सप्लायचे काम आय.व्ही.आर.सी.एल. यांचेकडून त्यांचे मंजूर

निविदा दरात करुन घ्यावे. त्यासाठी येणारे योग्य त्या खर्चास मंजूरी देण्यात यावी. तसेच बगीचा साठी आवश्यक रोपे खरेदीकामी मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव व मा.सौ.सुमित्रा कैलास कोते यांनी राजमंड्री येथे, विमानाने (पुणे/हैद्राबाद/राजमंड्री/मुंबई) व संस्थान कर्मचारी यांनी संस्थान वाहनाने जाऊन, अमृता पवार यांचे मार्गदर्शनाखाली रोपे खरेदी करावे. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

या निर्णयांस अनुसरुन, मा. विश्वस्त श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव, विषयांकित कामाच्या आर्किटेक्ट अमृता पवार, नाशिक व बगीचा विभागातील कर्मचारी यांनी दिनांक २३ जुलै, २००७ रोजी राजमंड्री (आंध्रप्रदेश) येथील विविध नर्सरींना भेट देऊन लॅण्डस्केपिंगसाठी आवश्यक असणाऱ्या रोपांची माहिती घेतली. तद्नंतर आर्किटेक्ट अमृता पवार, नाशिक यांनी राजमंड्री येथे नर्सरींना भेट दिल्याचा अहवाल व अंदाजित रक्कम रुपये १८,९८,२९९/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन दिले. या खर्चात रोपे, लॉन, माती, औषधे व खते यांचा समावेश केलेला आहे. तथापि राजमंड्री येथील नर्सरीतून आणावयाच्या रोपांच्या वाहतूकीचा खर्च यात समावेश केलेला नव्हता. वाहतूक खर्चापोटी रक्कम रुपये १,५०,०००/- मात्र इतका अंदाजित गृहीत धरुन एकूण अंदाजित रक्कम रुपये २०,४८,३७१/- मात्र खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ११ ऑगष्ट, २००७ रोजीचे सभेत सादर करण्यात आलेला होता. सदरहू सभेत या प्रस्तावावर निर्णय क्रमांक ६९२ खालीलप्रमाणे झालेला आहे :

" याकामी अंदाजे रक्कम रु.२०,४८,३७१/- (रु.वीस लाख अठ्ठेचाळीस हजार तीनशे एकात्तर) मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

तसेच नवीन प्रसादालय इमारतीचे उद्‌घाटन करण्याचे नियोजित आहे. त्यामुळे प्रसादालय इमारतीचा परिसर सुशोभिकरण करणे अत्यंत तातडीचे व आवश्यकतेचे आहे. मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव व आर्किटेक्ट अमृता पवार यांनी सुचविल्याप्रमाणे विविध ७५ प्रकारची झाडे/ रोपे रितसर दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन न्यूनतम दराने खरेदी करणेस मान्यता देण्यात आली. याकामी निर्णय घेण्याचे अधिकार मा.अध्यक्ष यांना प्रदान करण्यात आले.

**(अ-२)** उपरोक्त दोन्ही निर्णयांनुसार आंध्रप्रदेशातील इनाडू या वर्तमानपत्रात तसेच संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर रोपे खरेदीबाबतची जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन दिनांक ०७ सप्टेंबर, २००७ अखेर दरपत्रके मागविण्यात आली. या जाहिरातीस अनुसरुन आंध्रप्रदेशातील खालील ०५ नर्सरींची दरपत्रके मुदतीअखेर प्राप्त झाली होती. प्राप्त झालेली ०५ दरपत्रके मा.अध्यक्षसाो. व मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेली आहेत.

| अ.नं. | रोपे पुरवठाधारकाचे नांव | आवक नंबर | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| 01 | Sri Rama Nursery, Kadiapulanka (M.Krishna Murthy) | 29922 | 06/09/2007 | E_mail |
| 02 | Vijaya Sai Durga Nursery, Vemagiri (Nageswara Rao) | 30001 | 07/09/2007 | E_mail |
| 03 | Hemagiri Nursery, Dawaleswaram (D.Ravi) | 30004 | 07/09/2007 | Closed Envelop |
| 04 | Adilakshmi Nursery, Kadian (K.Veeraju) | 30083 | 07/09/2007 | Closed Envelop |
| 05 | Palla Venkanna Hearty Cultural Farms, Kadiyapulanka (Ch.Johu) | 30084 | 07/09/2007 | Closed Envelop |

**(अ-३)** उपरोक्तप्रमाणे विषयांकित लॅण्डस्केपिंगसाठी रोपे खरेदीकामी प्राप्त झालेल्या व **परिच्छेद अ-२** मध्ये नमूद केलेल्या एकूण ०५ निविदाधारकांच्या दरपत्रकांचा सविस्तर तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला. या तुलनात्मक तक्त्यानुसार निविदाधारकांच्या दरपत्रकांतील बाबींनुसार एकूण रक्कमेचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :

| अ.नं. | रोपे पुरवठाधारकाचे नांव | एकूण रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|
| 01 | Sri Rama Nursery, Kadiapulanka (M.Krishna Murthy) | 11,29,320/- | Plus Transport Charges Extra |
| 02 | Vijaya Sai Durga Nursery, Vemagiri (Nageswara Rao) | 06,98,623/- | Plus Transport Charges Extra |
| 03 | Hemagiri Nursery, Dawaleswaram (D.Ravi) | 27,28,615/- | Plus Transport Charges Extra |
| 04 | Adilakshmi Nursery, Kadian (K.Veeraju) | 18,58,503/- | Plus Transport Charges Extra |
| 05 | Palla Venkanna Hearty Cultural Farms, Kadiyapulanka (Ch.Johu) | 15,06,245/- | Plus Transport Charges Extra |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यात दर्शविलेल्या निविदाधारकांच्या दरांचा विचार करता,

०१. अ. क्र. ०२ चे Vijaya Sai Durga Nursery, Vemagiri यांचे दर सर्वात न्यूनतम आहेत. तथापि त्यांनी निविदेतील एकूण ७५ रोपांपैकी विविध २० रोपांचे (६४५८ नग) दर दिलेले नाहीत. त्यांची निविदा अपूर्ण असल्याने त्यांनी दिलेल्या दरांचा विचार करण्यात आलेला नाही.

०२. अ. क्र. ०२ वगळतां, उर्वरित ०४ पुरवठाधारकांपैकी अ. क्र. ०१ चे Sri Rama Nursery, Kadiapulanka यांचे दर सर्वात न्यूनतम आहेत. तसेच त्यांनी त्यांचे पत्रात असे नमूद केले आहे की, मी साईभक्त असून, संस्थानला लागणारी रोपे नफा न कमावता पुरविण्यास तयार आहे. तसेच रोपे लागवडीसाठी मजुरांची आवश्यकता पडल्यास मजुर ही पुरविण्यास तयार आहे. रोपांचे दिलेले दर अत्यंत वाजवी आहेत तथापि दिलेले दर हे वाहतूक दराव्यतिरिक्त आहेत. तसेच निविदेतील वर्णनाप्रमाणे रोपे पुरविण्यास तयार आहे.

वरील बाबींचा विचार करुन, बगीचा विभागाकडील दिनांक १२ सप्टेंबर, २००७ च्या मंजूर टिपणीन्वये, नवीन प्रसादालय परीसरातील लॅण्डस्केपिंगसाठी आवश्यक असणारी विविध प्रकारची शोभेची झाडे / रोपे अ.क्र.०१ चे न्यूनतम दरधारक Sri Rama Nursery, Kadiapulanka यांचेकडून त्यांनी दिलेल्या न्यूनतम दराने खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम **रुपये ११,२९,३२०/- मात्र (अधिक वाहतूक खर्च अतिरिक्त)** पर्यन्तचे खर्चास मान्यता मा.अध्यक्षसाो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार Sri Rama Nursery, Kadiapulanka यांना दिनांक २० सप्टेंबर, २००७ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

**(ब)** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ११ ऑगष्ट, २००७ रोजीच्या निर्णय क्रमांक ६९२ अन्वये नवीन प्रसादालय इमारतीच्या परिसरातील लॅण्डस्केपिंगसाठी आवश्यक असणाऱ्या अंदाजे ३५० ब्रास पोयटा (माती) खरेदीकामी रक्कम रुपये २,७५,०००/- मात्र पर्यन्तचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार स्थानिक पोयटा (माती) पुरवठाधारकांकडून पोयटा (माती) पुरविणेकामी दरपत्रके मागविण्यांत आलेली होती. खालील तक्त्यात नमूद केलेली एकूण ०४ निविदाधारकांची दरपत्रके प्राप्त झालेली होती. सदरहू प्राप्त झालेली दरपत्रके मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमक्ष दिनांक ०८ सप्टेंबर, २००७ रोजी उघडणेत आली.

त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | दर प्रति ब्रास | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.सोपान परशराम गिधाड, राहाता | रुपये ५६०/- | शिर्डी पोहच |
| ०२ | श्रीमती सुरेखा तुळशीराम रोकडे, शिर्डी | रुपये ४१४/- | शिर्डी पोहच |
| ०३ | श्री. जितेंद्र दिगंबर कोते, शिर्डी | रुपये ३९९/- | शिर्डी पोहच |
| ०४ | श्री. बाबासाहेब रामनाथ तुरकणे, पिंपळवाडी | रुपये ५४०/- | शिर्डी पोहच |

वरील तुलनात्मक दरांचा विचार करुन, बगीचा विभागाकडील दिनांक ११ सप्टेंबर, २००७ च्या मंजूर टिपणीन्वये, नवीन प्रसादालय परीसरातील लॅण्डस्केपिंगसाठी आवश्यक असणारा ३५० ब्रास पोयटा (माती) पुरवठा करणेकामी अ. क्र. ०३ चे न्यूनतम दरधारक श्री. जितेंद्र दिगंबर कोते, शिर्डी यांचेकडून त्यांनी दिलेल्या न्यूनतम दराने म्हणजेच रुपये ३९९/- मात्र दर प्रति ब्रास या दराने खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम **रुपये १,३९,६५०/- मात्र** पर्यन्तचे खर्चास मान्यता मा.अध्यक्षसाो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री. जितेंद्र दिगंबर कोते, शिर्डी यांना दिनांक २० सप्टेंबर, २००७ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

**(क)** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ११ ऑगष्ट, २००७ रोजीच्या निर्णय क्रमांक ६९२ अन्वये नवीन प्रसादालय इमारतीच्या परिसरातील लॅण्डस्केपिंगसाठी आवश्यक असणारी हिरवळ (लॉन लादी - १ फुट बाय १ फुट या आकाराची ) अंदाजे १०६४० नग खरेदीकामी रक्कम रुपये १,८०,८८०/- मात्र पर्यन्तचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार नाशिक परिसरातील हिरवळ (लॉन) नर्सरी पुरवठाधारकांकडून हिरवळ (लॉन) पुरविणेकामी दरपत्रके मागविण्यांत आलेली होती. खालील तक्त्यात नमूद केलेली एकूण ०५ निविदाधारकांची दरपत्रके प्राप्त झालेली होती. सदरहू प्राप्त झालेली दरपत्रके मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमक्ष दिनांक १४ सप्टेंबर, २००७ रोजी उघडणेत आली.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | दर प्रति लादी (सर्व करांसहित व वाहतुकीसह) | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | प्रसाद नर्सरी, नाशिक | रुपये १७/- | शिर्डी पोहच |
| ०२ | पापायज् नर्सरी, नाशिक | रुपये १२/- | शिर्डी पोहच |
| ०३ | तपोवन नर्सरी, नाशिक | रुपये १०.७५ पै. | शिर्डी पोहच |
| ०४ | बाबुलाल नर्सरी, नाशिक | रुपये १२/- | शिर्डी पोहच |
| ०५ | अनुराधा नर्सरी, नाशिक | रुपये १८/- | शिर्डी पोहच |

वरील तुलनात्मक दरांचा विचार करुन, बगीचा विभागाकडील दिनांक ११ सप्टेंबर, २००७ च्या मंजूर टिपणीन्वये, नवीन प्रसादालय परीसरातील लॅण्डस्केपिंगसाठी आवश्यक असणारी हिरवळ (लॉन लादी - १ फुट बाय १ फुट या आकाराची ) १०६४० नग पुरवठा करणेकामी अ. क्र. ०३ चे न्यूनतम

दरधारक तपोवन नर्सरी, नाशिक यांचेकडून त्यांनी दिलेल्या न्यूनतम दराने म्हणजेच रुपये १०.७५ पैसे मात्र प्रति लादी या दराने खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम **रुपये १,१४,३८०/- मात्र** पर्यन्तचे खर्चास मान्यता मा.अध्यक्षसो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार तपोवन नर्सरी, नाशिक यांना दिनांक १७ सप्टेंबर, २००७ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

**(ड)** वरील **परिच्छेद अ, ब** व **क** मध्ये विवेचन केल्यानुसार, नवीन श्री साई प्रसादालय इमारतीचे परिसराचे लॅण्डस्केपिंग करणेसाठी झाडे-रोपे, पोयटा (माती) व हिरवळ (लॉन) खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ११ ऑगष्ट, २००७ रोजीचे निर्णयांनुसार मा.अध्यक्षसाो. यांचे मान्यतेने कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे. त्याची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/बगीचा विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **शिर्डी ते साकुरी रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत करणे बाबत.**

**निर्णय क्र.७४९** **अ)**मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४ मार्च, २००६ रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन, शिर्डी ते साकुरी (उपासनी महाराज ते गोदावरी वसाहत मार्गे) या २.५० किलोमीटर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विश्वस्त निधीतून करणे बाबत मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडेस दिनांक १५ मार्च २००६ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या उपरोक्त प्रस्तावास, विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि- २००६/२७५/(४५)- का.सोळा, दिनांक २१/०७/२००७ रोजी मान्यता मिळालेली आहे.

या निर्णयाचा थोडक्यात गोषवारा खालील प्रमाणे :

मौजे साकुरी (उपासनी महाराज मंदिर) ते जुना साकुरी रस्ता (गोदावरी वसाहत मार्गे) (रा.मा. १०) या ग्रा.मा. ७६ दर्जाच्या २.५० किमी रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरणाचे काम श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या मार्फत करण्यास व रक्कम रुपये २१,५२,२७४/- (अक्षरी रुपये एकवीस लाख बावन्न हजार दोनशे चौऱ्याहत्तर मात्र ) इतकी रक्कम संस्थानच्या विश्वस्त निधीतून खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर बाबींचा येणारा खर्च २००७-२००८ च्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या विश्वस्तनिधीतून करण्याबाबत सूचीत करण्यात आलेले आहे.

**ब)** शासन निर्णयांस अनुसरुन, शिर्डी-साकुरी या २.५० किमी रस्त्याचे काम संस्थानमार्फत करणेबाबत निवीदेसह अंदाजपत्रक करणेकामी संस्थान आर्किटेक्ट मे. निकम पा. असोशियटस्, श्रीरामपूर यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार मे. निकम पाटील असाे, श्रीरामपूर सन २००७-०८ चे दरसूचीनुसार (DSR प्रमाणे ) निर्णयांकित रस्त्याचे कामाचे अंदाजीत रक्कम रु. २३,९३,८५१/- मात्रचे सादर केले आहे.

सन २००७-०८ चे दरसूची नुसार विषयांकित रस्त्याचे कामासाठी शासनाने मंजूर केलेल्या रक्कमेपेक्षा (रु. २१,५२,२७४/- मात्र) अंदाजीत रक्कम रु. २,४१,५७७/- मात्र इतका जादा खर्च येईल. तसेच ही रक्कम प्रत्यक्ष काम सूरु झालेनंतर कमी-जास्त होण्याची ही शक्यता आहे.

तसेच विषयांकीत रस्ता सध्या जिल्हा परिषदेच्या ताब्यात असल्याने रस्त्याचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर व जिल्हा परिषदेची मान्यता घेणे आवश्यक राहील. यामुळे संस्थानमार्फत सदरील रस्त्याचे काम सूरू करणे पूर्वी उपरोक्त कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यामुळे यामध्ये अजून वेळ वाया जाण्याची शक्यता आहे. रस्त्याचे काम पुर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्तीचे उत्तरदायीत्व संस्थानला सा.बा.विभागाचे नियमानुसार स्वीकारावे लागेल. यासर्व परिस्थितीचा विचार करता, विषयांकीत रस्ता सा.बां.विभागाचे माध्यमातून मजबूती करणासह डांबरीकरण करणे योग्य राहील. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग हा या क्षेत्रातील सक्षम तांत्रिक विभाग आहे. त्यामुळे सदरील रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून करणेस व याकामी शासनाने मंजूर केलेला निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसा प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी सादर करावा, असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **दसरा (पुण्यतिथी ) उत्सव -२००७ करीता मंडप टाकणे बाबत**

**निर्णय क्र.७५०** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी तर्फे यंदाचा दसरा ( पुण्यतिथी ) उत्सव २००७ शनिवार दिनांक २०/१०/२००७ ते सोमवार दिनांक २३/१०/२००७ अखेर चार दिवस साजरा करण्यात येणार आहे. या कामी मंदिर परीसरात खालील ठीकाणी मंडप उभारणे आवश्यक आहे.

**( रंगित सुशोभित कापड, वरिल बाजूस पत्रा, मंडपाचे साईडनी वरिल बाजुस ३ फुटापर्यंत कापड )**

**अ) मंदिर परीसरातील मंडपः-**

| अ.नं. | (अ) मंडप तपशिल | चौरस फुट |
|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजू चावडी गेट ते नगरव्दार गेट | ५६८०.०० |

| | | |
|---|---|---|
| | २८४'x २०' जाड कापडाचा उंची १८' फुट असलेला मंडप | |
| ०२ | समाधि मंदिर दक्षिण बाजु द्वारकामाई ते नगरद्वार गेट पर्यंत. १८' x ६००' उंची १८' असावी. | १०८००.०० |
| ०३ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या) पश्चिम बाजु ६०'x २०' दक्षिणोत्तर (१५' ते १८' उंची) | १२००.०० |
| ०४ | श्री गुरुस्थान मंदिर पुर्व बाजु ६०'x २०' दक्षिणोत्तर जाड कापडाचा पुरेशी उंची असलेला मंडप | १२००.०० |
| ०५ | `श्री ` चे चावडी समोर ४०'x ३५' (१५' ते १८' उंची ) | १४००.०० |
| ०६ | लेंडीबागेतील मंडप वरिल बाजूने पत्रा असलेला मंडप (कमीत कमी १५' उंची)<br>अ) दत्त मंदिर मागील बाजु - ३५'X ५०'<br>ब) दत्त मंदिर समोरील बाजु -७५'X४०' | १७५०.००<br>३०००.०० |
| ०७<br>A) | समाधी मंदिरा शेजारील स्टेज करीता<br>१) मेकअप रुम २२'x१०'<br>२) मेकअप रुम पत्रा १८' x१६' | <br>२२०.००<br>२८८.०० |
| B) | स्टेजवरील मंडप ४०' x २०' | ८००.०० |
| C) | स्टेजच्या बाजुो मंडप १०' x १०' | १००.०० |
| D) | मेकअप रुम पार्टीशन ७०' x ८' | ५६०.०० |
| E) | स्टेजसमोर मंडप ६०'x ४०' | २४००.०० |
| ०८ | समाधी मंदिराचे पुर्वेकडील जागेत ( जूनी जिल्हा परिषद शाळेजवळ) (१८'उंची)<br>१) २१०'x ७०'<br>२) स्टेज ३०'x २०' | <br>१४७००.००<br>६००.०० |
| ०९ | लाडु काउंटर समोर ४०'x ३०' (१८' उंची) | १२००.०० |
| | **एकुण चौ. फुट.** | **४५८९८.००** |

**ब) i) प्रसादालय परीसर, साईनगर परिसर, धर्मशाळा, नविन भक्तनिवासस्थान व इतर ठिकाणचे मंडपः-**

| | | |
|---|---|---|
| ०१ | प्रसादालय तिकीट काऊंटर समोर (बिछायतीसह) जेवण रेलिंग पुर्व / पश्चिम बाजु १२२'X४२' | ५१२४.०० |
| ०२ | जेवण शेड पुर्व बाजु - ७०'X६०'= ४२००(बिछायतीसह) - ४०'x२०'= ८०० | ५०००.०० |
| ०३ | प्रसादालय बुकींग काउंटर पश्चिम बाजू<br>४५'x२५'<br>पार्टीशन १३५'x१०' | <br>११२५.००<br>१३५०.०० |
| ०४ | प्रसादालय पश्चिम बाजू ४०' x २५' (पश्चिम बाजू बुफेसाठी) कनातीसह | १०००.०० |
| ०५ | व्हीआयपी साठी प्रसादालय हॉल नं.२मध्ये पार्टीशन १००'x८' | ८००.०० |
| ०६ | स्वयंसेवी पार्टीशन १५०'x १०' | १५००.०० |
| ०७ | साई उदयान ४५'x६०' | २७००.०० |
| ०८ | कन्या शाळा समोरील लॉनवर १५०'x ६०' ( बिछायतीसह) | ९०००.०० |
| ०९ | धर्मशाळा परिसर<br>१) पश्चिम बाजू १२०'x१२०' (बिछायत व कनातीसह )<br>२) ऑफीस समोर ४५'x६०' | <br>१४४००.००<br>२७००.०० |
| १० | साईनगर परिसर (बिछायती व कनातीसह)<br>१) १०५'x१०५'<br>२) ९०'x२१०'<br>३) ७५'x१५०'<br>४) ६०'x१२०' | <br>११०२५.००<br>१८९००.००<br>११२५०.००<br>७२००.०० |
| ११ | नविन भक्तनिवासस्थान ( ५०० रुम) वाहन पार्किंगचे ठिकाणी ४५'x३९०' ( बिछायत व कनतीसह ) गादया ७०० नग सह | १७५५०.०० |
| १२ | साईनाथ हायस्कुल ६०'x१००' (बिछायती व कनातीसह) | ६०००.०० |
| १३ | साईप्रसाद नं.२ समोर चौकशी कार्यालयासमोर १५ फुट उंची असलेला १५' x ६०' | ९००.०० |
| १४ | प्रसादालय पार्किंग गांव जेवणासाठी १२ ते १५ फुट उंची असलेला ( बिछायत व कनतीसह )<br>१३०'x ९०'<br>७५'x ३५' | <br>११७००.००<br>२६२५.०० |
| | | १,३१,८४९.०० |
| | **एकुण चौ. फुट ( अ + ब) =** | १,७७,७४७ |

पावसाळ्याचे दिवसांत उत्सव असल्याने मंडपामध्ये पावसाचे पाणी गळणार नाही करीता पत्र्याचे मंडप बांधणे संयुक्तीक होईल. तरी याकामी उपरोक्त प्रमाणे पत्र्याचे छत व सुशोभित कापड व बिछायतीसह यामध्ये मंडप उभारणेकामी अंदाजे रु.०८,००,०००.०० मात्र खर्च व प्लॅस्टीक ताडपत्री, सुशोभित कापड व बिछायतीसह मंडप उभारणेकामी अंदाजे रु. ०६,००,०००.०० मात्र अपेक्षित आहे. याकामी अशाप्रकारे पत्र्याचे मंडप बांधण्याचे साहित्य असलेल्या खालील मंडप ठेकेदार यांचेकडुन तसेच इतर काम करु शकतील असे मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१) श्री. बी. एम कातुरे, पुणे
०२) शर्मा मंडप, वैजापूर
०३) कैलास मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर

यावर सविस्तर चर्चा होऊन, दसरा (पुण्यतिथी उत्सव)-२००७ करीता मंडप टाकणेस याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ८ लाख मात्रचे खर्चास तसेच पत्र्याचे मंडप बांधण्याचे साहित्य असलेले ठेकेदारांकडून याकामी कोटेशन्स मागविण्यात येऊन सदर कोटेशन्स उपसमितीचे सभेत उघडून अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **सिन्नर (मुसळगांव) औद्योगिक वसाहत येथील संस्थानचे पालखी थांबा बांधकामाचे ठेकेदार मे.साहेबराव कोकाटे अॅण्ड असो.यांचेकडून सदरचे काम काढून घेणे बाबत**

**निर्णय क्र.७५१** साईभक्तांसाठी उपरोक्त विषयांकित पालखी थांबा वास्तुचे बांधकाम करण्याचे काम ठेकेदार मे.साहेबराव कोकाटे अॅण्ड असो. यांचेमार्फत करण्यात येत होते. सदरच्या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नावं | साईभक्तांसाठी सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत सिन्नर यांचेकडून भाडे तत्वाने घेतलेल्या जागेत पालखी थांबा वास्तुचे बांधकाम करणे . |
| ०२ | आर्किटेक्ट | मे.निकम पाटील असो., श्रीरामपुर |
| ०३ | ठेकेदाराचे नांव | मे.साहेबराव कोकाटे अॅण्ड असो., नाशिक |
| ०४ | अंदाजपत्रकीय रक्कम | रु. ३९,९९,८२९/- |
| ०५ | निविदा टक्केवारी | ४% कमी |
| ०६ | मंजूर निविदा रक्कम | रु. ३८,३९,८३६/- |
| ०७ | कार्यादेश क्रमांक | जा.नं.वशी-बांधकाम-१४७७८ दि.२३.१०.२००६ |
| ०८ | काम सुरु केल्याची दिनांक | दि.१७.११.२००६ |
| ०९ | निविदेनुसार काम पुर्ण करण्याची मुदत | सहा महिने (दि.१६.०५.२००७ पर्यंत) |
| १० | आतापर्यंत झालेल्या कामाची रक्कम | रु.४,६४,६५१/- |
| ११ | दोष दायित्व कालावधी | -- |
| १२ | कामाची सद्यस्थिती | १. मुख्य शेडचे काम प्लिंथलेव्हल पर्यंत पूर्ण<br>२. कंम्पाउंड वॉलचे काम ७०% पूर्ण<br>३. किचन शेड व टॉयलेट ब्लॉकचे काम सुरु केलेले नाही.<br>४. मुख्य शेडचे स्ट्रक्चरल स्टिलचे काम सुरु केलेले नाही. |

ठेकेदार मे. साहेबराव कोकाटे अॅण्ड असोसिएटस्. नाशिक यांनी दि. १८/०५/२००७ चे पत्राव्दारे काम पूर्ण करणेसाठी दोन महीने (दि. १६/०७/२००७ पर्यंत ) मूदतवाढ मिळणेबाबत विनंती केली होती. तसेच दि.११.०६.२००७ चे पत्राव्दारे सिमेंट व स्टीलची भाववाढ मिळणेबाबत विनंती केली होती. ठेकेदार यांचे कामाचे प्रगतीचा वेग अत्यंत कमी असल्याने वेग वाढविण्यासाठी त्यांना इकडील विभागाचे १) जा.नं.१७३२९, दि.१४.१२.२००६, २) जा.नं.१४८४ दि.२९.०१.२००७, ३) जा.नं. २२६१ दि.१४.०२.२००७, ४) जा.नं.३०७१ दि.२७.०२.२००७, ५) जा.नं.४९७० दि.२७.०३.२००७ अन्वये पत्र देवून सुचना देण्यात आल्या होत्या. याव्यतिरिक्त मा.विश्वस्त श्री.अभंग साो. व श्री.सुरेश वाबळे साो. यांनी दि.१६.०३.२००७ रोजी प्रत्यक्ष कामाची पहाणी केली व ठेकेदार कोकाटे यांना कामाचा वेग वाढविणे संदर्भात सुचना केल्या होत्या. दि.०३.०४.२००७ रोजी ठेकेदार यांनी सदर कामाच्या करारनाम्यावर स्वाक्षरी करुन उर्वरित इनिशियल सिक्युरिटी डिपॉझीटची रक्कम भरली आहे. अद्याप संपुर्ण कामापैकी ठेकेदार यांनी फक्त १२% काम पूर्ण केले आहे. ठेकेदार साहेबराव कोकाटे यांनी त्यांचे दिनांक १८/०५/२००७ रोजीचे पत्रान्वये विनंती केली होती की, साईट पुर्णपणे साफ नसल्यामुळे व साईटवर मोठमोठी बांबुची व आंब्याची झाडे असल्यामुळे कामाचा वेग कमी होता. मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समवेत ठेकेदार यांनी केलेले चर्चेमध्ये पुढील दोन महिन्यात (दि.१६.०७.२००७) काम पूर्ण करुन देतो असे सांगितले होते. त्यानुसार दोन महिन्यासाठी दि. १६/०७/२००७ पर्यंत मूदतवाढ दयावी अशी विनंती केली होती. तसेच ठेकेदार साहेबराव कोकाटे यांनी त्यांचे दिनांक ११/०६/२००७ रोजीचे पत्रान्वये सिमेंट व स्टिल यांच्या दरात भाववाढ झाल्याने निविदाशर्तीनुसार ४% कमी दरात काम करणे शक्य नसल्याने त्यांना Price Escalation व Material Advance द्यावा, अशी विनंती केली होती.

आर्किटेक्ट मे.निकम पा.असो., श्रीरामपुर यांनी आपल्या दि १९.०६.२००७ च्या पत्रान्वये कळविले होते की ठेकेदार यांचे मागणी नुसार त्यांना फक्त एकदाच दि. १६/०७/२००७ पर्यंत (०२ महिने) मूदतवाढ देण्यास हरकत नाही. Price Escalation व Material Advance या शर्तीचा निविदेत समावेश केलेला नाही व ठेकेदार यांनी निविदेतील या शर्तीचा अभ्यास करुन निविदा भरणे अपेक्षीत आहे. त्यामुळे निविदा शर्तीनुसार ठेकेदार यांना सदरच्या बाबी देय होत नाहीत. तरी संस्थानने आपले स्तरावर याबाबत निर्णय घ्यावा असे आर्किटेक्ट यांनी कळविले होते.

ठेकेदार साहेबराव कोकाटे यांनी सदरच्या कामाचे पहिले रनिंग बिल दि.१८/०५/२००६ रोजी सादर केले. निविदा शर्ती नुसार आर.ए बिलाची किमान रक्कम रु. ६,५०,०००.०० इतकी असावी अशी अट आहे. तथापी काम लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने सदरच्या कामाचा वेग वाढावा यासाठी ठेकेदार यांनी दि. २६/०५/२००७ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंती वरुन व आर्किटेक्ट यांचे शिफारशी नुसार प्रथम रनिंग बिलापोटी रु. ४,३०,०००.०० मात्र इतकी रक्कम ॲडव्हान्स म्हणून अदा करण्यात आलेली आहे. **ठेकेदार यांना दि.०९/०६/२००७ रोजी पहिले रनिंग बिलाच्या ॲडव्हान्सचा डी.डी. मिळालेपासुन साईटवरील काम त्यांनी पुर्णपणे बंद केले आहे.**

ठेकेदार यांनी वरीलप्रमाणे केलेल्या विनंतीबाबत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २९/०६/२००७ रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता त्यावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्रमांक ५०९ अन्वये सदर कामाचे अंदाजपत्रक बनविण्यासाठी सिमेंट, स्टील व स्ट्रक्चरल स्टीलसाठी गृहित धरण्यात आलेले बेसिक रेट व ठेकेदार यांनी काम करतेवेळी वापरलेल्या प्रस्तुत सामग्रीचे खरेदीचे दर यामधला फरक ठेकेदार यांना अदा करण्यात यावा, असे ठरले. याप्रमाणे फरकाची रक्कम ही फक्त साईटवर अद्याप अपुर्ण असलेल्या उर्वरीत कामासाठीच देण्यात यावी. तसेच ठेकेदार यांचेकडून सदरचे काम ३ महिन्यात पूर्ण करुन देणेबाबत लेखी स्वरुपात हमी घेण्यात यावी, असे ठरले.यासाठी येणाऱ्या योग्य त्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली होती.

ठेकेदार यांना वारंवार काम सुरु करण्यासाठी कळवून देखील त्यांनी याबाबतीत दुर्लक्ष केले आहे. ठेकेदार यांना दिनांक २४/०८/२००७ रोजी सदर काम लवकरात लवकर सुरु करणे बाबत चर्चा करण्यासाठी इकडील कार्यालयात बोलविण्यात आले असता त्यादिवशी त्यांनी वरिष्ठ मुख्य अभियंता यांचे कक्षात सदर काम पूर्ण करण्याची माझी इच्छा नाही असे सांगितले, त्यावर याबाबत वरिष्ठ मुख्य अभियांता यांनी याबाबत आपण मा.कार्यकारी अधिकारी, यांचे कक्षात सविस्तर चर्चा करु असे ठेकेदार यांना सांगीतले परंतू ठेकेदार काही न सांगता परस्पर निघून गेले व त्यानंतर त्यांनी इकडील कार्यालयास कोणात्याही प्रकारचा पत्रव्यवहार अगर दूरध्वनी केला नाही यावरुन ठेकेदार यांना काम करण्यास रस नाही असे दिसून येते. दि. ३१/०८/२००७ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांना सदरचे काम आपणाकडून का काढून घेण्यात येऊ नये याबाबत नोटीस देण्यात आली आहे. याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी त्यांना ०७ दिवसांची मूदत देण्यात आली होती. परंतू ठेकेदार यांनी अद्यापपर्यंत कुठल्याही प्रकारे खुलासा केला नाही.

ठेकेदार यांनी संस्थानचे सिन्नर औद्योगिक वसाहत सिन्नर यांचेकडून घेतलेल्या पाण्याचा वापर सदरचे ठिकाणाचे बांधकामासाठी केला होता. सदरच्या पाण्याचे एकूण रुपये २८,८१२.०० मात्र बिल थकबाकी ठेकेदार यांनी सिन्नर औद्योगिक वसाहत,सिन्नर यांचेकडे जमा केलेले नाहीत संस्थानचे सदर संस्थेकडे जमा असलेले सिक्युरीटी डिपॉझीटची रक्कम रु. २३,३००.०० मात्र त्यांनी सदरचे बिलापोटी जमा करुन घेतलेली आहे. व संस्थानचे पाणी कनेक्शन बंद केले आहे. आता सिन्नर औद्योगिक सहकारी वसाहत सिन्नर यांनी रुपये ५,३१२.००+ २०० रु. दंड प्रमाणे रु. ५५१२/- मात्र जमा करायचे आहे. तरी संस्थेस सदरची रक्कम जमा करण्यास मान्यता असावी. सिन्नर औद्योगिक वसाहत, सिन्नर यांचे पाण्याचे दर जास्त असल्याने सदरच्या ठिकाणी भविष्यात साईभक्तांच्या पाण्याच्या सुविधेसाठी बोरवेल घेता येईल. यासाठी ५००० रु. फी भरुन सिन्नर औद्योगिक सहकारी वसाहत सिन्नर यांची परवानगी घेऊन बोरींग करण्यासाठी आवश्यक खर्चासह एकूण रुपये ३५,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

सदर कामाची वर्क ऑर्डर दिले पासून आता पर्यंत ११ महिन्यांच्या कालावधीत वारंवार तोंडी व लेखी सूचना देवूनही ठेकेदार यांनी संपूर्ण कामापैकी फक्त १२% काम केले आहे. यामुळे संस्थानचे मोठे आर्थिक नुकसान होऊन श्रम व वेळ वाया गेला आहे. तसेच सदरच्या पालखी थांब्याचा वापर अद्याप भक्तांसाठी करता आला नाही. त्यामुळे ठेकेदार यांचे संस्थानकडे जमा असलेले सिक्युरिटी डिपॉझीट जप्त करुन यातून सिन्नर औद्योगिक सहकारी वसाहत, सिन्नर यांचे पाणी बिलाची थकबाकी जमा करण्यास मान्यता मिळावी. तसेच ठेकेदार मे.साहेबराव कोकाटे ॲण्ड असो. यांना अंतीम नोटीस देवून त्यांचे समवेत केलेला करारनामा रद्द करुन त्यांचेकडून काम काढून घेणेस मान्यता मिळणेस तसेच उर्वरीत काम पूर्ण करण्यासाठी नव्याने वर्तमान पत्रात फेर निविदा सूचना प्रसिध्द करुन सदरचे काम पूर्ण करुन घेण्यास व त्यासाठी येणा-या योग्य त्या सर्वसमावेषक खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याकामी ठेकेदार यांना वकीलाच्या सल्ल्याने अंतिम नोटीस Notice of Termination देण्यात यावी. उर्वरित कामाच्या निविदांसाठी प्रचलीत जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करावे.

तसेच उपरोक्त पालखी थांब्याचे ठिकाणी बोअरवेल करणेसाठी अेपक्षित रुपये ३५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. तसेच यापूर्वी दि.२९.६.२००७ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेत ठेकेदार यांचे भाववाढ व मुदतवाढ मागणीबाबत संमत करण्यात आलेला निर्णय क्र.५०९ रद्द करणेत आला.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७ श्रीसाईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब व सी.आर.यु.विभागासाठी तातडीने खरेदी केलेल्या औषधे खरेदीस कार्योत्तर मजूरी मिळणेबाबत (माहे-जुलै,२००७)**

**निर्णय क्र.७५२** श्रीसाईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागात दैनंदिन ॲन्जीओग्राफी, ॲन्जीओप्लास्टीसाठी लागणारे सर्जिकल साहित्य व सी.आर.यु. विभागास शस्त्रक्रिया झाल्यानंतर लागणारी इंजेक्शन इत्यादी जी आपल्याकडे उपलब्ध नव्हती व तातडीने खरेदी करणे गरजेचे होते ती पुणे, संगमनेर, नाशिक, कोपरगाव, औरंगाबाद व मुंबई येथून तातडीने खरेदी केलेली आहेत.

श्रीसाईबाबा रुग्णालय हे दि. १५/०५/२००६ रोजी कार्यान्वित झालेले आहे. सदरचे रुग्णालय नव्यानेच चालु झालेले असल्यामुळे व वेगवेगळया विभागात वेळोवेळी नवनवीन तज्ञ डॉक्टर हे हजर होत होते, त्यामुळे सन २००६-२००७ मध्ये मागणी केलेल्या औषधांव्यतिरीक्त बरीचशी नविन औषधे संबंधित डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार खरेदी करावी लागतात. (विशेषतः CVTS,CRU, CATHLAB इत्यादी विभाग) अशी वारंवार लागणारी नविन औषधे हि सन २००७-०८ या वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली आहेत. त्यामुळे येथून पुढे तातडीची औषधे खरेदी करण्याचे प्रमाण बरेचशे घटेल.

तसेच सी.आर.यू. व कॅथलॅबमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांसाठी लागणारी औषधे आपण पॅकेजमध्ये देत असल्यामुळे ती आपणास तातडीने खरेदी करुन दयावी लागतात. ॲन्जीओग्राफी व ॲन्जीओप्लास्टीसाठी रुग्णांची संख्या सतत वाढत असल्यामुळे सन २००६-०७ या वर्षातील वार्षिक मागणी अपूरी पडत आहे.

माहे ऑगस्टपासून सन २००७-०८ या वर्षामध्ये मागणी केलेल्या निविदेतील मंजुर दरानुसार (R/C) खरेदी करण्यात येत आहे. याशिवाय वार्षिक मागणी व्यतिरीक्त तातडीने लागणाऱ्या औषधांसाठी औरंगाबाद, नाशिक, संगमनेर, कोपरगाव, पुणे, ठाणे, मुंबई येथील होलसेल विक्रेत्यांकडून नामांकित कंपनीचे दरपत्रक मागवून त्यानुसार आवश्यकतेप्रमाणे लागणारी औषधे त्यांचेकडून खरेदी करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

खालील तपशिलातील नमुद केलेली काही औषधे वार्षिक मंजुर दराने (२००७-०८) उपलब्ध होणेस काही कालावधी लागणार असल्याने ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी एकुण रु. ३,५८,७८५/- इतका खर्च आलेला आहे. सदरची खरेदी हि माहे जुलै- २००७ मध्ये वैद्यकिय संचालक यांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०६/२००७ निर्णय क्र. ३४८ नुसार दरमहा असलेल्या रु.१,००,०००/-चे तरतूदी व्यतिरिक्त केलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Aid India, Mumbai | 422 | 25/07/2007 | 780.00 |
| | | | **Total Amt.** | **780.00** |
| 2 | Anand Enterprises, Pune | 1100 | 18/07/2007 | 1809.00 |
| | | | **Total Amt.** | **1809.00** |
| 3 | Centenial Surgical,Thane | 374 | 12/07/2007 | 5283.00 |
| 4 | Centenial Surgical,Thane | 409 | 19/07/2007 | 14277.00 |
| 5 | Centenial Surgical,Thane | 435 | 26/07/2007 | 2113.00 |
| | | | **Total Amt.** | **21673.00** |
| 6 | Chintamani Medical & Gen. Stores Shirdi | 2775 | 31/07/2007 | 1050.00 |
| | | | **Total Amt.** | **1050.00** |
| 7 | Critical Care Systems, Mumbai | 682 | 11/07/2007 | 18900.00 |
| | | | **Total Amt.** | **18900.00** |
| 8 | D. Vijay Pharma Pvt. Ltd., Nashik | 2439 | 17/07/2007 | 1102.00 |
| 9 | D. Vijay Pharma Pvt. Ltd., Nashik | 2440 | 17/07/2007 | 1398.00 |
| 10 | D. Vijay Pharma Pvt. Ltd., Nashik | 2449 | 26/07/2007 | 11510.00 |
| | | | **Total Amt.** | **14010.00** |
| 11 | Doctors Pharma, Nashik. | 581 | 31/07/2007 | 6121.00 |
| 12 | Doctors Pharma, Nashik. | 580 | 31/07/2007 | 10082.00 |
| | | | **Total Amt.** | **16203.00** |
| 13 | Kanchan Drugs, Pune. | 3581 | 31/07/2007 | 11960.00 |
| 14 | Kanchan Drugs, Pune. | 3296 | 21/07/2007 | 10202.00 |
| 15 | Kanchan Drugs, Pune. | 3311 | 21/07/2007 | 2496.00 |
| 16 | Kanchan Drugs, Pune. | 3503 | 27/07/2007 | 15005.00 |
| 17 | Kanchan Drugs, Pune. | 3210 | 18/07/2007 | 5209.00 |
| 18 | Kanchan Drugs, Pune. | 3297 | 21/07/2007 | 9110.00 |
| 19 | Kanchan Drugs, Pune. | 3502 | 27/07/2007 | 15850.00 |
| 20 | Kanchan Drugs, Pune. | 3430 | 26/07/2007 | 7051.00 |
| | | | **Total Amt.** | **76883.00** |
| 21 | Life Care Medical Systems,Pune | 547 | 27/07/2007 | 25200.00 |
| | | | **Total Amt.** | **25200.00** |
| 22 | Life Line Surgical, Kopargaon | 319 | 14/07/2007 | 371.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | Total Amt. | 371.00 |
| 23 | Meena Agencies, Nashik | 2665 | 23/06/2007 | 13686.00 |
| | | | Total Amt. | 13686.00 |
| 24 | Pharmacea Link, Pune | 11231 | 12/07/2007 | 8260.00 |
| | | | Total Amt. | 8260.00 |
| 25 | Pinnacle Biomed Pvt. Ltd., Mumbai | 146 | 19/07/2007 | 36457.00 |
| 26 | Pinnacle Biomed Pvt. Ltd., Mumbai | 154 | 21/07/2007 | 40040.00 |
| | | | Total Amt. | 76497.00 |
| 27 | Prince Medical & General Stores, Nashik | 101 | 26/07/2007 | 7907.00 |
| | | | Total Amt. | 7907.00 |
| 28 | S.S. Marketing, Aurangabad | 653 | 03/07/2007 | 4500.00 |
| | | | Total Amt. | 4500.00 |
| 29 | Shree Ortho Tools, Nashik | 200730 | 31/07/2007 | 6162.00 |
| | | | Total Amt. | 6162.00 |
| 30 | Sinocare Surgicals Pvt.Ltd., Mumbai | 1036 | 23/07/2007 | 9000.00 |
| | | | Total Amt. | 9000.00 |
| 31 | Vijay Medical Stores,Shirdi. | 171 | 30/07/2007 | 91.00 |
| 32 | Vijay Medical Stores,Shirdi. | 175 | 31/07/2007 | 517.00 |
| | | | Total Amt. | 608.00 |
| 33 | Zenith Surgical Co., Mumbai | 701177 | 19/07/2007 | 16538.00 |
| 34 | Zenith Surgical Co., Mumbai | 701178 | 19/07/2007 | 11198.00 |
| 35 | Zenith Surgical Co., Mumbai | 701188 | 20/07/2007 | 8606.00 |
| 36 | Zenith Surgical Co., Mumbai | 701189 | 20/07/2007 | 18944.00 |
| | | | Total Amt. | 55286.00 |
| | | | Total Amt.in Rs. | 3,58,785.00 |

**Partywise Bill Summery**

| Sr.No. | Name of Party | Total Amt. |
|---|---|---|
| 1 | Aid India, Mumbai | 780.00 |
| 2 | Anand Enterprises, Pune | 1809.00 |
| 3 | Centenial Surgical,Thane | 21673.00 |
| 4 | Chintamani Medical & Gen. Stores Shirdi | 1050.00 |
| 5 | Critical Care Systems, Mumbai | 18900.00 |
| 6 | D. Vijay Pharma Pvt. Ltd., Nashik | 14010.00 |
| 7 | Doctors Pharma, Nashik. | 16203.00 |
| 8 | Kanchan Drugs, Pune. | 76883.00 |
| 9 | Life Care Medical Systems,Pune | 25200.00 |
| 10 | Life Line Surgical, Kopargaon | 371.00 |
| 11 | Meena Agencies, Nashik | 13686.00 |
| 12 | Pharmacea Link, Pune | 8260.00 |
| 13 | Pinnacle Biomed Pvt. Ltd., Mumbai | 76497.00 |
| 14 | Prince Medical & General Stores, Nashik | 7907.00 |
| 15 | S.S. Marketing, Aurangabad | 4500.00 |
| 16 | Shree Ortho Tools, Nashik | 6162.00 |
| 17 | Sinocare Surgicals Pvt.Ltd., Mumbai | 9000.00 |
| 18 | Vijay Medical Stores,Shirdi. | 608.00 |
| 19 | Zenith Surgical Co., Mumbai | 55286.00 |
| | Total Amt.in Rs. | 3,58,785.00 |

तरी उपरोक्त प्रमाणे पुर्णांकित रक्कम रु. ३,५८,७८५/- (रु.तीन लाख अठ्ठावन्न हजार सातशे पंचाऐंशी मात्र) चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **श्री.मच्छिंद्र सुर्यभान डांगे (लिपीक) धर्मशाळा यांना जादा वैद्यकीय बिलांचा परतावा मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७५३** श्री.मच्छिंद्र सुर्यभान डांगे, (लिपीक टंकलेखक) धर्मशाळा विभाग यांचे वडिल श्री. सुर्यभान सुखा डांगे, वय ६५ वर्षे यांना Massiv Haemeaturia with Accute Urinary Retension in Aclo ca Prostate चा त्रास असल्याने त्यांनी प्रथम दि.०३/०६/२००७ रोजी श्री साईबाबा रुग्णालयातील डॉ. गोरे यांना दाखविले होते. श्री साईबाबा रुग्णालयात कॅन्सरचे रुग्णांवर उपचाराची सुविधा नसल्यामुळे डॉ. गोरे यांनी त्यांना पुढील उपचारासाठी लाईफ लाईन हॉस्पिटल, नाशिक येथे पाठविले होते. तेथील औषधोपचारांसाठी त्यांना रु.५४,०४३/- इतका खर्च आलेला आहे.

श्री.मच्छिंद्र सुर्यभान डांगे यांनी एकूण रु.५४,०४३/- मात्र इतके बील सादर केले आहे. संस्थान वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये रु.५२,४५३/- मात्र देय होत आहे.

सदर बीलाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | हॉस्पिटल / स्टोअरचे नाव | बील नंबर | तारीख | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | लाईफ लाईन हॉस्पिटल अॅन्ड मेडीकल रिसर्च सेंटर, नाशिक. | १०४२ | १४/०६/२००७ | २९०००.०० |
| २ | भगवती ड्रग स्टोअर, नाशिक | ४१३५ | ०३/०६/२००७ | ३२.०० |
| ३ | भगवती ड्रग स्टोअर, नाशिक | ४१०१ | ०३/०६/२००७ | ९८८.०० |
| ४ | भगवती ड्रग स्टोअर, नाशिक | ४१०३ | ०३/०६/२००७ | १११२.०० |
| ५ | भगवती ड्रग स्टोअर, नाशिक | ४२२३ | ०४/०६/२००७ | ७११.०० |
| ६ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | ७८ | ०४/०६/२००७ | ५८१.०० |
| ७ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | ७९ | ०४/०६/२००७ | ३५१.०० |
| ८ | नाशिक लाईफ स्कॅन सेंटर, नाशिक | ९३० | ०४/०६/२००७ | १५०.०० |
| ९ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | ८५ | ०५/०६/२००७ | ६१९.०० |
| १० | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | ८७ | ०५/०६/२००७ | ६८१.०० |
| ११ | अर्पण रक्तपेढी, नाशिक | ४५३६ | ०७/०६/२००७ | १८०.०० |
| १२ | अर्पण रक्तपेढी, नाशिक | ४५५७ | ०७/०६/२००७ | ६३०.०० |
| १३ | अजिंक्य मेडीकल, नाशिक | ४३९२ | ०८/०६/२००७ | १७६.०० |
| १४ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | ९३ | ०८/०६/२००७ | १२२०.०० |
| १५ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | ९४ | ०८/०६/२००७ | १००१.०० |
| १६ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | ९५ | ०८/०६/२००७ | १२०३.०० |
| १७ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | ९६ | ०९/०६/२००७ | ११७३.०० |
| १८ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | १०३ | ०९/०६/२००७ | ३०२.०० |
| १९ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | १०४ | ०९/०६/२००७ | ६५.०० |
| २० | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | ९८ | ०९/०६/२००७ | १६३७.०० |
| २१ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | १०२ | १०/०६/२००७ | ११०४.०० |
| २२ | भगवती ड्रग स्टोअर, नाशिक | ४७५५ | ११/०६/२००७ | ११४.०० |
| २३ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | ११३ | ११/०६/२००७ | ३८९१.०० |
| २४ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | ११२ | १२/०६/२००७ | ३५६७.०० |
| २५ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | ११९२ | १३/०६/२००७ | ११२५.०० |
| २६ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | १८९६ | १४/०६/२००७ | ५०.०० |
| २७ | श्री मेडीकल अॅन्ड जनरल्स, नाशिक | १२१ | १४/०६/२००७ | ७९०.०० |
| | | | **एकूण रक्कम रु.** | **५२४५३.००** |

श्री. डांगे यांना सदरचे वैद्यकिय उपचारासाठी संस्थान कडुन अगाऊ रक्कम रु.२१,२५०/- इतकी देण्यात आलेली आहे, तेंव्हा सदरची रक्कम रु.२१,२५०/- वजावट होऊन उर्वरीत रक्कम रु.३१,२०३/- श्री.मच्छिंद्र सुर्यभान डांगे, (लिपीक टंकलेखक) धर्मशाळा विभाग यांना आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **श्रीसाईबाबांचे पुण्यतिथीचे दिवशी करण्यात येणाऱ्या आराधना विधीबाबत.**

**निर्णय क्र.७५४** सन-१९१८ साली विजयादशमीचे दिवशी श्री साईबाबा समाधीस्थ झाले. त्यानंतर श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबांचा पुण्यतिथी उत्सव तीन दिवस साजरा करण्यात येतो. विजयादशमीचे मुख्य दिवशी साईबाबा संस्थानमार्फत दुपारी १२.०० वाजता आराधना विधी करण्यात येतो. या श्राध्दविधीसाठी श्री साईबाबा संस्थानचो यजमान म्हणून मा.अध्यक्ष, त्यांचे अनुपस्थितीत मा.उपाध्यक्ष, विश्वस्त अगर मा.कार्यकारी अधिकारी हेच बसत असतात. या दिवशी ब्राम्हण, सुवासिनी, विश्वस्त व निमंत्रित मान्यवरांना आराधना विधीनंतर प्रसाद भोजनास बोलविण्यात येते सुवासिनींना व ब्राम्हणांना वस्त्र व दक्षिणा देऊन त्यांचा सन्मान करण्यात येतो.

दि.१९.०९.२००७ रोजी दै.लोकमत व दै.कैसरी या वर्तमानपत्रात अनुक्रमे श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथीला अन्नदान करण्याचा ग्रामस्थांचा निर्णय व "शिरडीचे ग्रामस्थ साजरी करणार साईपुण्यतिथी " या मथळयाखाली प्रसिध्द झालेल्या वृत्तामध्ये "ग्रामस्थांचे प्रतिनिधी म्हणून नगराध्यक्ष व त्यांचे अनुपस्थितीत उपनगराध्यक्ष आराधना विधीच्या पुजेला बसणार आहेत. हाच रिवाज म्हणून स्वीकारण्याचा निर्णय ही ग्रामस्थांच्या सभेत घेण्यात आला. या पदासाठी असणाऱ्या आरक्षणाप्रमाणे प्रत्येक जाती धर्माच्या नागरीकांना यामुळे पुजेची संधी मिळणार आहे", असे नमुद केले आहे.

आतापर्यंत श्री साईबाबा संस्थानतर्फे साजरा केला गेलेल्या श्री पुण्यतिथी उत्सवातील आराधना विधीचे पुजेस यजमान म्हणून संस्थानचे सन्माननीय मा.अध्यक्ष, त्यांचे अनुपस्थितीत मा.उपाध्यक्ष, विश्वस्त अगर मा.कार्यकारी अधिकारी हेच बसत असतात. त्यामुळे वरील वृत्तामुळे गैरसमजुतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांचे पुण्यतिथीचे दिवशी करण्यात येणारा आराधना विधी पूर्वपार प्रथेमाणेच करण्यात यावा, त्यामध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये असे ठरले.

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **समाधी मंदीर रेन वॉटर पाईप व बाथरुमचे पाईप बदली करणेबाबत.**

**निर्णय क्र.७५५** उपरोक्त विषयान्वये समाधी मंदिराचे बाहेरील बाजूस असणारे रेन वॉटर पाईप तसेच समाधी मंदिरातील बाथरूमचे पाईप टाकून बराच कालावधी झाल्यामुळे ते ठिकठिकाणी लिकेज झालेले आहे. बाहेरील बाजूस असणारे रेन वॉटर पाईप लिकेज झाल्यामुळे त्यातून निघणारे पाणी हे इतर ठिकाणी साचते व भिंतीवरून खाली पाझरते. तसेच समाधी मंदिरातील बाथरूमचे पाईप खराब झाल्यामुळे लिकेज झालेले आहे. त्यामुळे सदरचे पाईप बदली करून त्याठिकाणी नविन पाईप टाकणे आवश्यक आहे. तेथे समक्ष जावून पाहणी केली असता सदरचे काम पुर्ण करणेकरीता आवश्यक मटेरियल आपलेकडे शिल्लक नसल्यामुळे ते खरेदी करावे लागणार आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे मटेरियल खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,२२,७४५.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | मटेरियल तपशिल | साईज | आवश्यक मटेरियल | अंदाजे दर प्रती नग रु. | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | सी.आय.पाईप - ६ फुटी (निको कं. ISI मेक) | ४" | ५७ नग. | १,१६५/- | ६६,४०५.०० |
| ०२. | सी.आय.पाईप - ३ फुटी (निको कं. ISI मेक) | ४" | २० नग. | ७१०/- | १४,२००.०० |
| ०३. | प्लग बेंड | ४" | २० नग. | २१५/- | ४,३००.०० |
| ०४. | प्लेन बेंड | ४" | २० नग. | २१०/- | ४,२००.०० |
| ०५. | झेड बेंड | ४" | १० नग. | ३२५/- | ३२५०.०० |
| ०६ | एस. बेंड | ४" | ०५ नग. | ३००/- | १,५००.०० |
| ०७. | सी.आय.पाईप - ६ फुटी (निको कं. ISI मेक) | ३" | १० नग. | १०२५/- | १०,२५०.०० |
| ०८. | सी.आय.पाईप - ४ फुटी (निको कं. ISI मेक) | ३" | १० नग. | ८२५/- | ८,२५०.०० |
| ०९. | प्लग बेंड | ३" | ०६ नग. | २३५/- | १,४१०.०० |
| १०. | प्लेन बेंड | ३" | ०६ नग. | २००/- | १,२००.०० |
| ११. | कनेक्टर २ फुटी | ३" | ०८ नग. | ३९५/- | ३,१६०.०० |
| १२. | कनेक्टर २ फुटी | ४" | ०८ नग. | ४९०/- | ३,९२०.०० |
| १३. | क्लीप पट्टी | ३" | ५० नग. | ०६/- | ३००.०० |
| १४. | क्लीप पट्टी | ४" | ५० नग. | ०८/- | ४००.०० |
| | **एकुण अंदाजे रक्कम -** | | | | **१,२२,७४५.००** |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे आवश्यक असणारे मटेरिअल कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,२२,७४५.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **संस्थान सेवकांना सानुग्रह अनुदान देणे बाबत**

**निर्णय क्र.७५६** दरवर्षी संस्थान कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी एकूण वार्षिक वेतनाच्या एक बारांश रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात येत असते.त्यानुसार यावर्षीही संस्थान कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेचा प्रस्ताव आहे हे सानुग्रह अनुदान वाटपाची पध्दत खालीलप्रमाणे आहे.

०१. संस्थान आस्थापनेवर मासिक वेतनावर नेमणूक झालेल्या शैक्षणिक विभाग,दोनही (श्री साईनाथ व श्रीसाईबाबा) रुग्णालयासह सर्व विभागांकडील मासिक वेतनावरील/मानधनावरील सेवकांना दि.०१/१०/२००६ ते दि.३०/०९/२००७ या कालावधीत दिलेल्या एकूण वेतनाचे /मानधनाच्या एक बारांश (एकूण वेतन :- १२)

०२. कार्यकारी संपादक,व सह.कार्यकारी संपादक " साईलिला " (मराठी,इंग्रजी व हिंदी),यांना दि.०१/१०/२००६ ते दि.३०/०९/२००७ या कालावधीत दिलेले मानधन ÷ १२.

०३. संस्थान आस्थापनेवर दि.०१/१०/२००६ नंतर मासिक वेतनावर/ मानधनावर नेमणूक झालेल्या सेवकांना दि.३०/०९/२००७ अखेरच्या कालावधीत दिलेल्या एकूण वेतनाच्या/मानधनाच्या एक बारांश (एकूण वेतन ÷१२)

०४. दि.३०/०९/२००७ पूर्वी संस्थान सेवेतून निवृत्त झालेले,राजीनामा देवून नोकरी सोडून गेलेल्या सेवकांना दि.०१/१०/२००६ अगर त्यानंतर प्रत्यक्ष नोकरीत असलेल्या तारखेपासून ते कामावर असलेल्या कालावधीत दिलेल्या वेतनाच्या एक बारांश (एकूण वेतन ÷ १२).(या प्रमाणात येणारी रक्कम)

०५. प्रतिनियुक्तीने तात्पुरत्या कालावधीसाठी संस्थानकडे नेमणूका झालेले शासनाकडील अधिकारी यांना देण्यात आलेल्या एकूण वेतनाच्या एक बारांश.

०६. दि.०१/१०/२००६ ते दि.३०/०९/२००७ या कालावधीत ज्या कर्मचाऱ्यांस गैरवर्तनाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन सेवेतून कमी केलेले आहे. अशा कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०९/२००६ च्या सभेतील निर्णयानुसार,संस्थान आस्थापनेवर सेवेत असलेल्या (वेतनश्रेणी व नियतवेतनावरील/फिक्स-पे ) कर्मचाऱ्यांनाच गतवर्षी सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे.त्याकामी रक्कम रु.९५,०७,४५०/-(रु.पंच्यान्नौव लाख सात हजार चारशे पंन्नास) मात्र इतकी रक्कम आदा करण्यात आलेली आहे.

आता,वर प्रस्तावीत केलेप्रमाणेच सानुग्रह अनुदान द्यावयाचे झाल्यास सदर कामी अंदाजीत रु.१,४४,५७,४५०/- (अक्षरी रु.एक कोटी चव्वेचाळीस लाख सत्तावन्न हजार चारशे पन्नास ) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

सन २००६-२००७ या वर्षात मोजणीदार-०१, सल्लागार-२, कनिष्ठ अभियंते-०७ , सहाय्यक आचारी-०१, प्रशासकिय अधिकारी -०१ यांच्या ०१ वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. पैकी मोजणीदार, सल्लागार व कनिष्ठ अभियते यांनीही सानुग्रह अनुदान मिळणेबाबत अर्ज केलेले आहेत. तथापी यापूर्वी अशा प्रकारे कंत्राटी पध्दतीने नेमणूका केलेल्या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्यात आलेले नाही.

वरीलप्रमाणे सानुग्रह अनुदान दिवाळीपूर्वी देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन, गेल्यावर्षाप्रमाणेच संस्थान कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी सानुग्रह अनुदान देण्यात यावे, असे ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२ श्रीरामपूर भू-संपादन कार्यालयाकडील वाढीव दोन कंत्राटी कामगारांचे वेतनाबाबत.**

**निर्णय क्र.७५७** उपरोक्त विषयास अनुसरुन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीसाठी भू-संपादन विषयक कामे करणेकरीता भू-संपादनकक्ष स्थापन करण्यात येवून त्याकामी मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने सदर कक्षाकडे खालील कर्मचारी लावणेस मंजूरी दिलेली असून त्यांना सध्या दि.३१/१०/२००७ अखेर मुदत वाढ दिलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | नायब तहसिलदार संवर्गातील | कंन्सलटंट | ०१. |
| ०२. | अव्वल कारकून संवर्गातील | अव्वल कारकून | ०१. |
| ०३. | लिपीकाचे कामासाठी | कं.कुशल कामगार | ०२. |
| ०४. | कार्यालयीन कामकाजासाठी शिपाई | कं.अकुशल कामगार | ०१ |

मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी त्यांचे दि. १०/०७/२००७ चे पत्रान्वये श्रीरामपूर भूसंपादन कक्षाकडे संस्थानविषयक भूसंपादनाची चालू असलेली ०९ प्रकरणे व नव्याने वाढलेली नऊ प्रकरणे अशी एकूण १८ प्रकरणे तातडीने निर्गत करणे आवश्यक असल्याने भूसंपादन कक्षात मा. अध्यक्ष साो श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी यांनी सुचविलेनुसार दोन कंत्राटी कुशल कर्मचा-यांना दि.०३/०७/२००७ रोजी कामावर हजर करुन घेण्यात आले आहे. सदर कंत्राटी कुशल कर्मचारी हे सध्या सदर कक्षात काम करत असून या दोन कंत्राटी अतिरिक्त लिपीक पदांना मंजूरी देणेबाबत विनंती केलेली आहे.

उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर व मा.अध्यक्ष महोदय यांचे सुचनेनुसार वाढीव कुशल अतिरिक्त कंत्राटी कर्मचा-यांचे दोन पदांस दि. ०३/०७/२००७ पासून कक्षाचे मुदतीपर्यंत (दि.३१/१०/२००७ अखेर) मंजूरी देऊन सदर कंत्राटी कुशल कर्मचा-यांचे वेतन आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ शिधासामुग्री मिळणेबाबत आलेल्या अर्जाबाबत**

**निर्णय क्र.७५८ (अ)**खाली दर्शविलेल्या मंडळानी मा.कार्यकारी अधिकारीसाहेब,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | सरपंच, ग्रा. का. शिंगणापूर, व अध्यक्ष, साई यश मित्रमंडळ, सहजानंदनगर, पो.शिंगणापूर, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर (अर्ज दि.१४/०८/२००७) | संजीवनी साखर कारखाना परिसर, सहजानंदनगर, कोपरगांव येथे दि.१८/०८/०७ ते दि.२५/८/०७ अखेर होणा-या श्रीमद् भागवत सप्ताह सोहळयाचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | मा.श्री.शं.गे.कोल्हे साो. यांचे कोरडा शिधा देण्यात यावा, असे शिफारस पत्र. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२. | सरपंच, ग्रा.का. सोनेवाडी, ता. कोपरगांव, जि.अहमदनगर (अर्ज दि.०२/०८/२००७) | मौजे सोनेवाडी येथे दि.१८/०८/०७ ते दि.२५/०८/०७ अखेर हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी व साईचरित्र पारायण सोहळा आयोजित केला असून त्याचे महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | मा.श्री.शं.गे.कोल्हे सो. यांचे कोरडा शिधा देण्यात यावा, असे शिफारस पत्र. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

दि.२०/०५/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आ.वेळचा विषय क्र.१७ व निर्णय क्र.४१९ अन्वये येथुनपुढे जास्तीत जास्त रु.११,०००/- पर्यंतच शिधास्वरुपात मदत देण्यात यावी, त्यापेक्षा जास्त वस्तुरुपाने मदत देण्यात येऊ नये, असे ठरलेले आहे.

त्यानुसार संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे. मा.व्यवस्थापन समितीची सभा नसलेने मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने शिधा देण्यात आला आहे..

तरी **अ.नं.१** मधील सरपंच, ग्रा. का. शिंगणापूर, व अध्यक्ष, साई यश मित्रमंडळ, सहजानंदनगर, पो. शिंगणापूर,ता.कोपरगांव,जि.अहमदनगर यांनी संजीवनी साखर कारखान परिसरात दि.१८/०८/०७ ते दि. २५/०८/०७ अखेर श्रीमद् भागवत सप्ताह आयोजित केला असून या सोहळ्याचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी तसेच **अ.नं.२** मधील सरपंच, ग्रा.का. सोनेवाडी, यांनी दि.१८/०८/२००७ ते दि.२५/०८/२००७ अखेर हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी व श्री साईसच्चरित्र पारायण सोहळा आयोजित केला असून त्या दोघांना रु.११,०००/- पर्यंतची शिधास्वरुपात मदत देण्यात आली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(ब) तसेच खाली दर्शविलेल्या मंडळानी मा.अध्यक्ष,.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | सरपंच, ग्रा. का. बेलापूर-खु., व अध्यक्ष, श्री हरीहर केशवगोविंद महाराज अखंड हरिनाम सप्तह कमिटी, बेलापूर बु. ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर (अर्ज दि.११/०८/२००७) | बेलापूरचे ग्रामदैवत श्रीहरीहर केशवगोविंद महाराज सप्ताह दि. दि.१८/०८/०७ ते दि.२५/८/०७ अखेर असून सप्ताह सोहळ्याचे धार्मिक कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | मा.अध्यक्षसो. यांचा शिधा देणेबाबत तोंडी निरोप. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

दि.२०/०५/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आ.वेळचा विषय क्र.१७ व निर्णय क्र.४१९ अन्वये येथुनपुढे जास्तीत जास्त रु.११,०००/- पर्यंतच शिधास्वरुपात मदत देण्यात यावी, त्यापेक्षा जास्त वस्तुरुपाने मदत देण्यात येऊ नये, असे ठरलेले आहे.

त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

त्यानुसार संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे. मा.व्यवस्थापन समितीची सभा नसलेने मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने शिधा देण्यात आला आहे..

तरी सरपंच, ग्रा.का. बेलापूर बु., अध्यक्ष, श्री हरीहर केशवगोविंद महाराज अखंड हरिनाम सप्ताह कमिटी, बेलापूर बु.ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांनी दि.१८/०८/२००७ ते दि.२५/०८/२००७ अखेर हरिनाम सप्ताह आयोजित केला असून त्यास रु.११,०००/- पर्यंतची शिधास्वरुपात मदत देण्यात आली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ श्रीपुण्यतिथी उत्सव-२००७ कलाकार निश्चित करणेबाबत.**

**निर्णय क्र.७५९** याबाबत स्थानिक उपसमितीचे सभेत चर्चा करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५ सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा खर्चास मंजूरी बाबत**

**निर्णय क्र.७६०** उपरोक्त विषयास अनुसरुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) , साई सिध्दी चॅरिटेबल ट्रस्ट, शिर्डी, व दत्त धार्मिक एवं परमार्थिक ट्रस्ट, इंदोर यांचे संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि.१९/०४/२००७ रोजी शिर्डी येथे सर्व धर्मीय सामुदायीक विवाह सोहळा आयोजीत करण्याचे दि.१७/०२/२००७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र. ५०, निर्णय क्र. २४५ ने मंजूर करण्यात आलेला आहे, सदरचे सामुदायीक विवाह सोहळ्यासाठी जागा, मंडप,

वधूवरांना पोषाख, सनई-चौघडा-वाजंत्री इ.चा खर्च साई सिध्दी चॅरिटेबल ट्रस्ट, शिर्डी, व दत्त धार्मिक एवं परमार्थिक ट्रस्ट, इंदोर यांनी केलेला आहे. तसेच खालील कारणांसाठी संस्थानने खर्च केलेला आहे.

| **अ.नं.** | **विभागाचे नांव** | **तपशील** | **अंदाजीत खर्च** |
|---|---|---|---|
| ०१. | जनसंपर्क कार्यालय | बोर्ड, बॅनर्स, जाहिराती इ. खर्च | ०२,२०,१५९.०० |
| ०२. | प्रसादालय विभाग | भोजन व्यवस्थेसाठी - धनधान्य, कंत्राटी कामगार, मजुरी इ. खर्च | ०२,५३,७४१.०० |
| ०३. | खरेदी विभाग | मणीमंगळसुत्र, भांडी, टोप्या इ. खर्च | ०३,१५,९०८.९० |
| ०४. | ध्वनीक्षेपण विभाग | केबल नेटवर्क जाहिरात, मटेरीयल खरेदी, **कंत्राटी कामगार** इ. खर्च | ००,०१,८३८.०० |
| ०५. | वाहन विभाग | मिरवणुकीकरीता घोडे, **ट्रॅक्टर,** कंत्राटी कामगार इ. खर्च | ००,०४,२०२.०० |
| ०६. | बगीचा विभाग | **हार, गुच्छ, इ. खर्च-** | ००,४४,०००.०० |
| ०७. | माहिती तंत्रज्ञान विभाग | मोबाईल खर्च | ००,००,६००.०० |
| ०८. | मंदिर विभाग | वाजंत्री, फटाके आतीषबाजी, कलाकार , शॉल, कंत्राटी कामगार इ. खर्च | ००,४३,४४०.०० |
| ०९. | कन्या विद्या मंदिर/ इं.मि.स्कुल, शिर्डी | अक्षता खर्च. | ००,१९,६५४.०० |
| १०. | संरक्षण विभाग | सुरक्षा गार्ड खर्च- | ००,१०,७१७.२० |
| ११. | चौकशी कार्यालय | जादा कंत्राटी कामगार खर्च | ००,००,६१८.०० |
| १२. | स्वच्छता विभाग | जादा कंत्राटी कामगार खर्च | ००,१४,७०१.४७ |
| १३. | बांधकाम विभाग | बोर्ड लावणे व इतर किरकोळ खर्च | ००,०५,७५९.०० |
| १४. | आय.टी.आय. | किरकोळ खर्च-सर्टीफिकेट इ. | ००.०० |
| १५. | प्र.शाखा, वशी-०५, | बॅचेस इ. बीले | ००,०१,२५०.०० |
| १६. | श्री साईबाबा हॉस्पीटल | जादा कंत्राटी कामगार खर्च | ००,००,७५७.०४ |
| | | **एकूण अंदाजीत खर्च -** | **०९,३७,३४५.६१** |

उपरोक्तप्रमाणे साधारणतः सर्व धर्मीय सामुदायीक विवाह सोहळयासाठी संस्थानचा रु.०९,३७,३४५.६१ इतका खर्च आलेला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१६** **पुस्तके फोटो छपाई कामाचे कोटेशन्स उघडून निर्णय घेणे बाबत**
**निर्णय क्र.७६१** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४.१०.२००६ चे सभेतील विषय नं.२९ निर्णय क्रं ८१२ नुसार डॉ. एम.विमला शर्मा द्वारा तेलगू भाषेतून रुपांतरीत केलेले कै.ले.क.मु.ब. निबाळकर लिखीत श्री साईंचे सत्य चरित्र प्रकाशित करणेबाबतचे समंत निर्णयानुसार सदर पुस्तकाचे प्रथम प्रकाशन असल्याने ५००० प्रती छपाई करुन घेणेस तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२९.०६.२००७ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२६ निर्णय क्रं.४८१ नुसार साईसत् चरित्र तामिळ व द्वारकामाई फोटो चार रंगात छपाई करुन घेण्याचे ठरले आहे. त्याचा छपाई विषयक तपशिल खालील प्रमाणे

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या |
|---|---|---|
| ०१ | श्री साईंचे सत्य चरित्र (गद्यात्मक) तेलगू | ५००० |
| ०२ | श्री साईसत् चरित्र तामिळ | २०,००० |
| ०३ | द्वारकामाई फोटो पाच रंगात रंगीत साईज १४ " X २०" | २,००,००० |

वरील प्रमाणे पुस्तके/फोटोंची छपाई ही मा. व्यवस्थापन समितीचे समंत निर्णयानुसार निवडक प्रेसधारकांकडून करुन घेणेकामी संबंधीत खालील प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/ १२२५०/२००७ दि.०४.०८.२००७ नुसार छपाई कामाचे कोटेशन्स पाठविण्यात येऊन ते पूर्णपणे भरुन दि.२३.०८.२००७ अखेर भरुन पाठविण्याचे कळविण्यात आले आहे.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.युनायटेड मल्टीकलर प्रिंटर्स,पुणे |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.प्रा.लि.दादर, मुंबई |
| ०३ | मे.रविक आर्टस् अॅन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई |
| ०४ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. |
| ०५ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०६ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०७ | मे.सुमंगल आरटेक, मुंबई |
| ०८ | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. |
| ०९ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे |
| १० | मे.प्रिंटोग्राफी फोर्ट, मुंबई |

| | |
|---|---|
| ११ | मे.प्रिंटमन, मुंबई |
| १२ | मे.विकास इले.(सकाळ पेपर्स) सातपूर, नाशिक |
| १३ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| १४ | मे.प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि. लातुर |
| १५ | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे |
| १६ | मे.चिराग प्रिंटर्स, मुंबई |
| १७ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| १८ | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई |
| १९ | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई |
| २० | मे नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लि., मुंबई |
| २१ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| २२ | मे ओनस प्रिंट सोलुशन (इंडिया) प्रा.लि., मुंबई |
| २३ | मे निर्मल ऑफसेट प्रा.लि., नाशिक |
| २४ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |
| २५ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| २६ | मे उचित ग्राफिक्स प्रिंटर्स प्रा.लि., मुंबई |
| २७ | मे एस.व्ही. प्रिंटर्स मुंबई |
| २८ | मे.प्रेमियर प्रेस,सिंकदराबाद |
| २९ | साई सिक्युरिटी प्रिंटर्स लि., बंगलोर |
| ३० | श्रीरंग प्रकाशने प्रा.लि., नाशिक |

वरील एकूण ३० निवडक प्रेसधारकांपैकी दि.२३.०८.२००७ अखेर मुदतीत खालीलप्रमाणे प्रेसधारकांची कोटेशन्स दाखल झालेली आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | मे एस.व्ही. प्रिंटर्स मुंबई | ०२ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| ०३ | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई | ०४ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| ०५ | मे.युनायटेड मल्टीकलर प्रिंटर्स,पुणे | ०६ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०७ | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई | ०८ | मे.प्रेमियर प्रेस,सिंकदराबाद |
| ०९ | मे ओनस प्रिंट सोलुशन (इंडिया) प्रा.लि., मुंबई | १० | मे निर्मल ऑफसेट प्रा.लि., नाशिक |
| ११ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर | १२ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| १३ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे | १४ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सादरकर्त्याचे नांव | श्री साईसत् चरित्र तामिळ दहावी आवृत्ती | श्री साईचे सत्य चरित्र तेलगू प्रथम आवृत्ती | व्दारकामाई फोटो पाच रंगात आकार १४" X २०" |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.युनायटेड मल्टीकलर प्रिंटर्स,पुणे | ५५.९५ | १५०.३५ | २.८७ |
| ०२ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर | ३१.९५ | १२८.०० | २.८५ |
| ०३ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ३८.२५ | १०३.२५ | २.५२ |
| ०४ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | ३५.११ | -- | २.३३ |
| ०५ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | **३१.८४** | **८४.५०** | २.५१ |
| ०६ | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई | ५९.२८ | १४५.६० | २.८३ |
| ०७ | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई | ४६.३० | १२१.८० | ३.०० |
| ०८ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे | ३६.५० | ११८.०० | **२.१५** |
| ०९ | मे ओनस प्रिंट सोलुशन (इंडिया) प्रा.लि., मुंबई | ४९.०० | १३१.९० | २.९२ |
| १० | मे निर्मल ऑफसेट प्रा.लि., नाशिक | -- | -- | ३.०० |
| ११ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | ४७.८२ | १२७.०० | ३.०० |
| १२ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | ३८.५० | १७१.०० | २.९० |
| १३ | मे एस.व्ही. प्रिंटर्स मुंबई | -- | -- | २.६२ |
| १४ | मे.प्रेमियर प्रेस,सिंकदराबाद | ४१.४० | १२६.०० | २.४५ |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील आधोरेखित निम्नतम दर मान्य करण्यात येऊन संबंधितांना पुस्तके व फोटो छपाईकामी आदेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **युनियन बँक ऑफ इंडिया विस्तारित कक्ष व स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ATM साठी दिलेल्या जागेच्या करारनाम्याचे नुतनीकरणे करणेबाबत.**

**निर्णय क्र.७६२** संस्थानला युनियन बँक ऑफ इंडिया व स्टेट बॅक ऑफ इंडिया या दोन्ही बॅका नियमित व चांगल्याप्रकारे सेवा देत आहेत. या दोन्ही बँका संस्थानची होणारी कॅश काऊंटींग तसेच देयकांचे धनादेश इ. सेवेत तत्पर आहेत. या बँकांचे संस्थानला होत असलेले नियमित सहकार्य पाहून त्यांना संस्थानने "साईनाथ छाया" इमारतीमध्ये व मंदिर परिसरात एक वर्षासाठी जागा भाडेतत्वावर दिलेल्या आहेत. या बँकांनी केलेल्या लेखी विनंतीनुसार त्यांनी भाडेतत्वाची मुदत पुढील एक वर्षासाठी वाढविण्याची विनंती करण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे -

(अ) युनियन बँक ऑफ इंडिया विस्तारीत कक्ष यांना "साईनाथ छाया" या इमारतीमध्ये संस्थानने एक वर्षासाठी जागा भाडेतत्वावर दिली आहे. त्याची मुदत ३१ मार्च २००७ रोजी संपल्याने, त्यांनी पुढील एक वर्षासाठी दिनांक १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ पर्यंतच्या कालावधीसाठी पूर्वीप्रमाणे रुपये ७,५००/- मासिक भाडे आकारुन जागा भाडेतत्वाचा कराराचे नुतनीकरण करण्याची विनंती केली आहे.

(ब) स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ATM साठी मंदिर परिसरामध्ये बँकेस एक वर्ष कालावधीसाठी जागा भाडे तत्वावर देण्यात आली आहे. त्याची मुदत ३१ मे २००७ रोजी संपलेली आहे. त्यांनी पुढील एक वर्षासाठी दिनांक १ जून २००७ ते ३१ मे २००८ पर्यंतच्या कालावधीसाठी पूर्वीप्रमाणेच रुपये ५,०००/- मासिक भाडे आकारुन जागा भाडे तत्वाच्या कराराचे नुतनीकरण करण्याची विनंती केली आहे.

उपरोक्त "अ" प्रमाणे युनियन बँक ऑफ इंडियाच्या विस्तारीत कक्षासाठी "साईनाथ छाया" इमारतीमधील जागेचे दिनांक १ एप्रिल २००७ पासून पुढे एक वर्षासाठी मासिक भाडे रुपये ७,५००/- आकारुन त्यांच्याशी भाडेतत्वाचा कराराचे नुतनीकरण करण्यास तसेच उपरोक्त "ब" प्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या ATM साठी मंदिर परिसरातील जागेत दिनांक १ जून २००७ पासून पुढे एक वर्षासाठी मासिक भाडे रुपये १०,०००/- (आंध्र बँकेच्या ATM साठी मासिक भाडे रुपये १०,०००/- आहे) आकारुन त्यांच्या कराराचे नुतनीकरण करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी/मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **ड्रेनेज चेंबर वरील झाकणे खरेदी करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.७६३** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/०७/२००७ चे सभेतील निर्णय क्रं. ६२६ नुसार पाणी पुरवठा विभागासाठी प्रसादालय, मंदिर परिसर, धर्मशाळा स्टाफ क्वॅार्टर, शैक्षनिक संकूल, धर्मशाळा-नांदुर्खी रोड इ. ठिकाणची चेंबर झाकणे फुटलेली असल्याने तेथे नविन झाकणे टाकणेसाठी नविन झाकणे कोटेशन मागवून खरेदी करणेकरीता अंदाजे एकुण रुपये २,३१,४८९/- मात्रचे खर्चास मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सदरची झाकणे खरेदी करणेकरीता कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्स धारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | ऋषिकेश इलेक्ट्रिकल्स, नाशिक. |
| ०२ | अमित कॉंक्रिट वर्क्स, कोकमठाण (कोपरगांव). |
| ०३ | स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन कोटेशन्ससादरकर्त्यांना उपसमितीचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात येऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **कनकुरी साठवण तलाव येथे ५० एच.पी. इलेक्ट्रीक मोटार व पॅनल बसविणे बाबत.**

**निर्णय क्र.७६४** उपरोक्त विषयान्वये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८.०७.२००७ चे सभेतील आयत्या वेळचा विषय नं. ०१, निर्णय क्रं. ५९६ (१०) नुसार लुबी कंपनीच्या ०२ नग ५० एच.पी. मोटारी खरेदी करणेसाठी अंदाजे रु. १,५०,०००/- व मोटारीकरीता लागणारा मोटार स्टार्टर पॅनल खरेदी करणेकरीता अंदाजे रु. १,३८,१३९/- मात्र व इतर आवश्यक मटेरियल खरेदी करावे लागणार असल्याने त्यासह येणारे अंदाजे एकुण रु. ३,३५,४०६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सदरच्या लुबी कंपनीच्या ०२ नग ५० एच.पी. मोटारी खरेदी करणेकरीता कोटेशन मागविण्यात आली त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | कोटेशन्स धारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी |

| | |
|---|---|
| ०२ | भनसाळी मोटर्स, राहाता. |
| ०३ | अनुराधा ॲग्रो एजन्सी, अकोले. |
| ०४ | सिध्दार्थ ट्रेडर्स, कोल्हार. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन कोटेशन्ससादरकर्त्यांना उपसमितीचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात येऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **गावरान तूप खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.७६५** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७.०२.२००७ मधील निर्णय क्र. १५० क (४) नुसार प्रसादालयामध्ये प्रसादलाडू तयार करणेकामी आवश्यक असणारे ४५०० क्विंटल गावरान तूप (ॲगमार्क/ लुज) दि.०१.०४.२००७ ते दि.३०.०९.२००७ व दि.०१.१०.२००७ ते दि.३१.०३.२००८ अशा दोन टप्प्यात खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार माहे एप्रिल २००७ ते सप्टेंबर २००७ या कालावधीकरीता आवश्यक असणारे २२५० क्विंटल गावरान तूप खरेदीकामी निविदा मागविणेत आलेल्या होत्या. त्यावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०.०४.२००७ मध्ये निर्णय होऊन मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड यांना १७०० क्विंटल (ॲगमार्क) व मे.विजय डेअरी, जळगाव यांना ५५० क्विंटल (लूज) गावरान तूप पुरविणेसाठी रु.१३५.२० प्रती किलो या न्युनतम दराने वार्षिक पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. मे.जयहिंद किराणा, नाशिक रोड यांनी आजअखेर २३६९.६० क्विंटल गावरान तूपाचा पुरवठा केलेला असल्याने त्यांना दिलेल्या आदेशाव्यतिरिक्त ६६९.६० क्विंटल गावरान तूपाचा जादा पुरवठा केलेला आहे. मात्र मे.विजय डेअरी, जळगाव यांनी आजअखेर फक्त ४३.४० क्विंटल गावरान तूपाचा पुरवठा केलेला आहे. त्यामुळे प्रसादलाडूत अडचण होऊ नये म्हणून मे.विजय डेअरी, जळगाव यांचेकडील पुरवठा मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड यांचेकडून पुर्ण करुन घेणेत आलेला आहे. त्यानुसार दि.२०.०९.२००७ अखेर सर्व मिळून २४१३ क्विंटल गावरान तूपाचा पुरवठा झालेला असून सहामाही मंजूरीपैक्षा १६३ क्विंटल गावरान तूपाचा जादा पुरवठा झालेला आहे.

सन २००७-०८ मध्ये पहिल्या सहामाही २२५० क्विंटल गावरान तूपाची मागणी केलेली होती. मात्र साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस वाढतच असल्याने प्रसादलाडूचा खप फारच प्रमाणात होत आहे. परिणामी गावरान तूपाचा व हरबराडाळीचा वापर वाढत आहे. गावरान तूपाची दुसरी सहामाही १ ऑक्टोंबर २००७ पासून सुरुवात होत असल्याने, त्यासंबंधित निविदा मागविणेत आलेल्या आहेत मात्र निर्णय होणे बाकी आहे. तोपर्यंत प्रसादलाडूसाठी आवश्यक असणारे गावरान तूप मान्य दराने मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड यांचेकडूनच खरेदी करणेत आहे.

तरी गावरान तूपाच्या दुसऱ्या सहामाहीचा निर्णय होईपर्यंत मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड यांचेकडून मान्य मंजूर दराने गावरान तूप खरेदी करणेस व एकुण मंजूरीपेक्षा जादा खरेदी कराव्या लागणाऱ्या गावरान तूपास व त्यासाठी येणारे जादा खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **मा.उच्च न्यायालय,मुंबई, खंडपीठ औरगांबाद यांचे कोर्टातील रिट पिटीशन नं.४६४०/२००७ राजेंद्र उत्तमराव शेळके वगैरे विरुध्द दि स्टेट ऑफ महाराष्ट्र वगैरे बाबत**

**निर्णय क ७६६** **०१)** मा.उच्च न्यायालय,मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे खालील प्रमाणे रिट पिटीशन नुकतेच दाखल झाले आहे.

**अ) ०१) रिट पिटीशन नं.४६४०/२००७ राजेंद्र उत्तमराव शेळके,**
**०२) सुरेश गंलाडे पाटील, विरुध्द दि स्टेट महाराष्ट्र वगैरे ...**

**०२)** उपरोक्त रिट पिटीशन मध्ये १) दि स्टेट ऑफ महाराष्ट्र यांचे समवेत ,०२) दि चॅरीटी कमिशनर, ०३) श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट सामनेवाले ४ ते १९ संस्थानचे मा.विश्वस्त,अ.नं.२० श्री बी.आर.वाक्चारे, अ.नं.२१ श्रीमती सुमित्रा कोते, अ.नं.२२ श्रीमती शालिनीताई विखे पाटील, अ.नं.२३ श्री विलासराव देशमुख, मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना सामनेवाले / रिस्पॉडन्ट केले आहे.

**०३)** सदर रिट पिटीशन मा.उच्च न्यायालयाकडे दाखल करुन त्यामध्ये अर्जदाराने खालील प्रमाणे मागणी / विनंती मा.कोर्टास केलेली आहे.

अे ) संस्थानचे सध्याचे मा.व्यवस्थापन समितीस शासनाने मुदतवाढ देऊ नये,असे मा.उच्च न्यायालयाने निर्देश द्यावेत.

बी) प्रस्तुत याचिकाचे सुनावणी पावेतो,अंतरिम निकाल पावेतो संस्थान संबंधात नियम तयार होई पावेतो. छाननी समिती, भक्तमंडळ स्थापन होई पावेतो रिस्पॉडंट सामनेवाला यांना प्रतिबंध करणेबाबत मा.कोर्टाकडून अंतरिम स्थगनादेश देणेत यावा.

सी) शासन पत्र दि.२३/०८/२००४ चे अधिसुचना विचारांत घेता सामनेवाले नं.४ ते १९ - संस्थानचे मा.विश्वस्त यांनी व्यवस्थापन समितीचे काम पाहू नये,असा मनाई हुकूम मिळावा.

डी) कायद्याचे कलम २५ प्रमाणे महाराष्ट्र शासनाने व संस्थानने कायद्याचे विविध तरतुदीचे प्रमाणे नियम करण्यात यावेत असे आदेश व्हावेत.तसेच शासनाने भक्तमंडळ व छाननी समिती नियम तयार करावेत असे मा.कोर्टाने आदेश करावेत, असे याचिका कर्त्याने याचिकेत विनंती केली आहे.

इ) तसेच प्रतिवादी नं.०४ ते १६ व २० यांचे विरुध्द रक्कमेचा अपहार केला, म्हणुन गुन्हे दाखल करावेत असे शासनास आदेश व्हावेत.

एफ) प्रतिवादी नं.२० यांनी त्यांचे कार्यकारी अधिकारी यांचे कार्यकालात केलेले बेकायदा कृत्याबाबत शिस्तभंगाची कार्यवाही व्हावी, असे शासनास आदेश व्हावेत.

जी) शासनाकडून कायद्यामध्ये दुरुस्ती करुन नियम तयार करुन संस्थानचे विश्वस्त नेमणुकीबाबतचे निकष तयार करवे,असा आदेश व्हावा.

एच) शासनाने कायद्यामध्ये दुरुस्ती करुन अथवा नियम तयार करुन कार्यकारी अधिकारी यांना गैरवर्तनाबाबत, कामाच्या हलगर्जीपणबाबत, काढून टाकणेबाबत नियम तयार करावेत.

आय) शासनाने राजकीय व्यक्तींची निवड संस्थानवर करु नये,असे तुर्तातुर्त मनाई हुकूम व्हावा.

जे) मा.जिल्हा न्यायालयाचे अध्यक्षेखाली जिल्हा परिषद, कार्यकारी अधिकारी, पोलिस अधिक्षक,अहमदनगर, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग-अ.नगर, जिल्हा परिषद - कार्यकारी अधिकारी, यांचे मार्फत प्रशासकीय कमिटी तयार करुन त्यांचे मार्फत कार्यभार पहाणेत यावा, अशा आशयांचे विनंती writ मध्ये करणेत आलेली आहे.

के) छाननी समितीचे शिफारशी शिवाय देणेत आलेला निधी संस्थानचे विश्वस्तांकडून वसुल करणेत यावी.

एल) श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट ॲक्ट २००४ मधील कलम ३२ घटनेचे कलम १४ तरतुदीचे विरुध्द असल्याचे जाहीर व्हावे अशा आशयाचे मागणी प्रस्तुत याचिकेमध्ये करणेत आलेली आहे.

**०४)** सदर रिट पिटीशनमध्ये याचिकाकर्त्याने संस्थानचे संबंधी शासनाने केलेल्या कायद्याबाबत शासनाने नियुक्त केलेले मा.व्यवस्थापन सदस्यांबाबत तसेच मा.कार्यकारी अधिकारी यांचेबाबत अक्षेप घेतलेले आहेत. अर्जदाराने रिट पिटीशनमध्ये घेतलेले अक्षेपाचा आशय खालील प्रमाणे आहेत.

मंदीर मा.सिटी सिव्हील कोर्टाकडून मंजूरी झालेले नियमावली प्रमाणे संस्थानचा कारभार सुरळीत चालला असतांना मंदीर ताब्यात घेणेसाठी श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट ॲक्ट २००४ हा कायदा आवश्यकता नसतांना करणेत आलेला आहे. कायदा हा घटनेचे तरतुदीचे विरुध्द आहे. शासनाने ३ वर्षात नियम केलेले नाहीत. व्यवस्थापन समितीचे सदस्यांना त्यांचे मनाप्रमाणे संस्थान निधीचा व मिळकतीचा वापर मोकळेपणाने करता यावा, असा हेतू असावा. मा.कोर्टाने तयार केलेले स्किम ऐवजी शासन ॲक्ट तयार करु शकत नाही. मा.व्यवस्थापन मंडळाचे सदस्यांची निवड निकाशाची तरतूद सध्याचे कायद्यामध्ये नाही.राजकीय व्यक्तींचे नेमणुका झालेल्या आहेत. हे संस्थानचे हिताचे नाही. कार्यकारी अधिकारी यांना काढून टाकण्याची तरतूद कायद्यामध्ये नाही.

श्रीसाईबाबा संस्थानचा कारभार हा इतर अंगीकृत संस्थेसारखा किंवा सरकारी खात्या सारखा आहे, असे शासनाने मानले.राजकीय व्यक्तींच्या नेमणुकीमुळे अनेक कोटीचे संस्थानचे नुकसान झालेले आहे. आमदार,माजी आमदार, माजी मंत्री यांची संस्थानचे व्यवस्थापन कमिटीवर नेमणुक होणे आक्षेपहार्य आहे. संस्थानचे प्रतिष्ठेला धोकादायक आहे. संस्थानच्या गैरकारभारापेक्षा हे अधिक नुकसानकारक आहे. संस्थानचे भक्तमंडळ अदयाप स्थापन केलेले नाही. सल्लागार समितीचे कामकाज नियमीतपणे नाही. परिणामतः मंदीराच्या पुजा विधी, उत्सव, प्रथा, सन यांचे पंरपंरेकडे दुर्लक्ष झालेले आहे.संस्थान निधीवर नियंत्रण ठेवणेसाठी छाननी समितीची ३ वर्षामध्ये निवड झालेली नाही. परिणामतः करोडो रुपयांच्या निधीचा दुरुपयोग व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांकडून झालेला आहे. सदर निधीचा उपयोग स्वतःसाठी व राजकीय हेतूनूसार करण्यात आलेला आहे. मंडळाचे सदस्य त्यांचे पदाचा उपयोग राजकीय कामासाठी करीत आहे.

मा.मुख्यमंत्री संस्थानचा वापर स्वतःची मिळकत असल्यासारखा संस्थान निधीचा वापर स्वतःचे इच्छेप्रमाणे करीत आहे. मा.व्यवस्थापन मंडळाचे सदस्य त्यांचे संस्थेस कामाचे ठेके देत आहे. डिपॉझिटची रक्कम परत देत आहे. आर्कीटेक म्हणून नातेवाईकांस नेमलेले आहे.

संस्थानचे कार्यकारी अधिकारी यांचा ६ वर्षा पेक्षा जास्त कार्यकाळ झालेला आहे. ते व्यवस्थापन मंडळाचे सांगण्याप्रमाणे काम करतांत. स्वतंत्रपणे काम करीत नाहीत. संस्थानवर नियंत्रण आणण्यासाठी व्यवस्थापन प्रशासन सुधारण्याच्या नावाखाली नविन कायदा केलेला आहे. मा.मुख्य मंत्र्या सारखा सत्ताधारी व्यक्तीने राजकीय लोकांची सोय लागण्यासाठी तरतूद केलेली आहे. कायदा

करीत असतांना अनेक त्रुटीसह कायदा तयार केलेला आहे. भक्तमंडळ, छाननी समितीबाबत पुर्तता नाही. छाननी समितीच्या शिफारशी शिवाय कायद्याचे विरुध्द खर्च होत आहे. भक्तांचे सुविधेकडे दुर्लक्ष झालेले आहे.शासनाने डेप्युटी कलेक्टर दर्जा पेक्षा कमी दर्जा नसलेल्या व्यक्तीची कार्यकारी अधिकारी म्हणून निवड करण्याचे ठरविले होते. परंतू सदरची पात्रता बदलून कार्यकारी अधिकारी यांची निवड करण्यात आलेली आहे.

शासनाची पुर्व परवानगी शिवाय फंड देऊ नये असे शासनाने कळविलेले असतांनाही बेकायदा असा फंड देण्यात आलेला आहे. मा.व्यवस्थापन मंडळाचे सदस्यांचे तसेच कार्यकारी अधिकारी यांचे विरुध्द शासनाने केसेस दाखल कराव्यात तसेच कार्यकारी अधिकारी यांचे विरुध्द शिस्त भंगाची कार्यवाही व्हावी,अशा आशयाचे कथन प्रस्तुतच्या W.P. मध्ये करण्यात आलेले आहे.सामुदायिक विवाह खर्च झाला आहे. सी.टी.ॲन्ड गिल्ड, इंटरनॅशनल युनिव्हरसिटी, लंडन यांच्या अभ्यासक्रमासाठी झालेला खर्च, साठवण तलावासाठी झालेला खर्च याबाबत रिट पिटीशनर यांचा आक्षेप आहे. त्याच प्रमाणे संजीवनी मिल्क,प्रायव्हेट लिमिटेड यांना दूध पुरविण्याचे कॉन्ट्रक्ट दिले होते.त्यांचे डिपॉझिट रुपये- २,५०,०००/- परत करण्यात आले, हे सेक्शन ९ (अे ) चे विरोधात आहे.तंत्रनिकेतन महाविद्यालय,लोणी यांना रक्कम देणेबाबत विश्वस्तांकडून शिफारस करण्यात आली. आमदार श्री व छत्रपती श्री या खेळाच्या स्पर्धेसाठी संस्थानने खर्च केला.फॉगिंग मशिनसाठी खर्च केला. नगरपंचायतीस जे.सी.बीचे भाडे माफ केले. पुरग्रस्तंचे पुर्नवसनासाठी कांही बाबी विकत घेतल्या अशा खर्चासाठी अर्जदाराने त्यांच्या रिट पिटीशनमध्ये अक्षेप घेतला आहे.

**०५)** उपरोक्त रिट पिटीशनचे प्रति व समन्स अर्जदारांकडून २२/०८/२००७ रोजी इकडील कार्यालयांस प्राप्त झालेनंतर सर्व मा.विश्वस्तांना दि.२३/०८/२००७ रोजी सादर करणेत आलेले आहे. प्रकरणी दि. ३१/०८/२००७ रोजी तारीख नेमणेत आली होती. याकामी संस्थानतर्फे श्री आर.एन.धोर्डे, ॲडव्होकेट, यांचेकडे वकीलपत्र सुपूर्त करुन काम पाहणेस विनंती केलेली आहे.मुंबई येथे ॲड.श्री प्रमोद पाटील यांना काम पाहणेस विनंती केली आहे.

त्याप्रमाणे त्यांचेशी समक्ष कागदपत्राबाबत चर्चा करुन संस्थानतर्फे दाखल करावयाचे शपथपत्र तयार केले आहे. दिनांक ३१/०८/२००७ रोजी प्रकरणी २ आठवडयांची मुदत मा.कोर्टाने दिलेली आहे.मात्र दिनांक ०७/०९/२००७ रोजी उच्च न्यायालय,मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे संस्थान संबंधी या रिट पिटीशससह अन्य ३ रिट पिटीशन्स , रिट पिटीशन नं.३९५१/२००५, रिट पिटीशन नं.२६९२/२००७ रिट पिटीशन नं. ५००८/२००७ हे रिट पिटीशन अन्य बेंचकडे ट्रान्सफर व्हावेत ,असा पिटीशनरने अर्ज दिला आहे. सदर अर्ज हा प्रकरणी वेळ काढूपणाचा सुनावणीसाठी उशिर व्हावा या हेतूने केला असावा असे मा.कोर्टाने आदेशामध्ये नमुद केले असून रक्कम रुपये- २५,०००/- खर्चाची रक्कम मा.कोर्टात १ आठवडयात जमा करणेस आदेश केला असून ३ आठवडया पावेतो (दि.२८/०९/२००७ ) तारीख वाढवून दिलेली आहे.

**०६)** सदर प्रकरणी संस्थानचे ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे सो. यांचेमार्फत सामनेवाला नं.०३ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी ) यांचेवतीने मा.कोर्टापुढे बाजु मांडणेत येत आहे.

तसेच ॲडव्होकेट श्री विनायकराव होन यांचे मार्फत मा.व्यवस्थापन समिती सदस्यांची बाजु मांडणेत येत असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रकरणी वरीलप्रमाणे वकीलांचे सल्ल्याने कार्यवाही करण्यात यावी. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २२** **रिट पिटीशन नं. ५००८/२००७ श्री राजेंद्र शेळके वगैरे विरुध्द दि स्टेट ऑफ महाराष्ट्र वगैरे चे बाबत.**
**निर्णय क ७६७** १) श्री राजेंद्र उत्तमराव शेळके व इतर २ यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे रिट पिटीशन नं. ५००८/२००७ असा पिटीशन दाखल केलेला आहे. या रिट पिटीशन मध्ये महाराष्ट्र शासन सामनेवाले नं. १ , मा.धर्मादाय आयुक्त मुंबई सामनेवाले नं.२ , व श्री साईबाबा संस्थान यांना सामनेवाले नं. ३ पक्षकार केलेले आहे. तसेच सामनेवाले नं. ४ श्री बी.आर.वाकचौरे यांचे विरुध्द पिटीशन दाखल केले आहे.

२) सामनेवाले नं. ४ श्री बी. आर. वाकचौरे कार्यकारी अधिकारी सो. यांचे संदर्भात डेस्क ऑफीसर विधी व न्याय खाते यांनी दि. २५/०५/२००७ रोजी अधिसुचने अन्वये नेमणूक कार्यकाल / कालावधी वाढविला आहे. त्या विरुध्द सदर अर्ज दाखल आहे. कार्यकारी अधिकारी कार्यालयाचे कामकाज ते कोणत्या अधिकाराने पहात आहेत याबाबत पिटीशनरने अर्जात मुद्दा उपस्थीत केलेला आहे. व्यवस्थापन समितीचे निर्णयांची अंमलबजावणी करणेचे व इतर अधिकार कार्यकारी अधिकारी यांना आहेत.संस्थान मिळकतीची देखरेख कार्यकारी अधिकारी यांचेकडे आहे. परंतू महाराष्ट्र शासनाने कार्यकारी अधिकारी यांच्या बाबत अशा सेवा शर्ती नियम अद्याप तयार केलेल्या नाहीत. यापुर्वी सिटी सिव्हील कोर्टाने मंजूर केलेल्या स्किम प्रमाणे कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती झालेली आहे. २००४ चे ॲक्ट प्रमाणे कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय निर्माण झालेले आहे. सामनेवाले नं. ४

श्री बी. आर. वाकचौरे यांची नेमणूक कायद्याच्या कलम १३ चे विरुध्द आहे. दि. २५/०५/२००७ रोजीची अधिसुचना कायद्याच्या कलम १३ च्या विरुध्द आहे. त्याच प्रमाणे Maharastra Government Sarvant Reguletion of Transfar & Preventention of delay in discharge in official duty Act २००५ च्या विरोधात आहे. त्यामुळे त्यांची नेमणूक कायद्यास धरुन नाही. कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक by way of selection होणे आवश्यक होते. डेप्युटी कलेक्टर पक्षा कमी नसलेल्या व्यक्ती तून निवड होणे आवश्यक होते. सामनेवाले नं. ४ यांची निवड अशा प्रकारे झालेली नाही. इत्यादी मुद्दे अर्जदाराने त्यांच्या रिट पिटीशन मध्ये नमुद केले आहेत.

अर्जदाराने रिट पिटीशन मध्ये सामनेवाला ने. ४ यांना कार्यकारी अधिकारी या पदावरुन हटवावे. त्यांना मध्यांतरीच्या काळात संस्थानचे कामकाज करणेस मनाई असावी. श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे कार्यकारी अधिकारी कार्यालय रिक्त असल्याचे जाहिर व्हावे अशी विनंती मा. कोर्टास केली आहे.

सदर रिट पिटीशन चे समन्स संस्थानला व मा.कार्यकारी अधिकारी श्री बी.आर.वाकचौरे सो. यांना प्राप्त झाले आहेत. संस्थान तर्फे ॲड. आर.एन.धोर्डे सो. व मा. कार्यकारी अधिकारी यांचे तर्फे ॲड. विनायकराव होन यांना काम पहाणेस विनंती केली आहे. मा.कोर्टाचे समन्स प्रमाणे प्रकरणी १८/०९/२००७ रोजी तारीख होती परंतू तत्पुर्वी दि. ७/०९/२००७ रोजी सदर रिट पिटीशन ( व इतर ३ रिट पिटीशन ) वेगळ्या बेंचकडे ट्रान्सफर होणेबाबत अर्जदाराने अर्ज दिलेला आहे. याबाबत मा. कोर्टाने अर्जदारांस रु. २५,०००/- रक्कम अदा करणेबाबत हुकूम केला आहे. तसेच प्रकरणी ३ आठवडे (२८/०९/२००७) रोजी तारीख दिली आहे.

माहितीसाठी व सामनेवाले नं.४ श्री बी. आर. वाकचौरे कार्यकारी अधिकारी यांचे वतीने मुंबई येथील कामकाजासाठी मुंबई येथील वकील व औरंगाबाद येथील कामकाजासाठी श्री विनायकराव होन ॲडव्होकेट यांनी प्रस्तुत प्रकरणी कामकाज पाहणेस विनंती केली असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रकरणी वरीलप्रमाणे वकीलांचे सल्ल्याने कार्यवाही करण्यात यावी. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **नियोजित साईआश्रम प्रकल्पापैकी आर ब्लॉक इमारतींचे व ओपन एअर थिएटरचे बांधकाम संस्थानमार्फत करणेबाबत.**

**निर्णय क्र.७६८** **(अ)**मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई (तामीळनाडू) यांचेमार्फत साईभक्तांच्या निवासाकरीता " साईआश्रम " तसेच वृध्दांसाठी वृध्दाश्रम व अनाथांसाठी अनाथाश्रम " साईविश्राम " तसेच ध्यानासाठी " साईध्यान" प्रकल्प देणगी स्वरुपात बांधकाम करुन देणार आहेत. याबाबत संस्थान व शिर्डी साई ट्रस्ट यांचेमध्ये दिनांक ०४ फेब्रुवारी, २००६ रोजी समजुतीचा करार झालेला आहे.

**(ब)** शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातील समजुती करारातील तपशील खालीलप्रमाणे :

संस्थानकडून उपलब्ध होणारे जागेत साईआश्रम हा भक्तनिवासस्थान प्रकल्प उभारणेत येणार आहे. या साईआश्रम इमारतीत सुमारे १०,००० साईभक्तांची निवासी व्यवस्था होणार आहे. या साई आश्रम प्रकल्पाच्या इमारतींमध्ये प्रसाधनगृहासह राहण्याच्या खोल्या, धर्मशाळा, स्वच्छतागृह आदि सोयी करुन दिल्या जाणार आहेत. या साईआश्रम प्रकल्पाचे बांधकाम नकाशे शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेकडून, संस्थानच्या मान्यतेने अंतिम करण्यात येत आहेत. या प्रकल्पासाठी येणारा सर्व इमारत बांधकाम खर्च शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत केला जाणार आहे. दिनांक ०४ फेब्रुवारी, २००६ रोजीचे समझोता करारातील कलम २१ नुसार, साईआश्रम प्रकल्पाची अंदाजित किंमत रुपये २५ कोटी मात्र होती.

साईआश्रम प्रकल्प संस्थान मालकीच्या मौजे शिर्डी मधील सर्व्हे नंबर १०७ व १०८ पैकी मधील जमिनीमध्ये व मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नंबर १७२ मधील जमिनीमध्ये अशा दोन विभागात उभारण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांनी त्यांचेकडील दिनांक २० सप्टेंबर, २००९ रोजी कळविलेल्या माहितीनुसार या प्रकल्पासाठी येणाऱ्या अंदाजित खर्चाचा थोडक्यात गोषवारा खालील प्रमाणे :

| Sr.No. | Description | No.Of Blocks | Total Amount Rs. |
|---|---|---|---|
| **(A) Phase I : Shirdi S.No.107/108/109 P** | | | |
| 01 | A Block (IWC) | 5 | 172720380.80 |
| 02 | A Block (EWC) | 7 | 242274832.49 |
| 03 | S Block | 2 | 317695.10 |
| 04 | R Block | 1 | 14916834.80 |
| 05 | OAT | 1 | 14093291.79 |
| 06 | Electrical | | 3294306.15 |
| | | **Total (A)** | **477277341.13** |

| | | | |
|---|---|---|---|
| **(B) Phase I : Nimgaon Korhale Gat No. 172** | | | |
| 01 | B Block | 6 | 178832237.23 |
| 02 | S Block | 2 | 317695.10 |
| 03 | R Block | 1 | 14916834.80 |
| 04 | Electrical | | 13381802.60 |
| | | **Total (B)** | **207448569.73** |
| | | **TOTAL (A+B)** | **684725910.86** |

थोडक्यात, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत सुरुवातीस करण्यात येणाऱ्या खर्चात मोठया प्रमाणावर वाढ झालेली असून, आता या प्रकल्पाची अंदाजित किंमत ६८.४७ कोटी पर्यन्त वाढलेली आहे.

**(क)**मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ जुलै, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६४३ अन्वये साईआश्रम प्रकल्पाचे परिसर विकासासाठी अंदाजित रक्कम रुपये २०.४३ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. एकंदर या प्रकल्पासाठी शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीमार्फत करण्यात येणाऱ्या खर्चाची रक्कम रुपये ८९ कोटी पर्यन्त जात आहे.

याबाबत शिडी साई ट्रस्ट, चेन्नईचे कार्यकारी विश्वस्त श्री.के.व्ही.रमणी यांचेशी मा.अध्यक्षसो. यांनी चर्चा केली. या चर्चेच्या दरम्यान त्यांनी असे नमूद केले की, साईआश्रम प्रकल्पासाठी करारनाम्यानुसार शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई रुपये २५ कोटी इतका खर्च करणार होते. परंतु प्रकल्प आराखडा तयार करतांना साईआश्रम प्रकल्पाच्या भाग १ व भाग २ साठी येणारा खर्च साधारणतः रक्कम रुपये ६८.४७ कोटी पर्यन्त जात आहे. त्याचबरोबर कन्सल्टंट यांची फी, निविदा मागविण्यांत आल्यानंतर बांधकाम खर्चात होणारी वाढ याचा विचार करता ही रक्कम बरीच वाढण्याची शक्यता आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नईमार्फत साधारणतः रुपये ६५ कोटीपर्यन्त निधी खर्च करण्यात येणार आहे. यावर मा.अध्यक्षसो. यांनी श्री.रमणी यांना असे सुचविले की, या प्रकल्पातील सर्वसाधारण भक्तांसाठी उपलब्ध करण्यात यावयाच्या सुविधांसाठी जे बांधकाम करण्यात येणार आहे, जसे आर ब्लॉक्सच्या इमारती (बुकींग ऑफिस, वेटींग हॉल, रेस्टॉरंट आदि), ओपन एअर थिएटर अशा इमारतींचा बांधकाम खर्च संस्थान करु शकेल. त्यामुळे मुळ साईआश्रम प्रकल्पाच्या संकल्पनेला कोणत्याही प्रकारचा धक्का लागणार नाही व हा प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करता येईल.

उपरोक्त विवेचनाचा विचार करतां, संस्थानमार्फत खालील इमारतींचे बांधकाम करतां येईल :

| Sr.No. | Description | No.Of Blocks | Total Amount Rs. |
|---|---|---|---|
| **(A) Phase I : Shirdi S.No.107/108/109 P** | | | |
| 04 | R Block | 1 | 14916834.80 |
| 05 | OAT | 1 | 14093291.79 |
| | | **Total (A)** | **29010126.59** |
| **(B) Phase I : Nimgaon Korhale Gat No. 172** | | | |
| 03 | R Block | 1 | 14916834.80 |
| | | **Total (B)** | **14916834.80** |
| **(C)** | **Electrical** | | **6000000.00** |
| **(D)** | **Contingencies Charges** | **Approx.** | **2500000.00** |
| | | **TOTAL (A+B)** | **52426961.39** |

उपरोक्त तक्त्यातील रक्कमेमध्ये आर्किटेक्ट फी, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार फी, सर्व्हिस टॅक्स आदि रक्कमांचा समावेश केलेला नाही. उपरोक्त तक्त्यातील रक्कमेमध्ये साधारणतः १० टक्के वाढ होण्याचा संभव आहे. संस्थान मार्फत करावयाच्या कामाचे अंदाजपत्रक साधारणतः रक्कम रुपये ५.७६ कोटी पर्यन्त होईल, असा प्राथमिक अंदाज आहे.

**(ड)** तरी उपरोक्त परिच्छेद क मध्ये नमूद केल्याप्रमाणे साईआश्रम प्रकल्पातील आर ब्लॉक्स, ओपन एअर थिएटर आदि इमारतींचे बांधकाम संस्थानमार्फत करण्यांस, त्याकामी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास तसेच इमारतींचे बांधकाम करणेकामी विहित पध्दतीने कार्यवाही पूर्ण करणेस मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे विचारार्थ प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

या प्रस्तावावर साधक-बाधक चर्चा होऊन,शिर्डी साई ट्रस्ट,चेन्नई यांचेमार्फत उभारण्यांत येणाऱ्या साईआश्रम प्रकल्प भाग १ (मौजे शिर्डी सर्व्हे नंबर १०७ पै/१०८ पै/१०९ पै) व भाग २ (मौजे निमगाव कोऱ्हाळे गट नंबर १७३) यामधील आर ब्लॉक्स (बुकींग ऑफिस,वेटींग हॉल, रेस्टॉरंट आदि) ओपन एअर इलेक्ट्रिक कामाचे तसेच A,B व C ब्लॉकमधील सर्व इमारतींमध्ये लिफ्ट,सोलर इत्यादींचा या प्रकल्पात समाविष्ट असणाऱ्या इमारतीचे बांधकाम संस्थान खर्चाने करण्यात यावे. साईआश्रम प्रकल्पाचे बांधकामासाठी शिर्डी साई ट्रस्ट,चेन्नई यांनी निविदा सुचना काढलेली आहे. या निविदेमध्ये त्यांनी ए ब्लॉक, बी ब्लॉक,एस ब्लॉक्स या इमारतींसह आर ब्लॉक्स, ओपन एअर थिएटर इमारतींच्या बांधकामाचा ही समावेश केलेला आहे. साई आश्रम प्रकल्पाचे बांधकामासाठी शिर्डी साई ट्रस्ट,चेन्नई यांनी नामांकित निवडक बांधकाम ठेकेदारांची प्रकल्प सल्लागारांच्या मार्गदर्शनानुसार निवड केलेली आहे. तथापि उपरोक्त इमारतींची कामे संस्थानमार्फत स्वतंत्ररितया निविदा मागवून करावे लागणार आहे. याकामी साईआश्रम प्रकल्पाचे आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांचेकडून सविस्तर बांधकाम नकाशे व अंदाजपत्रक तयार करुन

घ्यावे लागतील. तसेच साईआश्रम प्रकल्पाचे व्यवस्थापन सल्लागार मे.डॉर्श कन्सल्टंट,मुंबई यांचेकडून निविदा तयार करुन घ्यावे लागतील. याकामी खालील बाबींना मान्यता देण्यात आली.

०१. उपरोक्त कामास व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५.७६ कोटी मात्रचे अपेक्षित खर्चास व इतर योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

०२. सदरहू कामांसाठी आर्किटेक्ट डि.ओ.निकम,पुणे यांची साईआश्रम प्रकल्पाचे मंजूर आर्किटेक्ट फीच्या दरामध्ये नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.

०३. सदरहू कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.डॉर्श कन्सल्टंट,मुंबई यांची साईआश्रम प्रकल्पाचे मंजूर कन्सल्टंट फीच्या दरामध्ये नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली.

०४. सदरहू कामांसाठी व यापुर्वी मंजूर करण्यात आलेल्या परिसर विकास (External Development) कामांसाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन एकत्रितरित्या निविदा मागविण्यांत याव्यात. या कामांसाठी अव्वल क्षमतेचे व दर्जेदार काम करणारे नामांकित ठेकेदार मिळावेत यासाठी निविदेमध्ये योग्य त्या स्वरुपात पूर्वपात्रता निकष (Pre-qualifying Criteria) नमूद करावेत.

तसेच, साईआश्रम प्रकल्पाचे बांधकाम सुरु झालेनंतर अपारंपारिक अर्जा स्त्रोतातंर्गत सोर उर्जा संयत्र (SWH System), नियोजित सर्व इमारतीमध्ये लिफ्ट (Lift) आदि बसविणेसाठी विद्युत विभागामार्फत कार्यवाही सुरु करण्यात यावी,असें ठरले (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेच**

**विषय नं. २४** **शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.७६९** **(अ)** मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये, शिर्डी गांवातील व परिसरातील एकुण २५ रस्ते प्राधान्य क्रमाने तीन टप्प्यात विकसित करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई / पुणे यांचेकडून करुन घेण्यात यावे, असे ठरलेले आहे. याकामी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई / पुणे यांचेशी शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेच्या प्रकल्पासंदर्भात दिनांक १५ ऑक्टोबर, २००६ रोजी शिर्डी येथे मरारविम यांचे मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे मुख्याधिकारी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी समझोता करारनामा करण्यात आलेला आहे. या करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पासाठी येणाऱ्या सर्व खर्चासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

मा. व्यवस्थापन समितीच्या विविध निर्णयांस अनुसरुन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधील सुधारित कलम २१ (२) (२) मधील तरतुदीस अनुसरुन शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्प राबविणेकामी मान्यता मिळणेसाठी विधी व न्याय विभागाकडे दिनांक ०७ जुलै, २००६ व दिनांक २४ जानेवारी, २००७ प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदरील प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

**(ब)** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांचे माध्यमातून शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे आर्थिक मदतीने राबविण्यात येणार आहे. या संदर्भात कामकाजाचा पाठपुरावा करणे व विविध संस्थांमध्ये कामकाजासंबंधी समन्वय साधणे यादृष्टीने शिर्डी येथे संस्थानच्या सभागृहात मा.मुख्य अभियंता, मरारविम, मुंबई यांनी सर्व संबंधीत संस्थांचे पदाधिकारी / अधिकारी यांची दिनांक ०५ एप्रिल, २००७ रोजी सभा बोलाविली होती. या सभेमध्ये शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेच्या कामकाजाच्या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

या चर्चेच्या वेळेस मरारविम, पुणे यांचेमार्फत प्रथम प्राधान्य गटातील जे ११ रस्ते विकसित करणेबाबत निवडण्यात आलेले आहेत, ते योग्य आहेत. यामुळे शिर्डी शहरातील वाहतुकीचा प्रश्न सुटण्यास निश्चित मदत होईल तथापि या रस्त्यांमध्ये जी वळण रस्ते आहेत, ती अर्धवट लांबीची घेतलेली आहेत ती पूर्ण लांबीची विकसित करणे आवश्यक आहे, असे निदर्शनास आले.

या रस्त्यांबाबत मरारविम, पुणे यांनी त्यांचेकडील दिनांक १३ एप्रिल, २००७ रोजीच्या पत्रासोबत पाठविलेल्या इतिवृत्तात तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दिनांक २५ एप्रिल, २००७ रोजीच्या पत्रात नमूद केलेले आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

०१. शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ३१ च्या दक्षिण, पश्चिम कोपऱ्यापासून बनरोड, बिरेगांव रोड, पिंपळवाडी रोड व पुढे सर्व्हे नंबर ३ ते ९ पर्यन्त १८ मीटर रुंदीच्या रस्त्यास मिळणारा रस्ता.

०२. नगर-मनमाड रस्ता ते सर्व्हे नंबर १६४ व नाला रस्त्याच्या कोपऱ्यापर्यन्त प्रस्तावित १८ मीटरच्या रस्त्यास जोडणारा १८ मीटर रुंदीचा नाला रस्ता.

०३. शिर्डी शहरापासून पुर्व बाजूस जाणारा व चौफुली ते बिरोबा मंदिर पर्यन्त (बिरेगांव रस्ता) विकास योजनेतील १५ मीटरचा रस्ता.

०४. शिर्डी विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा सर्व्हे नंबर ५ मधील (सि.स.नं.९०४) मधील रस्ता.

०५. १८ मी. रुंदीच्या वळण रस्त्यापासून आरक्षण क्र.०८ कडे जाणारा दक्षिण उत्तर १२ मी. रुंदीचा रस्ता.

उपरोक्त रस्ते मरारविम, पुणे यांचेमाध्यमातून विकसित करण्यात येणाऱ्या प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांमध्ये समाविष्ट करणेबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दिनांक १६ एप्रिल, २००७ रोजीच्या सभेतील विषय व ठराव क्रमांक ३८ अन्वये मंजुरी मिळालेली आहे, असे शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे पत्रात नमूद केलेले आहे.

उपरोक्त एकूण ०५ रस्ते मरारविम, पुणे यांचेमार्फत विकसित करण्यात येणाऱ्या प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांमध्ये जादा समाविष्ट करण्यास व सदर रस्तांचा भूसंपादन व विकास कामाचा खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी करावा, अशी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी या पत्राव्दारे केलेली आहे.

**(क)** तसेच मुख्य अभियंता, मरारविम, मुंबई यांनी दिनांक ०५ जुलै, २००७ रोजी दूरध्वनीवरुन असे कळविले आहे की, शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनतर्गत प्रथम प्राधान्य गटातील रस्त्यांच्या कामाची निविदा सूचना दिनांक ०४ जुलै, २००७ रोजीचे टाईम्स ऑफ इंडिया व दैनिक महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रातून प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. या जाहिरातीनुसार ज्या निविदा तयार करण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये १८ मीटर रुंदीच्या रिंग रस्त्याची राहिलेली लांबी (१.९० किमी) समाविष्ट करण्यात आलेली आहे. तसेच पार्किंग, गार्डन, स्कायवॉक ईत्यादीचा समावेश असलेल्या मेगा प्रोजेक्टसाठी कन्सल्टन्सीच्या निविदा काढण्यात येत आहेत, या मेगा प्रोजेक्टसाठी आवश्यक जमिनी भूंसपादनाबाबत काय प्रगती आहे ? हे कळवावे, असे सांगितले.

मरारविम, पुणे यांनी त्यांचेकडील दिनांक १५ जून, २००७ रोजीचे पत्रानुसार प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांमध्ये खालील तीन रस्त्यांचा समावेश करणेबाबत दिनांक १३ एप्रिल, २००७ रोजीचे आढावा बैठकीत ठरले होते असे कळविले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

(अ) नगर विकास आराखडयातील १८ मीटर रुंदीच्या रिंग रस्त्याची राहिलेली लांबी.

(ब) नगर मनमाड रस्ता ते बिरोबा देवळाकडे जाणारा विकास आराखडयातील १५ मीटर रुंदीचा रस्ता.

(क) शिर्डी रुई रस्त्यास समांतर पुर्वेकडील विकास आराखडयातील १५ मीटर रुंदीचा रस्ता.

उपरोक्त पैकी **अ** मध्ये नमूद केलेल्या नगर विकास आराखडयातील १८ मीटर रुंदीच्या रिंग रस्त्याची राहिलेली लांबी १.९० किमी चा समावेश दिनांक ०४ जुलै,२००७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेत करण्यात आलेला आहे, असे मुख्य अभियंता, मरारविम, मुंबई यांनी कळविलेले आहे.

**(ड)** मरारविम,पुणे यांनी त्यांचेकडील दिनांक २८ जून, २००७ रोजीचे पत्रानुसार असे कळविले आहे की, प्रथम प्राधान्य गटातील नियोजित १८ मीटर रुंदीच्या रिंग रस्त्याच्या राहिलेल्या भागाचा समावेश करण्यात आलेला आहे. या कामांची रितसर अंदाजपत्रके लवकर होण्याच्या दृष्टीने यांना कामांचे दोन भागात विभागणी करण्यात आलेली आहे.

यापैकी सर्वसाधारणपणे रिंग रोडसाठी डांबरी वाहन मार्ग व रिंग रोडचे आतिल भागात असलेल्या रस्त्यांसाठी सिमेंट कॉंक्रीटचे वाहन मार्ग प्रस्तावित आहेत. या मार्गाच्या कडेला आवश्यकतेनुसार पेव्हर ब्लॉक / पादचारी मार्ग यासह, विजेच्या दिव्यांसाठी तरतूद केलेली आहे.

यापुर्वी रस्ते विकास महामंडळ यांनी सन २००५-०६ च्या दरसुचीवर आधारित रुपये २८ कोटी मात्रचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. रिंग रस्त्याची वाढीव लांबी व साहित्याचे दरवाढीमुळे त्यात अंदाजित रुपये १२ कोटी मात्रची वाढ झालेली आहे. त्यामुळे प्रथम प्राधान्य गटातील रस्त्यासाठी आता रक्कम रुपये ४० कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित असल्याचे मरारविम, कॅम्प पुणे यांनी कळविले होते.

त्यामुळे या उपरोक्त रस्त्यांचा समावेश प्रथम प्राधान्य गटात करणेसाठी व याकामी अपेक्षित असलेला वाढीव भूसपांदन खर्च व विकसन खर्च संस्थानतर्फे करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता आवश्यक आहे. सदरहू प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता प्राप्त झालेनंतर यापुर्वी शासनाकडे मान्यतेसाठी सादर करणेत आलेल्या प्रस्तावात याचा समावेश करावा लागेल.

**(इ)** मरारविम, पुणे यांनी त्यांचेकडील दिनांक ३० मे, २००७ रोजीचे पत्राने असे कळविले आहे की, करारनाम्यानुसार कामांच्या किंमतीच्या १० टक्के रक्कम संस्थानने महामंडळाला सोपवावी, असे ठरलेले आहे. त्यानुसार १० टक्के महामंडळाकडे वर्ग करावी. तद्नंतर, दिनांक ०५ जुलै, २००७ रोजीच्या पत्रान्वये महामंडळाने प्रथम प्राधान्य गट क्रमांक १ मधील कामासाठी निविदा सूचना दोन भागात प्रसिध्द करण्यात आलेली असून, या मध्ये पहिल्या भागासाठी रुपये १७.८८ कोटी रुपये व दुसऱ्या भागासाठी रुपये १७.९० कोटी असे एकूण अंदाजित रुपये ३५.७८ कोटी मात्र किंमतीच्या

आहेत. संस्थानने या कामासाठी रक्कम रुपये ३५.७८ कोटी मात्र महामंडळाकडे कामापोटी जमा करावेत, अशी विनंती केलेली आहे.

आजअखेर या योजनेसाठी संस्थानतर्फे खालीलप्रमाणे रक्कम संबंधिताकडे वर्ग करण्यात आलेली आहे :

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशील | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे | पूर्व-प्राथमिक कामकाजासाठी | २९ ऑक्टोबर, २००६ | ००,५०,००,०००/- |
| ०२ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | संयुक्त मोजणी शुल्क, सर्व्हेअर यांचे मानधन ईत्यादी | १५ मार्च, २००७ | ००,०४,७३,७१६/- |
| ०३ | मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर | एकूण ०९ रस्त्यांसाठी अंदाजित मोबदला रक्कमेच्या २/३ रक्कम व ३ टक्के आस्थापना खर्चाची रक्कम | २८ मार्च, २००७ | १८,२३,६०,८२०/- |
| | | | **एकुण रुपये -** | **१८,७८,३४,५३६/-** |

**(ई)** उपरोक्त **परिच्छेद क, ड व इ** मध्ये नमूद केल्यानुसार,

०१. प्रथम प्राधान्य गटात १८ मीटर रुंदीच्या रिंग रस्त्याचे राहिलेल्या १.९० किलोमीटर लांबीचा समावेश करुन त्याचा भूसंपादन व विकसन खर्च संस्थानतर्फे करण्यात यावा किंवा कसे ?

०२. मरारविम यांना प्रथम प्राधान्य गटातील कामासाठी त्यांचे मागणीप्रमाणे रक्कम रुपये ३५.७८ कोटी मात्र आदा करावी किंवा कसे ?

०३. तसेच सदरहू रक्कम आदा करावयाची झाल्यास ती एक रकमी अथवा कामाचे प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने, आदा करावी किंवा कसे ?

अशा उपरोक्त तीन बाबींवर निर्णय होणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला होता.

या प्रस्तावावर साधक-बाधक चर्चा होऊन, प्रथम प्राधान्य गटात १८ मीटर रुंदीच्या रिंग रस्त्याच्या राहिलेल्या / उर्वरित १.९० किलोमीटर लांबीचा समावेश करणेत यावा. याकामी येणारा भूसंपादन व विकसन खर्च संस्थानमार्फत करण्यात यावा. मरारविम यांनी प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांच्या कामासाठी / विकसन खर्चासाठी मागणी केलेला अंदाजित रक्कम रुपये ३५.७८ कोटी मात्रचा निधी शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पाच्या संपूर्ण प्रस्तावास शासनाची मान्यता मिळालेनंतर कामाचे प्रगतीनुसार, टप्प्याटप्प्याने आदा करण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेच**

**विषय नं. २५ श्रीसाईबाबा हॉस्पिटल मधील डॉक्टरांचा मोबदला दर कमी करुन तयार केलेल्या सुधारित दरपत्रकाबाबत.**

**निर्णय क्र.७७०** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधे दि. १५/०५/२००६ पासून लागू केलेल्या दर पत्रकास मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३२८ दि.३/०६/२००६ अन्वये पुढील सुधारणा होईपर्यंत लागु करण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर दर पत्रकात सुधारणा करुन त्याची अमंलबजावणी दि.२६/०७/२००६ पासून करण्यात आली आहे व त्यास मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.५५० दि. १९/०८/२००६ अन्वये मान्यता मिळाली आहे. या दरपत्रकात दि. २५/११/२००६ रोजी ठराव क्रं. ८७५ अन्वये काही सुधारणांस मान्यता मिळालेली आहे. आता हॉस्पिटलला पुर्ण एक वर्ष होऊन गेलेले आहे. सुरवातीस हॉस्पिटल पुर्ण क्षमतेने चालण्यासाठी कमीत कमी दर आकारणी व डॉक्टरांना मिळणारी रक्कम कमी असेल तर चांगले डॉक्टर मिळणार नाही म्हणून डॉक्टरांना मासिक फिक्स मानधन अधिक कामाचे प्रमाणात काहीप्रमाणात जास्त टक्केवारीने मोबदला देण्याचे धोरण अवलंबुन दरपत्रक तयार करण्यात आले होते. सध्या हॉस्पिटल पुर्ण क्षमतेने चालत आहे व डॉक्टरांनाही चांगल्या प्रमाणात रक्कम मिळत आहे. मा.व्य.स.सभा दि.२०/०५/२००७ निर्णय क्र.४३७ (०३) नुसार मा.विश्वस्त श्री पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री सुरेश वाबळे, मा.श्री डॉ.गोंदकर, वैद्यकिय संचालक,प्रशासकिय अधिकारी रुग्णांलय व आस्थापना विभाग यांनी सर्व बाजुने विचार करुन डॉक्टरांना मिळणारा मोबदला दर कमी करुन सुधारीत दरपत्रक दि.१०/०८/२००७ रोजीचे मा.व्य.स.सभेमध्ये अवलोकनार्थ सादर करण्यात आले होते. यावर सविस्तर चर्चा होऊन वै.संचालक,उप वै.संचालक, मा.विश्वस्त सुरेश वाबळे, मा.विश्वस्त डॉ.गोंदकर यांनी यावर पुन्हा चर्चा करुन दरपत्रक निश्चित करावे अशी चर्चा झाली आहे. त्यानुसार दि.२२/०९/२००७ रोजी चर्चा होऊन सुधारणा करुन दरपत्रक तयार करण्यात आले होते. ते सर्व सदस्यांना पुरविण्यात आले, ते सोबत परिशिष्ट "ड" म्हणून ठेवण्यात आले आहे.

यामध्ये पूर्वीच्या दरपत्रकात कन्सलटेंशनवर लागू असलेल्या ७०% दर ६०% वर, जनरल सर्जरी वर डॉक्टर ५५.५५%, भूलतज्ञ १६.६६% वरून डॉक्टर ४५%, भूलतज्ञ १३%, पूर्वी कन्सलटेंशनचे दर वॉर्ड प्रमाणे वाढत जात होते ते सर्व वॉर्डमध्ये जनरल वॉर्डप्रमाणेच कमी राहतील, डिलक्सचे रूम चा दर ८०० वरून रू.५००/-व हृदय शस्त्रक्रिया विभागात ॲन्जीओग्राफी रू. ६००० वरून रू.५००० तर परफयुजनिस्ट व कॅथलॅब ऑपरेटरला प्रति केसनुसार मासिक वेतनाव्यतिरीक्त मोबदला, इन्टेंसीव्हीस्ट यांना मासिक २०,००० ऐवजी प्रति केस नुसार मोबदला, पॅथॉलॉजिस्ट यांना २% वरून ५% वाढ असे ठळक बदल करण्यात आलेले आहेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची त्याची नोंद घेण्यात येऊन,त्यास मान्यता देण्यात आली. सदर आदेशाची कार्यवाही (०१) वार्ड चार्जेस व डॉक्टरांचे चार्जेस दिनांक ४.१०.२००७ पासून व (०२) इतर दरपत्रक दिनांक ११.१०.२००७ पासून करण्यात यावी,असे ठरलें.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६** **श्री पुण्यतिथी उत्सव-२००७ निमंत्रण पत्रिका व गावजेवण पत्रिका छपाईबाबत.**

**निर्णय क.७७१** श्री पुण्यतिथी उत्सव-२००७ निमंत्रण पत्रिका व गावजेवण पत्रिका छपाईकामी कोटेशन्स मागविण्यात आले होती. त्यानुसार प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

**अ) श्री पुण्यतिथी उत्सव-२००७ निमंत्रण पत्रिका-**

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व पत्ता | तपशील | नग | दर रुपये-पैसे | शेरा (४ % MVAT) |
|---|---|---|---|---|---|
| **०१.** | लक्ष्मी प्रिंटर्स,भगवती कोल्हार ता.राहाता, जि.अहमदनगर, | ०१) ४ कलर, २ फोल्डस् ९० GSMनिमंत्रणपत्रिका<br>०२) ४ कलर, २ फोल्डस् १७० A/P व १०० GSM पाकीटासह निमंत्रणपत्रिका | १२५०००<br>२००० | १.१५<br>५.९५ | १,४३,७५०.००<br>११,९००.००<br>१,५५,६५०.०० |
| ०२. | निट प्रिंटस् ,डब्ल्यु-३६/सी-१, एम.आय.डी.सी.,अहमदनगर, | ०१) ४ कलर, २ फोल्डस् ७०GSM निमंत्रणपत्रिका<br>०२) ४ कलर, २ फोल्डस् १७० A/P व १०० GSM पाकीटासह निमंत्रणपत्रिका | ११७०००<br>२००० | ०.६४<br>५.७० | १,१२,०००.६४<br>११,४००.००<br>१,२३,४००.०० |
| ०३. | त्रिमुर्ती फाईन आर्टस् प्रा.लि., जी-२६,एम.आय.डी.सी, उज्वल एजन्सीज मागे, सातपूर, नाशिक, | ०१) ४ कलर, २ फोल्डस् ७०GSM निमंत्रणपत्रिका<br>०२) ४ कलर, २ फोल्डस् १७० A/P व १०० GSM पाकीटासह निमंत्रणपत्रिका | ११७०००<br>२००० | | एकत्रीत **७८,५००.००** |

**ब) श्री पुण्यतिथी उत्सव-२००७ गावजेवण पत्रिका-**

| अ.नं | कोटेशनधारकाचे नांव व पत्ता | तपशील | नग | दर रुपये-पैसे | शेरा (४ % MVAT) |
|---|---|---|---|---|---|
| **०१.** | लक्ष्मी प्रिंटर्स,भगवती कोल्हार ता.राहाता, जि.अहमदनगर | १ कलर | ९००० | ०.४५ | ४०५०.०० |
| ०२. | सावत प्रिंटर्स, राहाता, ता.राहाता,जि.अहमदनगर | ---- | १२,००० | ०.३० | ३६००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव-२००७ निमंत्रण पत्रिका छपाईकामी त्रिमुर्ती फाईन आर्टस् प्रा.लि., जी-२६,एम.आय.डी.सी, उज्वल एजन्सीज मागे, सातपूर, नाशिक, यांचे रु. ७८,५००.०० सर्व करांसहीत व श्री पुण्यतिथी उत्सव -२००७ गावजेवण पत्रिका छपाईकामी सावत प्रिंटर्स, राहाता, ता.राहाता,जि.अहमदनगर, यांचे रु. ३,६००.०० सर्व करांसहीत देऊ केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २७** **सुरक्षा संदर्भात कन्सलटंट नेमणेबाबत.**

**निर्णय क ७७२** श्रीसाई मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षिततेकरिता सुरक्षा संदर्भात उपाययोजना, वाढत्या गर्दीचे नियोजन, आधुनिक सुरक्षा साधनांचा वापर, सुरक्षा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण इ. उपाययोजना करुन सुरक्षिततेमध्ये आधुनिक साधनांचा वापर करुन सुरक्षा व्यवस्थेचा दर्जा सुधारणे आवश्यक असल्याने सुरक्षा संदर्भात मार्गदर्शन व सल्ला देणे करिता सुरक्षा संदर्भातील पुरेपुर ज्ञान असलेल्या व्यक्तीची Consultants म्हणुन नेमणुक करणे आवश्यक आहे.

ट्रायकलर कन्सल्टंसी प्रा. लि., मुंबई ही कंपनी अत्याधुनिक सिक्युरिटी बाबत श्री साईबाबा संस्थानला कन्सल्टंसी करण्यास इच्छुक आहे. सदर कंपनीने दि.१८ सप्टेंबर २००७ रोजी पत्र दिले आहे. पत्रात खालील गोष्टींचा समावेश आहे.

०१. आमच्या कन्सल्टंसीमध्ये जगातील अत्याधुनीक व नविन टेक्नोलॉजीचा समावेश केलेला आहे.
०२. सुरक्षेबाबत जगातील सर्व अत्याधुनिक व नविन टेक्नोलॉजी सिस्टीमच्या वापरासाठी निवडक व ठरावीक कर्मचाऱ्यांना वेगवेगळया स्थरावरील प्रशिक्षण देऊन वापरण्यास सोयीस्कर होईल. जेणेकरुन श्री साईबाबा मंदिर व मंदिर परिसर त्याचप्रमाणे संस्थानची मालमत्तेचे सुरक्षिततेच्या दृष्टीने जतन होईल.
०३. या कामासाठी प्रथम टप्प्यात श्री साई मंदिर व परिसराचा प्रोजेक्ट रिपोर्ट बनवण्यात येईल. सदर प्रोजेक्ट रिपोर्ट १५ दिवसांचे आत दिला जाईल. सदरचा प्रोजेक्ट रिपोर्ट दिल्यानंतर पुढील चार आठवडयात पुन्हा सविस्तर प्रोजेक्ट रिपोर्ट दिला जाईल. त्यामध्ये अत्याधुनिक मशिनरींचे Specification, Budget, Estimate & Time Schedule देण्यात येईल.
०४. प्रोजेक्टमध्ये दिलेल्या मशिनरी बाबत टेंडर काढून त्यातील सर्वात निम्नतम किंमत व प्रकार बघुन खरेदी करण्यासाठी मदत करण्यात येईल.
०५. अत्याधुनीक सिक्युरिटी करीता टेंडर झाल्यानंतर टेंडरमधील अत्याधुनिक मशिनरी व त्याची देखरेख व सुपरवीजन करण्यात येईल. त्याप्रमाणे सुरक्षा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाईल.

**प्रथम टप्प्यात कन्सल्टंसी करीता येणारा खर्च-**

01. Professional Fee - Rs 6.80 Lakhs,
02. Consultancy, Advise & Supervision- 10 % Value of the project.
०३. कन्सल्टंसी करिता येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रवास, राहणे, जेवण इ.खर्च.

**सदर कन्सल्टंसी ग्रुपमध्ये खालील तिन व्यक्तींचा समावेश केलेला आहे.**

a. श्री. राहुल गोपाल, सेवानिवृत्त, अतिरीक्त पोलिस महासंचालक,
b. श्री. विजय शहा, बी.ई. (इलेक्ट्रॉनिक्स),
c. श्री. अश्वीनी केसवानी, रिटायर्ड कर्नल, इंडीयन आर्मी,

श्रीसाई मंदिराव्यतिरिक्त भक्तनिवासस्थान, प्रसादालय, हॉस्पीटल, कनकुरी तळे इ. ठिकाणच्या सुरक्षा व्यवस्थेचा वेगळा प्रोजेक्ट रिपोर्ट द्वीतीय व तृतीय टप्प्यात सादर केला जाईल. प्रथम टप्प्यात आकारण्यात आलेल्या फी एवढीच द्वीतीय व तृतीय टप्प्यात फी आकारण्यात येईल. श्री साईबाबा संस्थानला कन्सल्टंसी म्हणुन नेमणुक होण्याची विनंती ट्रायकलर कन्सल्टंसी प्रा. लि., मुंबई यांचे वतीने प्रोजेक्ट कन्सल्टंट श्री. अश्वीनी केसवानी यांनी त्यांचे दि.१८ सप्टेंबर २००७ चे अर्जाने केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत ट्रायकलर कन्सल्टंसी प्रा. लि., मुंबई यांचे वतीने प्रोजेक्ट कन्सल्टंट श्री. अश्वीनी केसवानी यांचेशी समक्ष चर्चा केली असता, त्यांनी त्यांचे दिनांक २२ सप्टेबर,२००७ चे पत्रात मागणी केलेप्रमाणे डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणेसाठी प्रोफेशनल फी म्हणून रुपये ३.५ लाख तसेच प्रत्यक्ष प्रवास,रहाणे,जेवण इ.चा खर्च देण्यात यावा, अशी विनंती केली,ती मान्य करण्यात आली.

तसेच व्यवस्थापन समितीचे दिनांक १७.२.२००७ चे सभेतील निर्णय क्र.२१९ नुसार श्री.एम.सी. मंगलनाथन, नवी दिल्ली यांची सुरक्षा संदर्भात कन्सल टंट म्हणून नेमणूक केलेली आहे. तथापि त्यांनी आजपर्यंत कामास सुरुवात केलेली नसल्याने त्यांची नेमणूक रद्द करण्यात यावी,असे ठरलें. (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२८** **नवीन प्रसादालयासाठी संगणके खरेदी करणे बाबत**
**निर्णय क.७७३** **(अ)**संस्थानमार्फत श्रीसाईभक्तांना नेहमीच सेवा-सुविधा पुरविण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून एकाच वेळी जास्तीत जास्त श्रीसाईभक्तांची भोजनाची व्यवस्था होणेसाठी संस्थानचे अत्याधुनिक नविन प्रसादालय इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. या इमारतीमध्ये प्रसादालय कार्यालय, तिकीट बुकींग काऊंटर इत्यादी ठिकाणची कामे संगणकाव्दारे करण्यात येणार असल्याने, नविन प्रसादालय इमारतीमध्ये संगणकीय जाळ्याची उभारणी करणेसाठी लागणारे आवश्यक साहित्य विहित पध्दतीने खरेदी करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १७/०२/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १६७ नुसार मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०५/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३७० नुसार मिनिकॉम, मुंबई यांची रुपये ४,००,००१/- रुपयाची निविदा मान्य करुन जा. नं. एसएसएसटी/आयटी/ १०६९९/ २००७ दिनांक ०७/०७/२००७ नुसार नेटवर्कींग कामकाजाचा कार्यादेश देण्यात आला होता. कार्यादेशाप्रमाणे, मिनिकॉम, मुंबई यांनी नेटवर्कींगचे कामकाज पूर्ण करुन दिलेले आहे.

**(ब)**प्रसादालय इमारतीमध्ये प्रसादालय कार्यालय, तिकीट बुकींग काऊंटर या ठिकाणची कामे संगणकाव्दारे करण्यात येणार आहे. सदर ठिकाणी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संगणके पूरविणे आवश्यक आहे. परंतु, माहिती तंत्रज्ञान विभागाकडे सदर ठिकाणी बसविण्यासाठी संगणके उपलब्ध नसल्याने, खालील प्रमाणे संगणके कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम

रुपये ९०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| Sr. No. | Description | Qty | Rate (Approx) | Total Price |
|---|---|---|---|---|
| 01 | Intel P-IV 3.0 HT or Higher 80 GB Hard Disk 512 MB RAM, 15" TFT Monitor, Optical Mouse & Keyboard, Windows XP Professional, 3 Years on site warrenty. Make- *Zenith, Wipro, HCL* | 03 | 30,000/- | 90,000/- |
| | | | **Total** | **90,000/-** |

(कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९** **आयकर कायदा, १९६१ च्या तरतुदीनुसार सन २००१-०२ या आर्थिक वर्षापासूनच्या अखर्चीत उत्पन्नाच्या खर्चाबाबत...**

**निर्णय क्र.७७४** **अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांस सर्व माध्यमांद्वारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा, १९६१ चे कलम १०(२३)(सी)(v) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत तरतुदींमध्ये सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारित तरतूद पूढीलप्रमाणे आहे.

"Provided also that the fund or trust or institution [ or any university or other educational institution or any hospital or other medical institution ] referred to in sub-clause (iv) or sub clause (v) [or sub clause (vi) or sub clause(VIA)]

(a) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April, 2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years"

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५% उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे तसे शक्य न झाल्यास या ८५% उत्पन्नापैकी अखर्चीत रक्कम त्या पूढील पाच आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहीत पद्धतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील पाच आर्थिक वर्षात सदरची अखर्चीत रक्कम संस्थानच्या कोणकोणत्या उद्दीष्टांवर खर्च करण्यात येईल या विषयी मा. व्यवस्थापन समितीने नियोजनाबाबत निर्णय घेऊन तो संस्थानच्या आयकर विवरण पत्रासोबत आयकर विभागकडे सादर करणे बंधनकारक आहे.

**ब)** उपरोक्त तरतुदीनुसार सन २००१-०२ ते २००५-०६ या आर्थिक वर्षातील संस्थानचे आयकर विवरणपत्र आयकर कार्यालयाकडे दाखल करतांना दर्शविण्यात आलेले एकूण अखर्चीत उत्पन्न, दि.३१ मार्च,२००६ अखेर त्यातून केलेला खर्च व शिल्लक अखर्चीत उत्पन्न याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे :

| आर्थिक वर्ष | एकुण अखर्चीत उत्पन्न रु. | दि. ३१.०३.२००६ अखेर दर्शविण्यात आलेला खर्च | दि. ३१.०३.२००६ अखेर शिल्लक अखर्चीत उत्पन्न |
|---|---|---|---|
| २००१-०२ | २२,९५,९३,६०६.०० | २२,९५,९३,६०६.०० | -- |
| २००२-०३ | २८,०८,३६,२१२.०० | १७,२५,०२,३४९.०० | १०,८३,३३,८६३.०० |
| २००३-०४ | ३२,५७,९९,१९५.०० | -- | ३२,५७,९९,१९५.०० |
| २००४-०५ | ३७,१०,९०,७७६.०० | -- | ३७,१०,९०,७७६.०० |
| २००५-०६ | ४३,४६,६२,१२१.०० | -- | ४३,४६,६२,१२१.०० |

उपरोक्त नमुद खर्च तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार दर्शविण्यात आलेला असून त्याबाबत संस्थानचे तत्कालीन वैधानिक लेखापरिक्षक मे. एन.पी.रेडीज अँड कं., चार्टर्ड अकौंटंट्स, मुंबई, सध्याचे वैधानिक लेखापरिक्षक मे.शरद एस.गायकवाड अँण्ड कंपनी, मुंबई व संस्थानचे आयकर सल्लागार मे. एस.एस. गणपूले अँड कं., मुंबई यांचा सल्ला घेण्यात आलेला असुन, त्यांच्या सल्ल्यानुसार विविध बाबींवर झालेला खर्च दर्शविण्यात आलेला आहे.

**क)** सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण मे. शरद एस. गायकवाड अँड कं., चार्टर्ड अकौंटंट्स, मुंबई यांनी पुर्ण केले असून संस्थानचे सन २००६-०७ आर्थिक वर्षाचे आयकर विवरण पत्र आयकर कार्यालयाकडे दि.३१ ऑक्टोबर,२००७ पूर्वी दाखल करावयाचे आहे. सदरचे आयकर विवरणपत्र दाखल करतांना सन २००२-०३, २००३-०४ व सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील शिल्लक राहिलेल्या अखर्चीत उत्पन्नापैकी अनुक्रमे रु.१०,८३,३३,८६३.०० रु. २३,२२,८८,०६५.०० व

रु. ५,७६,४३,५७२.०० एवढी रक्कम संस्थानच्या ध्येय व उद्दिष्टांवर तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाच्या व विद्यमान व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णयानुसार सन २००६-०७ या आर्थिक वर्षात खर्च केल्याचे दर्शविण्यात यावे असे नम्र मत आहे.

त्याबाबतचा तपशील सोबत **परिशिष्ट "अ"** म्हणून ठेवण्यात आला आहे. याबाबत संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक मे. शरद एस. गायकवाड अँड कं., चार्टर्ड अकौंटंट्स, मुंबई व संस्थानचे आयकर सल्लागार मे. एस.एस. गणपूले अँड कं., मुंबई यांचा सल्ला घेण्यात आलेला असुन, त्यांच्या सल्ल्यानुसारच उपरोक्तप्रमाणे खर्च दर्शविण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे मागील आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाचा काही भाग खर्च झाल्याचे दर्शविल्यानंतर सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील एकूण अखर्चीत उत्पन्न रु. २७,२८,२३,२८७.०० एवढे येत आहे. सदरचे अखर्चीत उत्पन्न मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार पूढील पाच आर्थिक वर्षात संस्थानच्या ध्येय व उद्दिष्टांवर खर्च करणे बंधनकारक आहे.

**ड)** वरील परिच्छेद **"ब"** व **"क"** मध्ये नमुद केल्यानुसार दि. ३१ मार्च, २००७ अखेर शिल्लक राहिलेले अखर्चीत उत्पन्न व ते खर्च करण्यासाठी उपलब्ध कालमर्यादा पुढीलप्रमाणे आहे :

| **आर्थिक वर्ष** | **दि. ३१.०३.०७ रोजी शिल्लक अखर्चीत उत्पन्न रु.** | **खर्च करण्यासाठी उपलब्ध कालमर्यादा** |
|---|---|---|
| २००१-०२ | निरंक | -- |
| २००२-०३ | निरंक | -- |
| २००३-०४ | ९,३५,११,१३०.०० | सन २००८-०९ अखेर |
| २००४-०५ | ३१,३४,४७,२०४.०० | सन २००९-१० अखेर |
| २००५-०६ | ४३,४६,६२,१२१.०० | सन २०१०-११ अखेर |
| २००६-०७ | २७,२८,२३,२८७.०० | सन २०११-१२ अखेर |
| **एकूण -** | **१,११,४४,४३,७४२.००** | |

वरील तक्त्यात नमुद करण्यात आलेले अखर्चीत उत्पन्न त्या समोर दर्शविण्यात आलेल्या आर्थिक वर्षाअखेर खर्च करणे, आयकर कायदा, १९६१ मधील तरतुदींन्वये संस्थानवर बंधनकारक आहे. सदरची अखर्चीत रक्कम वर दर्शविलेल्या कालावधीमध्ये खर्च न झाल्यास उर्वरीत अखर्चीत रक्कम त्यापुढील आर्थिक वर्षात करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायद्यातील कलम ४ अन्वये करपात्र म्हणून धरलेल्या आर्थिक वर्षासाठी लागू असलेल्या महत्तम आकारणी दराने (Maximum Rate) आयकर आकारणी केली जाईल. त्यासाठी आयकर तरतुदीनुसार उपलब्ध कालमर्यादेतच तसेच मा.व्यवस्थापन समितीने याबाबत त्या त्या वेळी घेतलेल्या निर्णयानुसार सदरचे अखर्चीत उत्पन्न खर्च करण्याच्या दृष्टीने नियोजन होणे अत्यावश्यक आहे. अन्यथा अखर्चित उत्पन्नावर मोठयाप्रमाणात आयकर भरावा लागेल.

**इ. १)** उपरोक्त परिच्छेद **'ब'** मध्ये नमुद केल्याप्रमाणे सन २००२-०३ ची अखर्चीत रक्कम रु. १०,८३,३३,८६३.०० व सन २००३-०४ च्या अखर्चीत उत्पन्न रक्कम रु. ३२,५७,९९,१९५.०० यापैकी रु. २३,२२,८८,०६५.०० व सन २००४-०५ च्या अखर्चित उत्पन्न रक्कम रु.३७,१०,९०,७७६.०० या पैकी रु. ५,७६,४३,५७२.०० मात्र सन २००६-०७ या आर्थिक वर्षात खर्च झाल्याचे दर्शविणेबाबत.

०२) उपरोक्त परिच्छेद **'क'** मध्ये नमुद केल्याप्रमाणे सन २००६-०७ या वर्षातील अखर्चीत रक्कम रु. २७,२८,२३,२८७.०० एवढी दर्शविणेबाबत.

तरी परिच्छेद **"इ"** अ.नं. १ मध्ये नमुद केलेला खर्च दर्शविणेस व अ.नं.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अखर्चित रक्कम दर्शविणेकामी मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३०** **आयकर कायद्यातील तरतूदींन्वये सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत..**

**निर्णय क्र. ७७५** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यास सर्व माध्यमांव्दारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३)(सी)(v) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत तरतूदींमध्ये सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारित तरतूद पुढीलप्रमाणे आहे : -

"Provided also that the fund or trust or institution [ or any university or other educational institution or any hospital or other medical institution ] referred to in sub-clause (iv) or sub-clause (v) [ or sub-clause (vi) or sub-clause (VIA) ]
a)applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April-2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years."

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५ % उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते शक्य न झाल्यास या ८५ % उत्पन्नापैकी अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पूर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायदयातील तरतूदीनुसार त्या आर्थिक वर्षासाठी लागू असलेल्या महत्तम आकारणी दराने आयकर आकारणी केली जाईल.

संस्थानचे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरण आयकर कार्यालयाकडे दि.३१ ऑक्टोबर,२००७ पर्यंत दाखल करावयाचे आहे. सदर आयकर विवरणासोबत सन २००६-.०७ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येईल या बाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय सोबत जोडणे बंधनकारक आहे. त्या दृष्टीने अखर्चित उत्पन्न पुढील ५ वर्षामध्ये विविध उपक्रमांवर खर्च करणेबाबतच्या नियोजनाचा ढोबळ मसुदा सोबत जोडण्यात येत आहे. त्याबाबत निर्णय होऊन मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

Shri Saibaba Sansthan Trust is contemplating to take up various project towards the fulfillment of its objects. The execution of these projects would take a period of 4-5 years.

The Trust is likely to generate a surplus for the accounting year ended on 31st March,2007. Such surplus could be expended for the fulfillment of these projects.

It is therefore, recommended that such surplus be set aside out of the surplus for the year, to be spent on the projects as resolved hereinafter.

An application in this regard be also made to the Income Tax Assessing Officer, to set aside the funds in terms of section 11(2) of the Income Tax Act, 1961.

**RESOLUTION**

" Resolved that such surplus as is available for the year ending 31st March,2007 shall be accumulated or set apart as per requirements of section 11(2) of the Income Tax Act, 1961 and shall be spent on the following objects and activities of the Trust :.

*(Rs. In Crores)*

| Sr.No | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | To purchase Land for development of various projects / activities of the Sansthan for providing better facilities to Sai devotees | 30.00 |
| 2 | To Construct Buildings for Medical and Education purposes | 50.00 |
| 3 | Contribution / Grant in Aid Local infrastructural work within Shirdi Nagarpanchayat Limit i.e. Construction of Internal Roads, Subways, peripheral roads etc for Sai Devotees | 40.00 |
| 4 | To Construct additional Building for Staff Quarters for providing residential accommodation to Medical, Technical, Educational and Other Staff of the Sansthan | 5.00 |
| 5 | To reconstruct, renovate, carry out appropriate additions and alterations of existing buildings and provide additional facilities / services to Sai Devotees. | 5.00 |
| 6 | To purchase additional and modern Machinery, Furniture Equipments, Instruments for Hospital, Education purposes and for other department of the Sansthan | 20.00 |
| 7 | To Create additional educational facilities | 5.00 |
| 8 | To provide additional rooms / lodging facilities to Sai Devotees by construction new Bhakta Niwas Buildings | 15.00 |
| 9 | To construct New Prasadalaya with modern / advanced Equipments, Machineries, Furniture for providing Prasad Bhojan (Meals) to increased number of Sai Devotees. | 20.00 |
| 10 | To erect Wind Power Mill Project on the lines of Central Government policies to utilize more non conventional energy sources for strengthening the nation & for providing better services to Sai Devotees | 15.00 |
| 11. | To provide additional safe water supply for Sai devotees by widening / developing new water supply scheme. | 10.00 |
| 12. | To develop Garden for Sai Devotees | 10.00 |
| | TOTAL | 225.00 |

FURTHER RESOLVED THAT an application be made to the Income Tax Office seeking permission U/s 11(2) of the Income Tax Act' 1961 and a copy of this Resolution be provided along with the application for the purpose of their record ."

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१ श्री अर्जुनराव विष्णु पा.चौधरी, मु.पो.नांदुर्खी ता.राहाता, जि.अहमदनगर यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.७७६** श्री.अर्जुनराव विष्णू पा.चौधरी, मु.पो.नांदुर्खी ता.राहाता जि.अहमदनगर यांनी त्यांचे दिनांक २०.०९.२००७ चे पत्रान्वये श्री साईबाबा पालखी सोहळयात पंढरपुरला गेलेला त्यांचा अंदाजे रक्कम रुपये ३ लाख किंमतीचा सर्वगुणसंपन्न देखना २ll वर्ष वयाचा श्री साईबाबा चरणी विनामुल्य अर्पण करीत आहे. त्याच्या तबेल्याची व्यवस्था लेंडीबागेत श्यामसुंदर घोड्याचे समाधीजवळ करावी म्हणजे भक्तांना दर्शनाचा लाभ होईल व दुपारचे आरतीस व गुरुवारी पालखी सोहळयासमोर ठेवणे सोपे जाईल व पत्र्याचे बांधकाम होईपर्यन्त दररोज आरतीचे वेळी मंदिराचे गेटसमोर व गुरुवारी पालखीसमारे घोड्यास उभे करण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अर्जुनराव विष्णू पा.चौधरी, मु.पो.नांदुर्खी ता.राहाता जि. अहमदनगर यांनी देऊ केलेला घोडा विनाशर्त देणार असल्यास स्वीकारणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३२ नविन प्रसादालय इमारत बांधकाम व्यवस्थापन सल्लागार टी.सी.ई.कन्सल्टींग इंजिनिअर लि.,पुणे यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.७७७** संस्थानचे मौजे निमगांव-ददकोऱ्हाळे गट नं.८०, ८५ मधील जागेत बांधण्यात येत असलेल्या नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकामाचे काम ठेकेदार आय.व्ही.आर.सी.एल.इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि., पुणे यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे.

उपरोक्त प्रकल्पासाठी संस्थानमार्फत प्रत्यक्ष कामावर दैनंदिन देखरेख ठेवणे, गुणवत्ता व बिले तपासणे, नियोजीत वेळेत प्रकल्प पुर्ण करुन घेणे इत्यादी कामे टि.सी.ई.कन्सल्टींग इंजिनियर्स लि.,पुणे यांची बांधकाम व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०४.२००६ मधील निर्णय क्र.२६१ नुसार मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार इकडील जा.क्र.६४१५ दि.१८.०५.२००६ चे पत्रानुसार त्यांना नेमणूक आदेश देण्यात आलेला आहे. तसेच टी.सी.ई., पुणे यांचेशी ०२ ऑगष्ट, २००६ रोजी करारनामा करण्यात आला आहे.

०१) दि.१६.०९.२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७७८ अन्वये सिव्हिल कामासाठी मे.टि.सी.ई.कन्सल्टींग इंजिनियर्स लि.,पुणे यांना १२ व्यक्ति महिन्यांसाठी (man months) रु.९२,०००/- प्रती व्यक्ति अधिक १२.२४% सर्व्हिस टॅक्स अधिक निवासस्थान इत्यादी सुविधा देणेकामी येणाऱ्या रक्कम रु.१२,३९,१२९/- चे खर्चाचे प्रस्तावास मान्यता देण्यात आली. टी.सी.ई. यांचेशी झालेल्या करारनाम्यानुसार दि.३१ मे, २००७ अखेर त्यांची मुदत संपुष्टात आली.

०२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०७/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१२ अन्वये प्रसादालयाकडील उर्वरित कामे, हॅन्डींग ओव्हर व अंतिम बील तपासणीचे काम लक्षात घेता, मे.टी.सी.ई.कन्सल्टींग इंजिनियर्स लि.,पुणे यांना दि.३० सप्टेंबर, २००७ अखेर एकूण चार महिने मुदतवाढ देणेस तसेच यासाठी आवश्यक रु.४,४६,५६४/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.

०३) मूळ करारानुसार सदरहू प्रकल्पाची काम पूर्ण करण्याची ठेकेदार आयव्हीआरसीएल यांची मूदत दि.१४ जुन,२००७ अखेर होती. तथापी कामाच्या प्रमाणात वाढ झाल्याने मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.३७४, दि.२०/०५/२००७ अन्वये ठेकेदार आयव्हीआरसीएल यांना दि.३१.०७.२००७ मूदतवाढ देण्यात यावी असे ठरले. त्यानुसार आयव्हीआरसीएल यांनी किरकोळ कामे वगळता अदमासे सर्व बांधकाम पूर्ण केले आहे.

०४) आता टीसीई यांनी क्र. TCE/CN/४९३८A/४९९, दि.१६/१०/२००७ रोजीचे पत्रान्वये त्यांचे साईटवरील अभियंत्यास दि.३१/१०/२००७ अखेर कार्यमुक्त करावे, तसेच त्यांचे सेवेबाबत दि.३१/१०/२००७ अखेरपर्यंतचे कालावधीसाठी मुदतवाढ मंजूर करावी अशी विनंती केलेली आहे. सध्या इलेक्ट्रीकल मिटर रुमचे बांधकाम चालु आहे. तसेच नाल्यापर्यंत करावयाचे ड्रेनेज लाईनचे काम हाती घेण्यात आले आहे. ठेकेदार आयव्हिआरसीएल यांनी दि.२३/१०/२००७ रोजी अंतिम बिल सादर केलेले असून टिसीई व आर्किटेक्ट यांचेमार्फत त्याची तपासणी करण्यात येत आहे.

अंतिम बिल तपासणी करणे व साईट संस्थानकडे हस्तांतरीत करणेसाठी दि.३०/११/२००७ अखेरपर्यंतचा कालावधी लागेल असा अंदाज आहे. याकामी मे.टि.सी.ई. कन्सल्टींग इंजिनियर्स लि., पुणे यांना दि.३०/११/२००७ अखेर पर्यंत अजून दोन महिने मूदतवाढ देणे आवश्यक आहे. त्याकरीता दोन व्यक्ती महिन्यांसाठी (man month) रु.९९,३६०/- प्रती व्यक्ति महिना (रु.९२,००० + ८% वाढ) अधिक १२.३६% सुधारीत सर्व्हिस टॅक्स आणि निवासाची व्यवस्था इ. सुविधा देणेकामी अंदाजे रु.२,२३,२८२/- मात्र इतका खर्च येईल.

तरी प्रसादालयाकडील उर्वरित कामे, हॅन्डींग ओव्हर व अंतिम बील तपासणीचे काम लक्षात घेता वरीलप्रमाणे मे.टी.सी.ई.कन्सल्टींग इंजिनियर्स लि.,पुणे यांना ३० नोव्हेंबर, २००७ अखेर अजून दोन महिने मुदतवाढ देणेस तसेच त्यासाठी अपेक्षित रु.२,२३,२८२/- मात्रचे जादा खर्चास मान्यता

देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी आजचे सभेपुढे सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र.७०२ ते ७७७ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (भाऊसाहेब रा.वाकचौरे) | (जयंत मुरलीधर ससाणे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी | श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी |